# माणूस

शनिवार । १४ जानेवारी १९७८ । ७५ पैसे

राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप ।

राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप ।




राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप ।

राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप । राज्य कर्मचारी संप ।

# साप्ताहिक माणूस

**वर्ष सतरावे-अंक तेहतीस**

**१४ जानेवारी १९७८**

**मूल्य पंचाहत्तर पैसे**

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ,

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


# सप्रेम नमस्कार

दिनांक ७ जानेवारी १९७८ च्या माणूस-मध्ये श्री. शरद कृष्णन् यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांवर लिहिले आहे त्यात संपवाल्या कर्मचाऱ्यांबद्दल घेतलेली मुख्यमंत्र्यांची भूमिका योग्य असल्याचे व त्यामुळे त्यांचे तेज वाढल्याचे म्हटले आहे. वास्तविक गावातील अगदी तळाचा कर्मचारी कोतवाल यापासून सचिवालयातील अधीक्षक, इंजिनिअर याच्यापर्यंत दहा लाख श्रमिक कर्मचारी पक्षातीत भूमिका घेऊन एकत्र येतात, हे इतिहासातील महत्त्वाचे मानावे लागेल. कर्मचाऱ्यांच्या मागण्या न देता त्यांना शेतमजुरांची आठवण येते; परंतु कर्मचारी, व्यावसायिक इ. कडून व्यवसाय-कराच्या रूपाने रोजगारहमीसाठी घेतलेल्या ५० कोटी रुपयांचा उपयोग शेतमजुरांसाठी दादांचे मंत्रिमंडळ खर्च करू शकले नाही. त्यातही गैरव्यवहार झाले, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. वसंतदादाचे सरकार काळजीवाहू म्हणूनच आहे; परंतु जुन्या मंत्रिमंडळाच्या कित्येक निर्णयांवर बोळा फिरविण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या धोरणात शुगर-लॉबीचा प्रभाव आहे, हे शरद कृष्णनही मान्य करतात. कसेही करून सत्ता टिकवायची, एवढेच तत्त्व दादा सरकारने पाळले आहे. त्यामुळे अनेक बाबतीत गैरव्यवहार, प्रशासनात हस्तक्षेप, व्यापारी बागायतदारांना अनुकूल निर्णय इ. कामे त्यांनी केली. अनेक महामंडळांवर आपले लोक बसवून सर्वांना वाटून देण्याची भूमिका घेतली.

शंकरराव चव्हाणांच्या वेळी प्रशासनात राजकीय हस्तक्षेप होत नसे. आता तालुक्याचा नोकर बदलीसाठी मंत्र्यांची चिठ्ठी वा फोन आणू शकतो. पक्षीय हितासाठीच प्रशासनयंत्रणेत हस्तक्षेप होत असतो. प्रशासनावर नियंत्रण किती, याचा अभ्यास करावा. सर्वत्र वशिलेबाजी, महामंडळावर पक्षीय हेतूने नेमणुका व खिरापतीप्रमाणे सर्वांना काही तरी देऊन समाधान केले म्हणजेच यशस्वी कारकीर्द, हा शरद कृष्णनचा दावा नुसताच एकांगी नाही तर चुकीचा आहे. निवडणुकीनंतर दुसरे सरकार आले व त्यांनी दादांच्या कारकीर्दीतील कारभाराची चौकशी करणारे आयोग नेमलेच तर चांगले निर्णय (एकाधिकार कापूस खरेदी, आदिवासी विकास योजना) बदलणे, बदल्यांमध्ये राजकीय हस्तक्षेप, वशिलेबाजी, निरनिराळ्या पदांवर पक्षातील लोकांच्या नेमणुका इ. वर प्रकाश पडेल व महाराष्ट्रातील आजपर्यंतच्या मंत्रिमंडळातील सर्वांत अयशस्वी, असाच निर्णय होईल.

शंकररावांनी प्रशासनात कार्यक्षमता वाढविली, पुढाऱ्यांचे ठिकठिकाणी होणारे हस्तक्षेप होऊ दिले नाहीत. विकास-कामांना (धरणे, बंधारे) गती दिली, हे कोणीही मान्य करील. वसंतदादांना वगळले की, लगेच त्याना (शंकररावांना) खुनशी ठरविले. मग बाळासाहेब देसाईंना कोणी बाजूस सारले, गणपतराव तपासे, सोनूसिंग पाटील, पी. के. सावंत यांना राजकारणातून बहिष्कृत करण्याचा प्रयत्न करणारेच मुत्सद्दी कसे ठरतात ?

असे लिखाण केसरीत शोभले असते. आपल्या साप्ताहिकात असे एकांगी, तोंडपुजे लेखन कृपया छापू नये, ही विनंती.

५-१-७८ **सौ. मृणालिनी दाते**

सोलापूर

# असंघटितांची आठवण या वेळीच का व्हावी ?

हा अक प्रसिद्ध होईल तेव्हा राज्यकर्मचाऱ्यांच्या आणि शिक्षकांच्या सपाला एक महिना पूर्ण झालेला असेल कामगाराचे सप दीर्घकाळ यापूर्वी चाललेले आहेत; पण कर्मचारी शिक्षक म्हणजे मध्यमवर्गाचे प्रतिनिधी.हा वर्ग डाव्या तत्त्वज्ञानाप्रमाणे लढ्याला नेहमीच नालायक. या वर्गावर ऊठसूठ हल्ले चढविणे ही साहित्यापासून राजकारणापर्यंत सर्वच क्षेत्रात मान्यता पावलेली एक फॅशन होऊन बसलेली आहे. सगळीकडून झोडपल्या जाणाऱ्या या वर्गाबद्दल तशी कुणालाच सहानुभूती नसली, तरी शोषणावर जगणाऱ्या या बांडगूळवर्गात समाविष्ट होण्याची सर्वांची धडपड मात्र अव्याहत सुरूच असते.उत्पादकवर्गातल्या कामगार शेतकऱ्याचा मुलगाही संधी मिळताच टुणकन् एखाद्या नोकरीत उडी मारून बसतो आणि हळूहळू या मध्यमवर्गीय समाजाचाच एक भाग बनतो. सार्वजनिक क्षेत्रात वावरणारा असला तर रीतीप्रमाणे मध्यमवर्गावर आसूड ओढण्याच्या खेळात तोही अधूनमधून भाग घेतो. कारण हा खेळ तसा लोकप्रिय व फॅशनेबल असतो. आपले जुने काही न सोडता-बदलता, फुकटात आपण पुरोगामी वगैरे आहोत,असे मिरवायला मिळाल्यावर, कोण सुखासुखी या खेळाकडे पाठ फिरवणार? तरी पण खेळ रंगायचा तर त्यात नवीन नवीन कल्पना, नवे नवे आवाज यांची भर पडायला हवीच. जुने टिकवायलाही नव्याचा आश्रय घ्यावा लागतो. या कर्मचारी–शिक्षक–सपाला विरोध करताना असा एक आवाज सुरुवातीला मुख्यमत्र्यानी ऐकवला आणि नतर त्याचे पडसाद इतरत्रही उमटले. 'मूठभर संघटित वर्ग लक्षावधी असंघटित वर्गाची लूट करीत आहे. कुठे तरी हे थावले पाहिजे. म्हणून संपाबाबत वाटाघाटी नाहीत. तो बिनशर्त मागे घेतला जायला हवा,'अशी एरवी समन्वयवादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुख्यमंत्र्यानी ताठर भूमिका घेतली व हा संघटित विरुद्ध असंघटित, मूठभर विरुद्ध आम गोरगरीब जनता, हा आवाज सगळीकडे एकदम घुमू लागला. आता ही सगळ्यांना माहीत असलेली गोष्ट आहे की, ग्रामीण भागातली सहकारी साखर कारखानदारी ही मूठभर शेतकऱ्यांची बटिक आहे आणि ती निवडणुकांपासून शाळा–कॉलेज–हॉस्पिटल्सपर्यंत सर्व माध्यमांतून ग्रामीण भागावर आपले वर्चस्व टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आपले मुख्यमंत्री या प्रयत्नात आघाडीवर होते, आजही आहेत त्यांच्याच नेतृत्वाखाली ग्रामीण भागातले हे सहकारी साखरसाम्राज्य हळूहळू संघटित होत गेले. शासनाकडून सर्व सोयी-सवलती मिळविल्या गेल्या. या सवलती मिळवीत असताना असघटित अशा कोटयवधी गोरगरीब. जनतेची या सहकाराग्रणींना कधी आठवण झाल्याची नोद नाही. साखरेसाठी जीव टाकणारी शहरातली गोरगरीब व मध्यमवर्गीय जनता शोषक कुळातली म्हणून तिच्या जळफळाटाकडे दुर्लक्ष करायला हरकत नाही; पण खेड्यातल्या शेतमजुरांची, आदिवासी–दलिताची आठवण तरी सहकाराग्रणींना कधी आली होती का? आपले राज्य वाढावे, आपला अंमल चालू राहावा यापेक्षा वेगळी प्रेरणा या उद्योगात आजवर दिसली नाही. आपण संघटित व्हायचे, सघटनेच्या बळावर सगळे लाभ उपटायचे आणि इतरांनी तसे केल्यावर गोरगरीब जनतेच्या नावाने हंबरडा फोडायचा, हा एक धूळफेकीचाच प्रकार आहे आणि मुख्यमंत्र्यांना अनुकूल असणाऱ्या वृत्तपत्रानीही पुढे संपाला विरोध करताना हा मुद्दा निसकोचपणे पुढे माडला आहे. संपनेत्याना उद्धट भाषेत आवाहने करताना या बड्या वृत्तपत्राना जराही क्षणभर हात आखडून विचार करावासा वाटला नाही की, आपण ज्या क्षेत्रात आहोत ते क्षेत्र दहा–वीस वर्षांपूर्वी कसे होते, कुठे होते? त्या ठिकाणापासून आजच्या ठिकाणी आपण कसे आलो? कुणी आणले? बड्या वृत्तपत्रात काम करणाऱ्यांना मिळत असलेल्या सोयी–सवलती, चार आकडी पगार हे सगळे संघटित ताकद वापरूनच मिळवले गेलेले आहेत; हे सगळे मिळवत असताना त्या गोरगरीब असघटित शेतमजुराची तर सोडाच, आपल्याच क्षेत्रातील लहान लहान व विखुरलेल्या वृत्तपत्रघटकाचीदेखील कुणाला आठवण ठेवावीशी वाटलेली नव्हती. 'यांना प्रथम इतके मिळू द्या, मग आम्ही आमचा वाटा उचलू' किंवा 'आमच्यातला हा वाटा त्यांच्याकडे जाऊ द्या' असा अंत्योदयी विचार ज्यांनी कधीकाळी निदान नुसता व्यक्त तरी केला असेल, त्यानी फार तर सपनेत्यांना गोरगरीब असंघटित शेतमजुराच्या नावाने आवाहने करण्यात काही अर्थ आहे, काही सुसंगती आहे. गाडीत गर्दी असली की अगोदर घुसून जागा पटकवलेला माणूस जसा नवीन येणाऱ्याना आत येऊ देत नाही, तसा हा काहीसा आवाहनवाल्यांचा प्रकार आहे. देशात उपचाराची सोय असताना लव्याजम्यानिशी तडकाफडकी अमेरिकेत जाऊन रोग बरा करून येणाऱ्या राष्ट्रपतीच्या आवाहनालाही म्हणूनच प्रतिसाद लाभत नाही. याचा अर्थ सपाला सर्वांनी शंभर टक्के पाठिंबा द्यावा, असा नाही. गुतागुंतीचा मामला आहे आणि उभयपक्षी काही तरी देवाण–घेवाण होऊनच तो मिटायला हवा. *असेच कुणीही शहाणा माणूस म्हणेल. संप चिरडून टाकण्याचा* मुख्यमंत्र्यांचा पवित्रा तर निखालस चूकच आहे तो राजकीय कारणासाठी घेतला गेला आहे, हे सुरुवातीपासूनच स्पष्ट असताना सपनेत्यांना मात्र सप राजकीय आहे, म्हणून एकतर्फी धारेवर धरणे अगदीच अन्यायाचे आहे. कुणाचाही पाठिंबा नसताना, एकाकी अवस्थेत, सर्व महाराष्ट्रभर, खेड्यातून तसेच शहरांतूनही सप ऐंशी–नव्वद टक्के महिनाभर यशस्वी करून दाखवणे ही संघटनकौशल्याची एक अपूर्व करामत आहे. सगळी कारकून–मास्तरमंडळी नेहमीच सर्वांकडून हिणवली आणि झोडपली जाणारी. त्याचा निर्धार कौतुकास्पद म्हटला पाहिजे त्याना इतकी कठोर शिक्षा फर्मावण्याचा, अद्दल घडवायचा नैतिक अधिकार आज समाजात कुणालाच नाही. अगोदरच संघटित होऊन सर्व सोयी-सवलती लाटणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मंडळीना तर मुळीच नाही. त्याच्या आवाहनाना आणि टीकेला सपनेत्यांनी केराची टोपली दाखवली, हे ठीकच झाले. संपनेत्यांनी आपल्या सदसद्विवेकबुद्धीशिवाय कुणालाही प्रमाण मानू नये कारण त्याहून मोठी आणि आदरणीय शक्ती आज तरी समाजात अस्तित्वात नाही. मुख्यमत्र्यानी दरवाजे थोडे उघडून वाटाघाटीना वाव दिला तर परिस्थिती चिघळणार नाही. का मुख्यमत्री तरी एवढे अडून बसले आहेत, कळत नाही. हा त्यांचा स्वभाव नाही आणि सत्तेवर आल्यापासून खैरातीला तर त्यानी कधी नाही म्हटलेलेच नाही. मग याच वेळी हात एकदम आखडता घेण्याचे कारण काय?

—संपादक

# संप : अर्थशास्त्रज्ञ, वृत्तपत्रे, पुढारी....

प्रा. चिं. शं. इनामदार

सरकारी नोकरांचा संप सुरू होऊन आता तीन आठवड्यांचा कालावधी लोटला आहे. या कालावधीत राज्यशासन व कर्मचारी यांच्या ठाम भूमिका व्यक्त झाल्या आहेत, पंतप्रधान, राष्ट्रपती, राज्यपाल यांचा सुल्ला या बाबतीत काय आहे, हेही स्पष्ट झाले आहे. दिल्लीतील जनता सरकार या संपाला राजकीय कारणास्तव पाठिंबा देण्यास कितपत उत्सुक आहे, त्याचीही कल्पना आली आहे. तरीही संपावरील कर्मचाऱ्यांनी संप चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करून जी स्वतःची व इतरांची कोंडी करून घेतली आहे ती आता कशी फुटणार, असा एक यक्षप्रश्न मजसारख्या सामान्य नागरिकासमोर आहे. गेल्या आठवड्यात अशी आशा वाटत होती. की, राष्ट्रपतीच्या सल्ल्याचा आदर करून कर्मचारी ही कोंडी फोडतील; पण त्यांनी त्या सल्ल्याचाही अनादर केल्यामुळे सार्वजनिक क्षेत्रात काम करणारी व उभयपक्षी तडजोड व्हावी अशी मनोमय इच्छा बाळगणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये मध्यस्थी करावयास धजावेल, अशी शक्यता दुरावत चालली आहे.

मला आणखीही काही शंका व प्रश्न आहेत. या संपाबाबत काही वृत्तपत्रांनी शासनाची बाजू उचलेली आहे, तर काहींनी कर्मचाऱ्यांची! परंतु कोणत्याही वृत्तपत्रांनी याबाबतीत सामान्य नागरिकाला स्वतःचे निश्चित मत बनविता येईल, अशी माहिती मात्र दिलेली नाही. लोकशाहीत ही गोष्ट अत्यंत आवश्यक आहे. सामान्य माणसाला राज्यकारभारात पुरेसा अर्थपूर्ण सहभाग मिळावयास हवा असेल तर त्या त्या क्षेत्रात जे प्रश्न वा समस्या येतात, त्यासंबंधी त्याला तज्ज्ञाचे मार्गदर्शन हवे. असे मार्गदर्शन त्याला लोकशाहीत वृत्तपत्रामार्फतच मिळू शकते, हेही निर्विवाद आहे. याच काळात टाइम्स, म. टाइम्स, केसरी, सकाळ इ. दैनिकांतून व माणूस, मनोहर, मार्मिक इत्यादि साप्ताहिकातून परराष्ट्रीय राजकारण, अरब-इस्रायल-सवाद, कार्टर भेट, कॉंग्रेसमधील सुदोपसुंदी यासंबंधी अनेक वार्तापत्रे प्रसिद्ध झाली; परंतु आपल्या घरात उभ्या राहिलेल्या या ज्वलंत प्रश्नावर मार्गदर्शक व माहितीपूर्ण असा लेख प्रसिद्ध झालेला नाही. नाही म्हणावयास म. टाइम्समध्ये सुभाष नाईक यांनी एक लेख प्रसिद्ध केला आहे; पण त्यात केवळ दोन्ही बाजूचे म्हणणेच दिले आहे. त्यांच्या त्या त्या म्हणण्यामध्ये वस्तुनिष्ठ तथ्य किती आहे, हे तपासले आहे असे वाटत नाही. वृत्तपत्राची ही प्रवृत्ती लोकशाहीच्या निकोप वाढीस खासच सहाय्यभूत ठरणारी नाही.

प्रथमतःच एक शंका मनामध्ये येते. मा. मुख्यमंत्री यांनी या मागण्यांसंबंधी घोषणा करताना असे म्हटले आहे की, येथून पुढे महाराष्ट्र शासन, केंद्र शासनाच्या घोषणेनुसार महागाईभत्ता देईल; इतकेच नव्हे तर स्वतंत्र पे-कमिशन नेमणार नाही. केंद्र सरकारने नेमलेले पे-कमिशन जे निर्णय घेईल, ते सर्व या शासनालाही लागू होतील. याचा सरळ सरळ अर्थ असा निघतो की, तत्त्व म्हणून राज्यशासन व केंद्र शासन यांमध्ये महाराष्ट्र शासन वेतनाचे संदर्भात यापुढे भेदभाव करणार नाही. असे जर आहे तर आता तपशिलाबाबत असा हट्ट का? एक भूमिका समजू शकते की, आतापर्यंतच्या सर्व वाढी थकबाकीसहित कर्मचाऱ्यांना देणे शक्य होणार नाही; परंतु हा ११% चा अनैसर्गिक फरक राखल्यानेच शासनाची याबाबतची क्षमता सिद्ध होईल. हा दावा हास्यास्पद आहे. एकाही वार्ताहराने मुख्य मंत्र्याना त्यांच्या धोरणातील या विसंगतीबद्दल विचारल्याचे प्रसिद्ध झालेले नाही. एरवी पक्षीय मतभेदाबद्दल अत्यंत खोदून खोदून प्रश्न विचारले जातात व त्या त्या प्रश्नावर मुख्यमंत्र्यांच्या 'मूड'मध्ये होणारा बदलही टिपला जातो; परंतु यासबंधी मात्र मौन! बरे, शासनाची क्षमता आहे किंवा नाही हे तरी कोण ठरविणार? मागे अशा तऱ्हेचे प्रश्न उपस्थित झाले असता शासनानेच मान्यवर अर्थशास्त्रज्ञांची समिती नेमल्याची उदाहरणे आहेत. (लकवाला समिती) या वेळी शासनाचे मुख्य सचिव व कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी यांनीही वस्तुनिष्ठ माहितीच्या संदर्भात भिन्न भिन्न आकडे प्रसिद्धीस दिले आहेत. महसुली खर्चाच्या किती टक्के खर्च शासनयंत्रणेवर होतो, ही माहिती इतकी अगम्य आहे का? पुण्यातील कल्हईवाल्यांचाही सर्व्हे करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांना (व तो करून घेऊन त्यास प्रसिद्धी देणाऱ्या वर्तमानपत्रकारांना) हा विषय तितकाही मोलाचा वाटत नाही का? भारतातील आणखी कोणकोणती राज्ये केंद्रीयदराने महागाई-भत्ता देतात? महाराष्ट्र राज्याच्या संदर्भात त्यांची आर्थिक क्षमता, विकासाची स्थिती व गती काय आहे व त्यावरून या राज्याच्या या बाबतीतल्या धोरणासंबंधी काय म्हणता येईल? या प्रश्नांची उत्तरे महाराष्ट्रातील जनतेसाठी या राज्यातील सहा विद्यापीठांमधील अर्थशास्त्राचा एकही प्राध्यापक देऊ शकत नाही? अनेक निवृत्त महाराष्ट्रीय अधिकारी राज्यशासनाच्या प्रशासन, अर्थ इ. खात्यात किंवा केंद्र शासनाच्या अशाच प्रकारच्या खात्यात काम केलेले आहेत. त्यांच्यापैकी कुणालाच या प्रश्नावर निःपक्षपाती वृत्तीने मतप्रदर्शन करणे शक्य नाही का?

(या संदर्भात एक उदाहरण आठवते, त्याचा मुद्दाम उल्लेख करतो. ४-५ वर्षांपूर्वी राज्यातील निवासी डॉक्टरांनी आपल्या मागण्यांकरिता संप पुकारला होता. त्या वेळी पुणे महानगरपालिकेतील

आरोग्यखात्याचे प्रमुख श्री. अद्रानवाला याचे टाइम्स ऑफ इंडिया-मध्ये एक अत्यंत माहितीपूर्ण पत्र प्रसिद्ध झाले होते. )

दुसरा एक संदर्भ आठवतो तो असा की, नोव्हें. १९७५ च्या विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या किंवा दुसऱ्या दिवशी त्या वेळच्या मुख्यमंत्र्यांनी महागाईभत्ता–वाढीसंबंधी अशीच एक घोषणा केली होती. त्यामध्ये त्यांनी केंद्रशासनाप्रमाणे भत्ता देण्याची राज्यशासनाची क्षमता नाही हे कबूल करून असे म्हटले होते की, केंद्रापेक्षा सर्व स्तरावर १% राज्यशासन कमी भत्ता देईल म्हणजे केंद्रीय वाढ ३% असेल तर राज्यशासन २% वाढ करेल इ. ७५–७७ या काळात या हिशोबाने तरी सर्व वाढी दिल्या गेल्या का? त्या वेळी आणी-बाणीची परिस्थिती असल्याने कर्मचाऱ्यांनी या निर्णयाविरुद्ध फारसा आवाज उठवला नाही; परंतु या धोरणाची तरी काटेकोरपणे अंमलबजावणी झाली आहे का? मुळात केंद्रशासनानेही तिसऱ्या वेतनआयोगाच्या ज्या शिफारसी मान्य केल्या, त्यांची वेळोवेळी अंमलबजावणी करताना काळकाढूपणा केला आहे. याच कालावधीत सार्वजनिक क्षेत्रात सेवेचे कंकण बांधून उतरलेले महानगरपालिकांचे सभासद, आमदार, खासदार मात्र स्वतःच्या भत्तावाढीसंबंधी, वेतन-वाढीसंबंधी व निवृत्तिवेतनासंबंधीही किती जागरूक असतात, याचाही प्रत्यय आलेला आहे आणि इतक्या सर्व सवलती मिळूनही त्यांच्या-कडून वीज, पाणी, टेलिफोन, नाममात्र भाडे इ. संबंधीच्या रकमा वेळच्या वेळी भरल्या जात नाहीत व त्यावर कोणतीही कारवाई होत नाही, याही बातम्या प्रकाशात येत असतात. यामुळे या क्षेत्रा-तील नेतृत्वाने कर्मचाऱ्यांनी असा लढा करू नये, असे म्हणण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे व त्यामुळेच हे अराजक उभे राहत आहे, असे माझ्यासारख्याला वाटते.

पंतप्रधानांनी खाजगी क्षेत्र व शासन यांची गल्लत करून ज्याला जसे परवडेल तसे तो वेतन देणार, असा नियम सांगितला. राज्य-शासन व केंद्र शासन यामध्ये एवढी 'तफावत' शासन या संकल्पनेच्या संदर्भात संभवते का, याचेही उत्तर एखाद्या राज्यशास्त्राच्या प्राध्यापकानेच द्यावयास हवे!

या लेखाचा मूळ उद्देश संपाला पाठिंबा व्यक्त करण्याचा नसून आपल्या वृत्तपत्रांचा नाकर्तेपणा स्पष्ट करण्याचा आहे. रेल्वे–संपाच्या काळात मुंबईच्या टाईम्स दैनिकातून व्ही. टी. वरून आज किती गाड्या सुटल्या, याबाबत त्या वेळचे मुख्य सचिव साठे यांच्या मुलाखतीतील माहिती येत असे. मनात येऊन जाई की, टाईम्सची इमारत व्ही. टी. च्या समोरच आहे. गाड्या किती सुटल्या यासंबंधी साठ्यांचा दावा बरोबर की चूक, हे टाइम्सला तपासणे अशक्य नव्हते; पण ते त्यांनी केले नाही. एवढ्या मोठ्या वृत्तपत्राची जर ही अवस्था, तर सकाळ-केसरीसारख्या दैनिकाकडून स्वतंत्र बातमी-पत्रांची अपेक्षा करणे चूकच नव्हे काय? आणीबाणी उठलेली अस-ताना व वृत्तपत्रस्वातंत्र्याचा जयघोष चालू असताना एका मुमूर्षु राज्य शासनाच्या संदर्भात वस्तुनिष्ठ माहिती सामान्य नागरिकाला देण्यास जर ही वर्तमानपत्रे असमर्थ असतील तर आणीबाणीत तमो-युग घडते याचे आश्चर्य कसले? ☐

# आणखी काही प्रतिक्रिया

'आपले दि. २३ डिसेंबर १९७७ चे पत्र वाचून समन्वय समितीस सखेद आश्चर्य वाटते. राज्यापुढील पेचप्रसंग सोडविण्यास ते पत्र साहाय्यभूत होऊ शकत नाही, याबद्दलही खेद होतो.

'आपण सर्व परिस्थितीचा साकल्याने फेरविचार करावा अशी आपणास समन्वय समितीची विनंती आहे. सार्वजनिक व्यवहारातील शांततापूर्ण आंदोलनाचे उत्तम संकेत आणि नीती कर्मचाऱ्यांनी राखली आहे. प्रक्षोभक विरोधाच्या संदर्भात तरी समन्वय समिती या उच्च संकेताचा आणि नीतीचाच अवलंब करील; परंतु आपण स्वीकारलेली भूमिका आणि त्यातून निर्माण होणारे विशेषतः अत्यावश्यक सेवांतील तणाव यामुळे गंभीर सामाजिक परिस्थिती निर्माण होत आहे. यासंबंधी कोणताही युक्तिवाद संपकरी कर्म-चाऱ्यांवर दोषारोप लादू शकणार नाही. याबाबत घाईने कारवाई करून परिस्थिती अधिक बिघडविणारी कृती शासन करणार नाही अशी समन्वय समितीस आशा आहे.'

दि. २५ डिसेंबर १९७७ रोजी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना संपावरील कर्मचाऱ्यांच्या समन्वय समितीतर्फे पाठविण्यात आलेल्या पत्राचा हा काही भाग. समितीचे नेते आपल्या भूमिकेबद्दल किती ठाम आहेत, हे यावरून दिसून येते. परंतु कोणतीही कृती संपूर्णतः यशस्वी करायची असेल तर नुसती नेतेमंडळी ठाम असून चालत नाही, त्यांचे अनुयायी सुद्धा एकनिष्ठ आणि खंबीर असावे लागतात. सध्याच्या या राज्य कर्मचारी संपात या दोन्हींचा संयोग चांगल्या प्रकारे झालेला दिसून येतो आणि म्हणूनच संप सुरू होऊन तीन आठवडे उलटून गेले तरी संपाला खिंडार पडलेलं नाही. याच संदर्भात, प्रत्यक्ष संपावर गेलेल्या काही व्यक्तींच्या मुलाखती मी घेतल्या. तसं पाहिलं तर या व्यक्तींकडे संपाच्या बाबतीत कोणतंही नेतृत्व देण्यात आलेलं नाही; पण संपाच्या, संघटनेच्या एक घटक म्हणून त्यांना निश्चितच स्थान आहे आणि बऱ्याच वेळा नेत्यांच्या साचेबंद, ठोकळेबाज भाषेपेक्षा या सामान्य घटकाच वक्तव्यच परिस्थितीवर अधिक चांगला प्रकाश टाकू शकतं.

## पुढे टाकले पाऊल आता, मागे न च घेणे

'माझं नाव श्री. लक्ष्मीकांत जामोरकर. मी नूतन मराठी विद्या-लयात संस्कृत शिकवितो. गेले तीन आठवडे चालू असलेल्या संपात तर मी सहभागी झालो आहेच; पण आज समन्वय समितीतर्फे जो

सत्याग्रह करण्यात येणार आहे, त्यातही मी सामील होत आहे. आज आम्ही मॅजिस्ट्रेटसमोर हातात बंद पुस्तकं घेऊनच जाणार आहोत आणि त्यांना सांगणार आहोत, 'तुम्ही आमचे दरवाजे उघडा, म्हणजे आम्ही पुस्तकं उघडू.'

'आम्हाला अशा तऱ्हेने सत्याग्रह करून तुरुंगात जायला लागावं, ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे; पण हे शासन आज आमची किंमत जाणत नाही, मानत नाही. शिक्षक शिकवण्या करतात, क्लासेस चालवितात म्हणून त्यांना दोषी धरलं जातं; पण तो हे उद्योग का करतो, याचा विचार मात्र कुणी करीत नाही. शाळेमध्ये पूर्ण वेळ काम करूनही मिळणारं वेतन अपुरं असतं. म्हणून आम्हाला हे करावं लागतं.

'शिक्षक हा भवितव्य घडवणारा घटक आहे, राष्ट्रपुरुष घडवण्याचं काम शिक्षक करतो. अर्थात तुम्ही म्हणता तसं, सगळेच शिक्षक असे नसतात, हे मला मान्य आहे; पण त्यावरही माझं असं म्हणणं आहे की, विद्यार्थ्यांनी आमच्यावर, त्यांच्या वर्तनातून तस दडपण आणलं पाहिजे. आम्हाला जबाबदार बनायला भाग पाडलं पाहिजे. हल्ली तर काय, पालकही आमची टिंगलच करतात आणि त्यामुळे विद्यार्थ्यांनाही प्रोत्साहनच मिळतं. तेव्हा सांगण्याचा मुद्दा असा की, एकंदरीत सर्वच बाजूंनी आमच्यावर अन्याय होत आहे. शासनाने आमच्या बाबतीत चालवलेल वर्तन अत्यंत निषेधार्ह आहे. वेतनाच्या बाबतीतलं शासनाचं धोरण आमच्यावर अन्याय करणारं आहे. आमच्या या संपामुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होतंय, हे तुमचं म्हणणं खरं आहे; पण हे नुकसान, एकदा संप मिटल्यावर, आम्ही रात्रंदिवस काम करून भरून काढू. आम्हालाही विद्यार्थ्यांची जाणीव आहे. त्यांचं आमच्यामुळे कोणत्याही प्रकारचं नुकसान होणार नाही, याची काळजी आम्ही निश्चितच घेऊ. पालकांनाही आमचं असं आवाहन आहे की, त्यांनी आमची भूमिका समजावून घ्यावी आणि आमच्यामागे उभं राहावं.

'शासनाचं आताचं जे धोरण आहे, त्यावरून हे स्पष्टच होतंय् की, शासन या संप–प्रकरणात आम्हाला जास्तीत जास्त छळणार. कदाचित हा संप चिरडण्याचाही प्रयत्न होईल; पण आता आमची संघटना माघार घेणार नाही. 'पुढे टाकले पाऊल आता, मागे नच घेणे' अशी पक्की भूमिका आम्ही स्वीकारलेली आहे आणि आता कोणत्याही परिस्थितीशी टक्कर देण्याची आमची तयारी आहे.' *

## एकदा हे तोंड फुटायलाच हवं होतं !

'मी मुंबईच्या सी. आय. डी. खात्यात इन्स्पेक्टर आहे. पुण्याहून रोज अप-डाउन करीत असतो; पण आता गेले तीन आठवडे संपावर असल्यामुळे पुण्यातच आहे. हा आम्ही करीत असलेला संप अत्यंत रास्त आहे असं मला वाटतं. कारण मुंबईतल्या मुंबईतही, आम्ही करीत असलेलं काम आणि केंद्राचा कर्मचारी करीत असलेलं काम, यात काहीही फरक नसूनही वेतनात मात्र असणारी प्रचंड तफावत आम्हाला वारंवार जाणवते.

'मी स्वतः सत्याग्रह वगैरे प्रकारात भाग घेतलेला नाही आणि घेणारही नाही. कारण एकदा नाव 'रेकॉर्ड'वर गेलं की, त्याचा फार त्रास होतो हो ! आपण आपलं पाठिंबा म्हणून कामावर जाऊ नये, म्हणजे झालं. आता पहा, सध्या मुंबईमध्ये आमचे वरिष्ठ अधिकारी (Executives) कामावर जात आहेत; पण त्याचा काहीच उपयोग होत नाही. कारण आमच्याशिवाय गुन्ह्याच्या तपासाला सुरुवात होऊ शकत नाही; फाइलचं एक पानसुद्धा हलू शकत नाही; पण हे वरिष्ठ अधिकारी संपावर गेलेले नाहीत, कारण त्यांना माहीत आहे की, जर संप यशस्वी झाला तर त्याचे फायदे त्यांनाही आपोआपच मिळणारच आहेत.

'पण एक गोष्ट मात्र मला प्रकर्षाने जाणवते की, संप इतका लांबला असूनही, आमच्यामध्ये अजूनही एकजूट चांगली आहे. ज्यांना पैशाची निकड आहे — विशेषतः चतुर्थ श्रेणीचे कामगार—त्यांना संघटनेच्या निधीतून किंवा कर्ज काढून पैसे दिले जातायत्. त्यामुळे तेही संपात पूर्णपणे सहभागी झालेले आहेत.

'हा संप झाला हे एका दृष्टीने चांगलंच झालं. केव्हा ना केव्हा आमच्यावरील या अन्यायाला वाचा फुटणं आवश्यकच होतं. आम्हाला लाभलेली नेतेमंडळीही खंबीर आहेत. त्यामुळे हा संप यशस्वी होईल, अशी मला खात्री वाटते.' *

## या शासनानेच आम्हाला रस्त्यावर आणलं आहे

'माझं नाव सौ. मीनल वैद्य—मी ना. दा. ठाकरसी कन्याशाळेमध्ये शिक्षिका आहे. पूर्ण विचार करून मगच आम्ही संप करण्याचा निर्णय घेतला. यासाठी आमची मानसिक तयारी केव्हाच झाली आहे. आमच्या मागण्या रास्त आहेत. गुणवत्तेच्या प्रमाणात वेतन मिळावं, किंवा आमच्या मुलांना मोफत शिक्षण मिळावं. या मागण्यांमध्ये काही अवाजवी आहे असं मला वाटत नाही. शेवटी माणूस म्हणून शिक्षकाच्याही काही गरजा असतातच, त्या भागविल्या गेल्याच पाहिजेत; पण हे शासन आमच्या पेशाचं महत्त्व जाणतच नाही. त्यानेच आम्हाला रस्त्यावर आणलेलं आहे. अशा तऱ्हेने संपावर जाण्यात किंवा सत्याग्रह करण्यात कोणत्याच शिक्षकाला आनंद वाटत नाही; पण समाजालाही आमच्यावरील अन्यायाची जाणीव करून देण आवश्यक आहे, असं मला वाटतं. अशा तऱ्हेने रस्त्यावर येण्यापूर्वी आम्ही शासनाला अनेकदा परिस्थितीची जाणीव करून दिली होती; पण त्याची दखल घेतली गेलीच नाही !

'तुमच्या या लढ्यात 'विद्यार्थ्यांचं काय ? असा प्रश्न वारंवार विचारला जातो; पण मी एवढंच सांगू इच्छिते की, विद्यार्थ्यांचा आम्ही पुरेसा विचार केलेला आहे. आम्हाला त्याचीही काळजी आहेच. किंबहुना संपाबाबत विचार करतानाही 'आपल्या मुलाच (विद्यार्थ्यांचं) कसं होणार ?' हा प्रश्न आम्हाला सतत होताच. शेवटी आम्हीही कोणाचे ना कोणाचे तरी पालक आहोतच. हेच विद्यार्थी पुढल्याही वर्षी आमच्यासमोर येणार आहेतच. तेव्हा ते कच्चे राहणार नाहीत, याची काळजी आम्ही यंदाही निश्चितच घेऊ. फार तर टर्म थोडी पुढे ढकलली जाईल. आम्हाला मे महिन्याची

पृष्ठ २८ वर

# अवती - भवती

शरद कृष्णन्

## □ चला... साहेब मोकळे झाले....

होणार होणार म्हणून गेले चार महिने गाजत असलेली कॉंग्रेस पक्षामधील फाटाफूट एकदाची झाली. त्याचे काय परिणाम व्हायचे असतील ते होवोत; पण एक गोष्ट तर झाली. १९६९ नंतर केवळ अनुनय करण्यात धन्यता मानणारे आमचे साहेब एकदाचे मोकळे झाले आणि भडाभडा मनमोकळे बोलू लागले. मुबई, पुणे, नगर, श्रीरामपूर...जागा बदलल्या तरी विषय एकच? कॉंग्रेस-फाटाफूट आणि मुद्दा...मुद्दा कसला? प्रत्येक भाषणात इंदिराजीना गुद्दा!! निवडणुका झाल्यापासूनच चव्हाणानी बाईंच्या बाबतीतील आपले धोरण बदलले होते. केवळ अनुनय करण्याचे दिवस संपले होते. स्वतःच्या विचाराला, कृतीला वाट मोकळी झाली होती. त्यामध्ये त्यांचे स्वत.चे कर्तृत्व क्रमी होते; पण अजून एक संधी आली होती, इतकेच. भले दिवस मागे पडले होते, खुर्चीही मागे होती. मग आता घाबरायचे कोणाला आणि कशासाठी? अशा विचारातून हे धारिष्टच निर्माण झाले होते. ब्रह्मानदजीनी साथ दिली आणि चव्हाण-रेड्डी जोडीचे राजकारण सुरू झाले. नुकत्याच घडून गेलेल्या ताज्या घडामोडीची उजळणी करण्याची माझी इच्छा नाही; परतु एक गोष्ट निश्चित की, राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीच्या वेळी संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीस पाठिंबा देताना इदिराजीचा सल्ला घेण्याचे दूरच, पण घेतला निर्णय बाईंच्या कानावर घालण्याचे सौजन्यही कॉंग्रेस-नेत्यांनी दाखविले नाही आणि बाई विथरल्या! त्यांच्या नकारात्मक राजकारणाला तेथूनच सुरुवात झाली. आपला गट सगती घेऊन कॉंग्रेस सोडण्याचा बाईंचा निर्णय त्याना महाग पडल्याखेरीज राहणार नाही. आज पक्षीय सत्तेची सूत्रे सांभाळणाऱ्या मंडळीना त्या जास्त त्रास देऊ शकल्या असत्या. एक तर त्यांची प्रतिमा पूर्ण डागळली आहे आणि शहा आयोगासमोर होणारी आतषबाजी या कलकित प्रतिमेच्याही ठिकऱ्या उडवून टाकीत आहे. अशा वेळीं स्वत:मागे संघटित पक्ष उभा करण्याची शक्यता त्यानी झिडकारली आणि विनाशाच्या दिशेने आणखी एक पाऊल टाकले. त्यांच्याभोवती जमा झालेल्या मंडळीमध्ये केवळ राजनिष्ठ मंडळीचा समावेश आहे. एक कमलापती आणि मीर कासीम यांचा थोडा-फार अपवाद वगळता दुय्यम आणि तिय्यम पातळीवरील जे लोक त्यांच्या-भोवती जमा झाले आहेत, त्यांच्या असण्याला फारसा अर्थ नाही. लोकसभा निवडणुकीमध्ये फाटाफूट झाल्यावर पराभूत झालेला आपला पक्ष, ताकद संघटित करण्याऐवजी फुटू पाहतो, हे लक्षात आल्यावर प्रचारक, कार्यकर्ते आणि सत्तेचे राजकारण करणारे नेते या सगळयानाच या बुडत्या जहाजामधील तरत्या भागावर जागा मिळविण्याची घाई झाली. पक्ष सोडून फारसा फायदा होण्यासारखी परिस्थिती उरली नव्हती. त्याबाबतीत बाबुजी, बहुगुणा, सत्पथी आणि कंपनीने अचूक वेळ साधून स्वतःच्या सुरक्षित भवितव्याची तरतूद करून ठेवली होती. आता बदललेल्या परिस्थितीमध्ये डावे-उजवे करायचे झाले तर चव्हाण-रेड्डीच्या मागे उभे राहणे शहाण-पणाचे ठरणार आहे, हे लक्षात घेऊन मडळी झपाटयाने त्यांच्यामागे उभी राहिली आहेत, रहात आहेत. कुंपणावरून चव्हाण-रेड्डी यांच्या बाजूला आलेल्या मंडळीमध्ये केरळमधील स्टिफन आणि आंध्रचे मुख्यमंत्री जे. वेंगल राव यांचा समावेश करता येईल. इंदिरा-कॉंग्रेसच्या भवितव्याबद्दल फारसे लिहिण्याचे प्रयोजन नाही. कारण सध्या हा सगळाच अंधारातील खेळ आहे. तथापि चव्हाण-रेड्डी यांच्याभोवती जी कॉंग्रेस आज उभी रहात आहे, तिची दखल घेणे अगत्याचे आहे. सामर्थ्यशाली संघटनेचे स्वरूप या गटाला नसले तरी हळूहळू शक्तिशाली होणारा, कॉंग्रेसच्या झेंडयाखाली उभा राहणारा लक्षणीय विरोधी गट म्हणून चव्हाण-रेड्डी नियंत्रित कॉंग्रेसला आज तरी बऱ्यापैकी स्थान मिळालेले दिसते. कॉंग्रेसला फाटाफूट तशी नवीन नाही; परंतु पक्ष अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये असताना, एका व्यक्तीने आपल्या हट्टापायी घडवून आणलेली ही फाटाफूट, पक्षावर प्रपाती घाव करणारी आहे. यापूर्वीचा इतिहास पाहिला तर, १९२२-२३ साली गांधीजी एका बाजूला आणि मोतीलालजी आणि देशबंधू दुसऱ्या बाजूला, असा ताण निर्माण झालाच होता. १९३९ साली सुभाषचंद्र बोस आणि त्यांचे सहकारी आणि गांधीजी यांच्यामध्ये वादावादी झालीच पुरुषोत्तमदास टंडन यानी कॉंग्रेस-अध्यक्षपद सोडले तेही तणावांमुळेच; पण आपण बाहेर पडायचे आणि आपणच कॉंग्रेस असल्याचे घोषित करायचे, असा अजब पायंडा इदिराजींनी पाडला आणि एका दशकामध्ये कॉंग्रेस दोनदा दुभंगली! १९६९ साली हे नाटक जमले. कारण बाईंच्या मागे सत्तेचे सामर्थ्य होते आणि पक्षांतर्गत ताकदीचे घसघशीत दानही त्यांना अनुकूल असेच पडले. आताचा त्याचा निर्णय आत्मघातकी आहे आणि चव्हाण म्हणतात त्याप्रमाणे, उत्तरेत मी हरले, दक्षिणेत तुमची सरशी होऊ देणार नाही, अशा नकारात्मक फूत्कारातून तो निघालेला आहे.

### निवडणुका ही कसोटी

जी कॉंग्रेस आज चव्हाण-रेड्डी बांधू पहात आहेत त्याची खरी कसोटी येऊ घातलेल्या विधानसभा-निवडणुकामध्ये लागणार आहे.

पृष्ठ २५ वर

# कॉंग्रेस

## फुटीनंतरचे आव्हान

वा. दा. रानडे

गेले काही महिने कॉंग्रेसमध्ये फूट पडलीच होती. त्याची अधिकृत घोषणा फक्त व्हावयाची राहिली होती, ती नववर्षारंभी इंदिरा-गटाचा स्वतंत्र मेळावा भरून झाली. आमचीच खरी कॉंग्रेस असा दावा इंदिरागट करील, असे 'माणूस' मधील 'बंगलोर ते बंगलोर' या लेखात मी म्हटले होते ते खरे ठरले; पण हा त्याचा दावा किती खोटा आहे हेही दिल्ली मेळाव्यास मिळालेल्या प्रतिसादावरून स्पष्ट झाले. सबंध कॉंग्रेसच्या नेत्या होण्याऐवजी इंदिराबाई कॉंग्रेसमधल्या फक्त एका अल्पसंख्य गटाच्या नेत्या झाल्या! १९६९ प्रमाणे बहुसंख्य कॉंग्रेसजन आपल्या मागे येतील, ही त्यांची अपेक्षा फोल ठरली. १९७८ म्हणजे १९६९ नव्हे, हे त्यांना दिसून आले. पक्षाची सर्व सूत्रे आपल्या हाती असली पाहिजेत, या इंदिरा गांधींच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपायी कॉंग्रेस फुटली. या फुटीमागे कोणतेही तात्त्विक मतभेद नव्हते. जनता सरकार विरुद्ध रेड्डी-चव्हाणांचे धोरण सौम्य आहे. अधिक लढाऊ पवित्रा घ्यावयास हवा, अशी इंदिरावाद्यांची मागणी होती. त्यांच्या धोरणात व कार्यक्रमात निराळेपणा होता तो एवढ्याच बाबतीत; पण त्यामागेही ठाम तात्त्विक भूमिका नव्हती. लोकांमध्ये काही बाबतीत असलेल्या असंतोषाचा फायदा घेऊन त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी स्वीकारलेले ते धोरण होते; पण जनता सरकारने अपेक्षा पुऱ्या केल्या नाहीत म्हणून लोकामध्ये काहीशी नाराजी असली तरी त्याची प्रतिक्रिया म्हणून लोक इंदिरा कॉंग्रेसला जवळ करणार नाहीत. आणीबाणीचा कटु अनुभव एकदा घेतल्यानंतर आता पुन्हा इंदिराजींच्या मागे जनता जाणार नाही!

इंदिरा गट फुटल्याने कॉंग्रेसवर आणि देशाच्या राजकारणावर काय परिणाम होतील, हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कॉंग्रेसवर काही परिणाम होणार नाही, असे कॉंग्रेस-नेते बाह्यत: म्हणत असले तरी कॉंग्रेस आणखी खिळखिळी होणार हे स्पष्ट आहे. आगामी विधानसभा—निवडणुकात कर्नाटक व आंध्रमध्ये याचा परिणाम विशेष जाणवेल. महाराष्ट्रात इंदिरा कॉंग्रेसला फारसा पाठिंबा मिळालेला नाही, तरीही दिवंगत केंद्रीय मंत्री आनंदराव चव्हाण यांच्या पत्नी खासदार श्रीमती प्रेमलाबाई चव्हाण यांच्या गटाचा पाठिंबा मिळवू. यशवंतराव चव्हाण याना शह देण्याचा इंदिरा गटाचा प्रयत्न असल्याच्या बातम्या आहेत. कॉंग्रेसने काही मित्रपक्षांशी समझोत्याची बोलणी केली होती. यांपैकी काही मित्रपक्ष, आपल्या धोरणाचा फेरविचार करीत आहेत. विदर्भात जांबुवंतराव धोटे याच्या नेतृत्वाखालील पुरोगामी गट इंदिरा-कॉंग्रेसशी समझोता करणार असल्याचे नाशिकराव तिरपुडे यांनी सांगितले. दलितांच्या आपणच कैवारी असून हरिजन, आदिवासी यांचा पाठिंबा आपल्या पक्षालाच मिळेल, असे इंदिरा गांधींना वाटते. रिपब्लिकन गवई गटाचा तसेच दलित पँथरचा पाठिंबा मिळविण्याच्या त्यांच्या हालचाली आहेत; पण हरिजन व आदिवासींची मते दोन्ही कॉंग्रेस-पक्षाऐवजी जनता-पक्षालाच मिळण्याचा अधिक संभव आहे. कारण या वर्गांचे सर्वसाधारण धोरण सत्ताधारी पक्षाला पाठिंबा देण्याचे असते. कॉंग्रेसमधील फूट लक्षात घेता महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्ष सत्तेवर येईल का, अशी शंका या वर्गांनाही वाटू लागली आहे. अस्पृश्यांना असलेल्या सवलती नवबौद्धांनाही मिळाव्यात, ही त्यांची मागणी जनता सरकारने अजून मान्य केली नसली तरी निवडणुकीच्या वेळी जनता पक्ष त्याबाबत समाधानकारक आश्वासन देण्याची शक्यता आहे. मित्रपक्षांपैकी कम्युनिस्टांची भूमिका काय राहील? आणीबाणीला पाठिंबा देण्यात आपली चूक झाली, असे मत त्यांच्या नॅशनल कौन्सिलने नुकतेच व्यक्त केले हे लक्षात घेता इंदिरा कॉंग्रेसला कम्युनिस्टांचा पाठिंबा मिळणार नाही. रेड्डी-चव्हाणांच्या कॉंग्रेसशी मात्र त्यांच्या समझोता होण्याचा संभव आहे. मित्रपक्षांपैकी आणखी एक पक्ष मुस्लीम लीगचा. त्यांचा पाठिंबा रेड्डी-चव्हाणांच्या कॉंग्रेसला राहील, असे त्या पक्षाचे नेते श्री. बनातवाला यांनी नुकतेच सांगितले इंदिरा कॉंग्रेसला खात्रीचा पाठिंबा महाराष्ट्रात फक्त श्री धोटे यांच्या पुरोगामी गटाचा मिळेल असे यावरून दिसते. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक आपल्या बाजूला येतील अशी आशा इंदिरा गांधींना वाटत होती; पण याबाबतीत त्यांची निराशा झाली. असे असले तरी अनेक ठिकाणी दोन्ही कॉंग्रेस-पक्षात लढती होतील व त्यांच्यापैकी कोणीच निवडून न येता त्याचा फायदा जनता पक्षास मिळेल.

संसदीय कॉंग्रेस पक्षात चव्हाणांच्याच बाजूला बहुमत आहे, असे दिसते. तेव्हा चव्हाणांच्या जागी दुसरा नेता निवडण्याच्या हालचाली इंदिरा गटाने केल्या तरी त्यात त्याला यश मिळणार नाही. उलट कमलापति त्रिपाठींनाच राज्यसभेतील कॉंग्रेस पक्षाचे नेतेपद गमवावे लागेल. दोन्ही गृहात इंदिरा गट आपले नवे नेते निवडील; पण त्याला पाठिंबा फार थोडा राहील, असे दिसते.

इंदिराव्यतिरिक्त कॉंग्रेस हा देशात प्रभावी पर्यायी पक्ष होऊ शकेल, अशी अपेक्षा जयप्रकाश नारायण यांनी लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर व्यक्त केली होती. रेड्डी-चव्हाणांची कॉंग्रेस असा प्रभावी पक्ष बनू शकेल का? लोकसभा निवडणुकीनंतर

पृष्ठ २९ वर

# चक्रम्‌चक्री (२८)

दीर्घस्मृती विश्वनाथ

# शिक्षणाचा गोंधळ

आपले पंतप्रधान मोरारजी देसाई यानी एस्. पी. कॉलेजच्या हीरक–महोत्सवात केलेलं भाषण बरीच खळबळ माजवून गेलं.

मोरारजींची भाषणं आणि त्यावरची शेरेबाजी ऐकली की, मला सॉमरसेट मॉमच्या एका गोष्टीची आठवण येते.

काय गोष्ट आहे ती ?

मॉमची एक 'जेन' नावाची गोष्ट आहे. जेन फौलर नांवाची एक साधीसुधी आणि आयुष्याच्या उतरणीला लागलेली विधवा होती. फार खटघाळ जिभेची. सगळे लोक तिच्यापासून लाब रहाण्याचा प्रयत्न करायचे. पुढे तिला गिल्बर्ट नांवाचा एक तरुण आर्किटेक्ट भेटला आणि दोघानी लग्न केलं. इटलीतल्या मधुचद्राहून दोघं परत आली आणि जेन एकदम गाजू लागली. श्रीमताघरच्या मेजवान्यांना तिला निमंत्रण येऊ लागली. ती मार्मिक आणि मिश्किल बोलते, अशी तिची ख्याती झाली.

असा काय तिच्यात एकदम फरक पडला ? फरक काहीच पडला नव्हता. जेनची एक जुनी मैत्रीण म्हणते देखील, 'She says just the same things as she's said for the last thirty-five years. I laugh when I see everyone else does, because I don't want to seem a perfect fool, but I am not amused.' झालं होतं इतकंच की पूर्वी विधवा असल्यानं एक कोरडेपणा जेनच्या अंगी होता, तो आता निवळला होता; आणि शादी–सुदा झाल्यानं नवऱ्याबरोबर तिलाही मेजवान्याना बोलावणी येत होती.

मोरारजींचही तसंच झालंय् खरं. गेली पंचवीस वर्षं मोरारजी हेच आणि असच बोलत आलेत. पण 'मोरारजी हट्टी आहेत', 'फॅडिस्ट आहेत', 'औचित्याला सोडून बोलतात' अशी त्यांची हेटाळणी होत असे. सर्वोच्च स्थानावर त्याची प्रतिष्ठापना झाली आणि त्यांचे सर्व विचार व भाषणे 'मार्मिक', 'डिव्हिष्टेटिंग', 'लोकांना फजित करणारी' अशा शेऱ्यांनी गौरविली जाऊ लागली.

मोरारजींच्या भाषणांचा सध्या होणारा आदर हा केवळ पंतप्रधानकीमुळे होत आहे, असे मला वाटत नाही. त्या आदराची आणखी दोन कारणे आहेत. एक म्हणजे मोरारजींचे वय. तुम्हाला आठवत असेल, चार–पाच वर्षांपूर्वीपर्यंत आपले महामहोपाध्याय पोतदारही विचूक समारंभाचा विरस करणारी भाषणे करीत. (हल्ली ते सहसा बोलतच नाहीत.) म्हणजे असं की, वक्ता जे काय बोलला असेल त्याच्या हमखास विरुद्ध ते बोलत. बरं, सगळ बोलणं युक्तिसगत असे, असही नाही; पण सभा सपवून घरी जातांना लोक मला म्हणत, 'पोतदारांनी वक्त्याची चागली तासली. मार्मिक बोलले.' कारण, लोकाना अजून पोतदार बोलतात, जुन्या आठवणी पाल्हाळिक पद्धतीने सांगतात, याचेच एक घरगुती आकर्षण असे. मोरारजींच्या भाषणाची स्तुती होण्याचे दुसरे कारण असे दिसते की, एकदा 'मार्मिक, विचारपरिप्लुत' अशी शेरेबाजी केली की, पुन्हा: त्या भाषणाचा विचार करण्याची जबाबदारी रहात नाही. शिवाय, जनता–सरकारचा सध्याचा कारभार पाहता, मोरारजी काय किंवा इतर कोणी काय, काहीही बोलले तरी ते विचार प्रत्यक्षात येण्याची शक्यता नाही. त्यामुळे मोरारजींच्या विचाराची कोरडी स्तुती केल्याने काहीच बिघडत नाही. असो; पण मोरारजीभाई असं बोलले तरी काय ?

## मोरारजींचे भाषण

झालं असं की, पुण्याच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयाचा हीरक-महोत्सव होता. अशा वेळी इतर शिक्षणसंस्था करतात तेच या कॉलेजनंही केलं. म्हणजे एक सुव्हनीर किंवा स्मरणिका काढून जाहिरातीतून दोन–तीन लाख रुपये मिळविले, इतर देणग्यांच्या रूपाने आणखी काही लाख गोळा केले आणि दोन–तीन इमारती बांधण्याचा संकल्प सोडला. शिक्षणसंस्थाची वाढ म्हणजे आणखी इमारती बांधणे, ही आपली ठाम समजूत आहे. तेव्हा या सकल्पात वावगे काहीच नाही. नंतर माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आणि त्या विद्यार्थ्यांनी शांताबाई शेळक्यांच्या भावगीतातील शब्दांत उकललेल्या हिरवट, निळसर, किंचित गुलाबी आणि माफक स्वप्नील आठवणींचे एक पुस्तक. आता या सगळ्या घडपडीची सागता दोन–तीन दिवसात करण्यासाठी एक सोहळा. त्याचा उपयोग सरकारी अनुदानासाठी व्हावा म्हणून एक–दोन मत्री पाहिजेतच. 'प्रधान मल्ल निर्बहण' या न्यायाने त्यांनी मोरारजीना बोलाविले.

*अहो, पण मोरारजी काय बोलले, ते तर सांगाल !*

सांगतो हो ! तर अशा त्या सोहळ्यात सडेतोड भाषण करताना पतप्रधानानी चार मुद्दे माडले. प्रथम त्यानी सागितले की, सध्या शिक्षणावर फार मोठा खर्च होतो आहे आणि तो सतत वाढतच आहे; पण इतका खर्च होऊनही त्याचे फळ मात्र कोठे दिसत नाही. फार मोठ्या सख्येने पदवीधर बाहेर पडत आहेत, इतकेच; परतु देशातील अशिक्षित, दरिद्री खेडूत जेवढा शात आणि प्रसन्न असतो, तितकेही हे पदवीधर शात आणि प्रसन्न नसतात. उलट ते वखवखलेले आणि चिडखोर झालेले आढळतात. तेव्हा मिळणाऱ्या *शिक्षणात काही त्रुटी आहेत,* हे उघड आहे. ही त्रुटी शिक्षकांतून आली असणार. म्हणून मोरारजीभाईंचा मोहरा शिक्षकांकडे वळला. ते म्हणाले की, शिक्षकांचे वर्तन अतिशय आक्षेपार्ह होत चालले आहे. ते मुलाना कॉपी करावयास शिकवतात, गाईडस् लिहितात, पगार वाढवा आणि काम कमी करा, अशी त्यांची मागणी असते. आपल्या गुरुजनांची अशी टर उडविलेली पाहून विद्यार्थ्यांनी

प्रशंसक हास्य केले. तेव्हा ताबडतोब मोरारजींनी त्यानाही फैलावर घेतले. तुम्हीही बेताल होत चालला आहात, परीक्षांचे पेपर्स सोपे हवेत, कॉपी करण्याची परवानगी हवी म्हणून तुम्ही दंगे करता, असे मोरारजींनी विद्यार्थ्यांना खडसावले. शेवटी प्राचीन गुरुकुलपद्धतीची प्रशसा करून आणि तो आदर्श आपण ठेवला पाहिजे, असे सांगून पंतप्रधानांनी भाषण संपविले. काय, आहे की नाही सडेतोड आणि मुद्देसूद भाषण !

छा., मला तरी तसे वाटत नाही. अहो, आता तुम्ही सागितलेला मजकूर जरा लिहून काढला तर तो 'सकाळ'मधल्या वाचकांच्या पत्रव्यवहारात शोभून दिसेल !

मग तुमचं म्हणणं काय, की मोरारजी चुकीचं बोलले ?

नाही, नाही. हा चूक-बरोबरचा प्रश्न नाही. फालतू की महत्त्वाचं, असा हा प्रश्न आहे. मोरारजीसारख्या उच्चपदस्थ व्यक्तीनं इतक्या महत्त्वाच्या समारंभात इतकं फालतू बोलावं आणि वर्तमानपत्रानी व श्रोत्यातल्या सुजाण व्यक्तीनी विचारपूर्ण भाषण म्हणून त्याची स्तुती करावी, ही आश्चर्याची गोष्ट आहे.

## प्रश्नाची मांडणी

अशी शेरे-बाजी करू नका. नक्की फालतूपण कोठे आहे, ते सांगा.

असं पहा की, मोरारजींनी सागितलं त्यात नवं काय आहे ? शिकलेल्या व्यक्तींना पांढरपेशाने जगावेसे वाटते, त्यामुळे त्यांची हाव एका बाजूने वाढत आहे आणि दुसऱ्या बाजूला नोकऱ्याची उपलब्धी कमी होत असल्याने सुशिक्षित बेकाराचे वखवखलेले तांडे हिंडताना दिसतात, हे आपण गेली अनेक वर्षे ऐकत आलो आहोत. अहो, चिरोलच्या आणि मेयोबाईच्या पुस्तकातही असे उल्लेख आहेत; म्हणजे ५० वर्षे झाली ! विद्यार्थी कॉपी करतात आणि शिक्षकांचं वर्तनही बिघडत चाललंय्, हेही ऐकून आपण कटाळलो. गुरुकुलपद्धती नक्की काय होती आणि निखालस चागली होती हे कुणी तपासलं आहे ? उगा काही तरी बोलायचं आणि प्राचीन पद्धतीचे गोडवे गायचे, यात काय शहाणपण आहे ? प्रश्न महत्त्वाचा आहे, पण मोरारजींनी त्याची केलेली मांडणी अगदीच उथळ आहे.

मग तुम्ही कसा मांडाल हा प्रश्न ?

प्रश्नाचे दोन भाग आहेत. प्रथम आपण सुशिक्षित (किंवा पदवीधर म्हणा) माणसं बुभुक्षित दिसतात आणि अशिक्षित खेडूत समाधानी आढळतो, हा विचार घेऊ. असं असणं अगदी साहजिक आहे. कारण आपला समाज शिक्षणाकडे पाहतो तेच मुळी कनिष्ठ वर्गीयांना वरिष्ठ वर्गात जाण्याची ती एक शिडी आहे, या दृष्टीने. मागे मी तुमच्याशी बोललो होतो, या बाबतीत.

आठवतंय् ते मला.

तेव्हा जोपर्यंत काही वरिष्ठ आणि विशेष अधिकार असणारे वर्ग आहेत आणि त्या वर्गांत शिरकाव करून घेण्याचा राजमार्ग म्हणून शिक्षण घेतले जात आहे, तोपर्यंत शिक्षण पूर्ण केलेला माणूस हावभरी आलेला असाच आढळणार. तेव्हा यावर मार्ग दोनच आहेत. एक तर शिक्षणाचा आणि वरिष्ठ वर्गात समावेश होण्याचा संबंध तोडून टाकला पाहिजे किंवा आपली अर्थशक्ती इतकी विकास पावली पाहिजे की, शिक्षण पूर्ण झालेल्या प्रत्येकाला काही अधिकार आणि प्राप्ती मिळू लागेल. मुद्दा असा की, हा प्रश्न केवळ शिक्षणक्षेत्रांतील नसून सामाजिक आहे. सध्याची शिक्षणपद्धती बदलून गुरुकुलपद्धती आणली तरी त्यात काही फरक पडेल, असे नाही.

## धाब्यावर बसलेली शिस्त

पण कॉपी आणि गाईड्स् हे तरी शिक्षणक्षेत्रातले प्रश्न आहेत की नाहीत ?

आहेत ना; पण त्याचाही थोडा खोलवर विचार केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी कॉपी करू नये, शिक्षकांनी गाईड्स् लिहू नयेत, असे आपण का म्हणतो ? तर, शिक्षणपद्धतीची जी शिस्त आहे तिचा भंग होतो म्हणून. आता शिक्षण-पद्धतीची जी शिस्त आहे, तिचा पाया काय आहे ? मला वाटतं, आपण सध्या चालवत असलेली शिक्षणपद्धती स्पर्धात्मक आणि व्यक्तिप्रधान आहे. या दोन गोष्टी मान्य असलेले शिक्षक आणि विद्यार्थी जोपर्यंत शिक्षणक्षेत्रात होते, तोपर्यंत शिस्तीचा प्रश्न येत नव्हता.

जरा उदाहरणे देऊन बोला ना.

सागतो. असं पहा, तुम्ही-आम्ही विद्यार्थी असताना कॉपी करत होतो का ? का करीत नव्हतो ? सुपरवायझर पकडील म्हणून ?

छे. तसं मुळीच नाही. अहो, कित्येकदा तर हॉलमध्ये सुपरवायझर नसायचा देखील ! आमचे डॉ. राव होते, प्रोफेसर. ते तर टघुटोरिअलच्या वेळेला सागूनच जात, की माझा तुमच्यावर विश्वास आहे, मी पहारा करणार नाही ! पण कोणी कॉपी करीत नसे

ते खरंच आहे; पण आपण कॉपी का करीत नव्हतो ?

कारण असं की, समजा एक प्रश्न मला येत नाही आणि 'क्ष'ला येतोय्. तर मी 'क्ष'ची कॉपी करीन; पण मला वाटायचं, मला कमी मार्क्स मिळाले तरी चालतील, मी 'क्ष'ची कॉपी करून त्याचा ओशाळा रहाणार नाही ! दुसरं असं की, 'क्ष' तरी मला त्याची कॉपी का करू देईल ? मग त्याला माझ्यापेक्षा जास्त मार्क्स कसे मिळणार ?

हा. म्हणजे तुम्ही आणि तो 'क्ष' हे एकमेकाचे स्पर्धक असल्याने कॉपी करीत नव्हता. तुम्ही दोघांनीही परीक्षेची आणि एकूण शिक्षणाची स्पर्धात्मकता मान्य केली होती. आता सुमारे ८०% मुलं अशा घरातून शिक्षणासाठी येतात की, जिथे त्यांच्या अंगी ही स्पर्धा बाणविलीच जात नाही. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या सद्विचारावर वाढलेली ही तरुणाई स्पर्धा मानायलाच तयार नाही. त्यामुळे कॉपी करण्याची जी लाज तुम्हा-आम्हाला वाटत होती, ती यांना वाटत नाही. त्यामुळे 'समूहलेखन' चालते. आता अशा स्थितीत इन्व्हिजिलेटर काय रडणार ?

तथ्य आहे तुमच्या म्हणण्यात.

जिथे स्पर्धा मान्य आहे, तिथे गोष्टी व्यवस्थित पार पडतात. आता सी. ए. किंवा आय्. सी. डब्ल्यू. ए. च्या परीक्षा घ्या. अवघे २-३% विद्यार्थी पास होतात; पण कॉपी, पेपर्स फुटणे या गोष्टी होत नाहीत किंवा निकाल कमी लागला म्हणून सी. ए. च्या इन्स्टिटयूटवर मोर्चे गेलेत, असेही ऐकले नाही. आज पुणे युनिव्हर्सिटीच्या बी. ए. चा किंवा बी. एस्सीचा निकाल २-३% लागला, (तेव्हढाच तो खरं पाहिलं तर लागेल) तर काय होईल ? कुलगुरूंना राजीनामा द्यायला लागेल ! (आता सध्याचे कुलगुरु राजीनामा न देता दुसरा काही उपाय काढतील, ते निराळे.)

### असे का झाले ?

ते राहू द्या हो; पण चालू शिक्षणपद्धतीची स्पर्धात्मकता आणि व्यक्तिप्राधान्य मान्य नसलेली ही तरुणाई शिक्षणक्षेत्रात एकाएकी कोठून अवतरली ?

बरोब्बर विचारलेत ! महाराष्ट्रापुरते बोलायचे तर, महाराष्ट्र सरकारने जेव्हा कमी उत्पन्नाच्या गटातील लोकांना फुकट शिक्षण देण्याची व्यवस्था केली तेव्हापासून हा प्रश्न उत्पन्न झाला, असे म्हटले पाहिजे. म्हणजे आता जवळ जवळ वीस वर्षे झाली.

मग तुमचं म्हणणं काय, की महाराष्ट्र-सरकारने ही चूक केली ?

तसं अजिबात नाही. शिक्षणाची हौस असलेल्या कुणाचेही शिक्षण पैशाविना अडू नये, हे योग्यच आहे; पण महाराष्ट्र सरकारने हा निर्णय घेतल्यावर शिक्षण क्षेत्रातील धुरीणांनी त्याच्या परिणामांचा विचार करायला हवा होता. त्यांनी हे लक्षात घ्यायला हवे होते की, आता विद्यार्थ्यांच्या संख्येत प्रचंड फुगवटा निर्माण होणार आहे. इतकेच नाही, तर नवीन येणारा विद्यार्थी शिक्षणाच्या परंपरेशी, शिस्तीशी आणि रीति-रिवाजांशी पूर्णपणे पारखा असलेला, असा आहे. तेव्हा आपल्यासमोर दोन पर्याय आहेत; एक तर शिक्षणाची शिस्त आम्ही अजिबात सैल करणार नाही, पेपर्स सोपे काढणार नाही, मार्क्स वाटणार नाही, परीक्षेच्या वेळी पहारा कडक ठेवू, निकाल वाढवणार नाही. नापास झालेले विद्यार्थी खवळले आणि त्यांनी दंगे-धोपे केले तरी नमणार नाही ! दुसरा पर्याय असा की, शिक्षण, जे स्पर्धात्मक आणि व्यक्तिप्रधान आहे, ते बदलून नवा विद्यार्थी ज्या परंपरेतून आला आहे, त्या परंपरेशी सुसंगत असे त्याचे स्वरूप ठेवू; पण दुर्दैवाने तेव्हा या प्रश्नाचा असा विचार झालाच नाही. ठिकठिकाणी कॉलेजेस् निघत गेली. तिथल्या प्राध्यापकांना विद्यार्थ्यांची स्थिती माहीत असल्याने फालतू प्रश्नपत्रिका आणि थातुरमातुर तपासणी चालू झाली. त्यामुळे मूळच्या मध्यमवर्गीय स्पर्धाळू विद्यार्थ्यांवर मार्कांचा आणि फर्स्ट-क्लासेसचा पूर लोटला. ८०% विद्यार्थ्यांना स्पर्धा मान्य नसल्याने, जमेल तेवढ्या अभ्यासाने परस्परांची मदत घेत पास होणे, एवढाच हेतू त्यांच्यापुढे उरला. त्यामुळे परिस्थिती सध्या अशी आहे की, पहिल्या पर्यायाचा स्वीकार आता करू म्हटले तरी करता येणार नाही !

म्हणजे उरला फक्त दुसरा पर्याय. शिक्षण-पद्धतीतली स्पर्धा आणि व्यक्तिप्राधान्य काढून टाकणे.

पण तोही सोपा नाही. स्पर्धा आणि व्यक्तिप्राधान्य काढून शिक्षण सहकार्य आणि समूहप्राधान्य यावर उभे करायचे. याला अतिशय उच्च दर्जाची प्रतिभा आणि कर्तृत्व लागेल. एक मोठे विचारमंथनच घडवून आणावे लागेल; पण आपल्या शिक्षणक्षेत्रात अहंभावीवृत्तीची जी दादामंडळी आहेत, ती स्वत: नवीन विचार करणार नाहीत आणि दुसऱ्याचा नवा विचार पुढे येऊ देणार नाहीत. सध्याच्या सावळ्या गोंधळाशी त्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत, त्याला काय करणार ?

□

आर्थिक टिपणे

# श्री. कार्टर यांची भारत–भेट

नारायण वैद्य, माजी उपमहापौर, पुणे

अमेरिकेचे अध्यक्ष श्री. जिमी कार्टर व भारताचे पंतप्रधान यांच्यामधे झालेल्या चर्चेत अणुविषयक सहकार्य हा एक महत्त्वाचा विषय होता. ह्या विषयातील दोन्ही देशांतले मतभेद पूर्णपणे मिटतील, अशी अपेक्षा फारशी कोणी केली नव्हती. कारण केवळ तांत्रिक सहकार्यापुरता किंवा एखाद्या गरजू राष्ट्राला सहजपणे मदत करावी, इतका हा प्रश्न साधा व सोपा नव्हे. तसेच या प्रश्नाला केवळ आर्थिकच बाजू आहे असे नाही, तर मोठी राजकीय पार्श्वभूमी असलेला हा विषय आहे आणि यात केवळ भारत–अमेरिका यांच्यामधल्या राजनीतीचा संबंध नाही तर जगातल्या राजकारणाच्या विविध पैलूंचा संबंध, अमेरिकेने या प्रश्नाशी निगडित धरलेला आहे. म्हणून या प्रश्नावर दोन्ही देशात पूर्वीपासून काही मतभेद असले तरी ते दिल्लीच्या चर्चेत काही प्रमाणात कमी झाल्याचे जाणवते, हा अध्यक्ष जिमी कार्टर यांच्या भारत–भेटीचा लाभ होय.

तारापूर अणुशक्ति केन्द्राला सुधारित युरेनियमचा पुरवठा सतत होत रहावा, हा प्रश्न तातडीचा होता आणि या केन्द्राचे कार्य चालू राहण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षात तो महत्त्वाचा होता. आता सध्या काही दिवस यातली काळजी दूर झालेली आहे. कारण ७·६ टन सुधारित युरेनियम तारापूर केन्द्रासाठी ताबडतोब पाठविण्याचे श्री. कार्टर यांनी ठरविले आहे. तसेच आपल्या अणुशक्ति निर्मितीच्या प्रकल्पांना लागणारे हेवीवॉटर हेही अमेरिकेच्या कोटयातून पुरविण्याचे श्री. कार्टर यांनी मान्य केले आहे. (कारण नुकत्याच झालेल्या स्फोटामुळे बडोद्याचे अणुविषयक प्लान्ट काही काळ बंद राहणार असल्यामुळे हेवी वॉटरची आता अधिक जरुरी आहे.)

या प्रश्नाच्या पार्श्वभूमीसंबंधी १७ सप्टेंबर १९७७ च्या 'माणूस' च्या अंकात काही माहिती मी दिली होती. अणुशक्तीचा उपयोग शांततामय कार्यासाठी करण्यास परस्पर सहकार्य देण्यासंबंधीचा भारत–अमेरिका करार २५ ऑक्टोबर १९६३ ला अस्तित्वात आला. या करारानुसार अणुशक्ति केन्द्राला सुधारित युरेनियम तहहयात (लाइफ टाइम) अमेरिकेने पुरवायचे, अशी तरतूद आहे. तसेच या करारात नमूद केल्याप्रमाणे, भारताने International Automic Energy Agency बरोबर त्रिपक्ष–करार केला व त्यानुसार सदर एजन्सीने तारापूर प्लान्टची नियमितपणे तपासणी करावयाची, हे बंधन भारताने मान्य केले. तारापूर भट्टीमधील कोणतेही अणुविषयक पदार्थ वा द्रव्य अणुशस्त्रांची निर्मिती करण्यासाठी भारताने वापरावयाचे नाही, असे अ

होती. ही अट भारताने काटेकोरपणे पाळलेली आहे, असे अमेरिकन सरकारने वेळोवेळी याबाबत प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्तात मान्य केले आहे. उलट तारापूर रिॲक्टर्समधे इंधन म्हणून सुधारित युरेनियम वापरल्यानंतर जी रक्षा बाहेर पडते ती पुन्हा खरेदी करण्याची तरतूद करारात असताना तसे करण्यासही अमेरिका तयार नाही. तसेच या रक्षेपासून प्लुटोनियम तयार करण्याची तयारी भारतीय शास्त्रज्ञानी दाखविली आहे; पण त्याला अमेरिकेची परवानगी नाही.

अमेरिकन काँग्रेससमोर याविषयीचा एक ठराव आलेला आहे. तो १८ ते २४ महिन्यांमध्ये पास झाल्यावर त्याचे कायद्यात रूपांतर होईल व त्यानुसार अणुभट्टयांना इंधनाचा पुरवठा करण्याबाबत सुरक्षिततेच्या काही कडक अटी लादल्या जातील. त्यामुळे निर्माण होणारी अडचण श्री. जिमी कार्टर यानी दिल्ली मुक्कामात स्पष्ट केली. एकदा हा कायदा अमेरिकन काँग्रेसने पास केला की, अमेरिकेकडून तारापूर अणुशक्ति केन्द्राला होणारा इंधनाचा पुरवठा शाश्वतीचा राहणार नाही. तसेच या कायद्याचा फार दूरगामी परिणाम भारताच्या अणुविषयक कार्यक्रमावर होईल. भारतामध्ये जे जे अणुविषयक प्रकल्प आहेत.—मग ते इतर देशांच्या सहकार्याने उभारलेले असोत वा स्वदेशी साहित्य, स्वदेशी तंत्रज्ञान व स्वदेशी संशोधन यांच्यमधून उभारलेले असोत— त्या सर्वांची तपासणी करण्याचा हक्क या कायद्यानुसार अमेरिकेला पोचेल, तसेच केवळ अणुशास्त्रविषयकच नव्हेत, तर शांततेच्या कार्यासाठी जे अणुतंत्रविज्ञान आपण वापरीत आहोत, त्याचीही तपासणी करू द्यावी लागेल.

तेव्हा या वादात आता केवळ स्वाभिमानाचाच प्रश्न उरला नाही, तर स्वावलंबनाचाही गभीर मुद्दा निर्माण झाला आहे. देशाच्या ऊर्जानिर्मितीमध्ये दिवसेंदिवस अण्विक शक्तीचा सहभाग अधिकाधिक वाढतो आहे. कोणत्याही परिस्थितीत भारत अण्वस्त्राची निर्मिती, साठा वा उपयोग भारत करणार नाही, असे निःसंदिग्ध आश्वासन पंतप्रधान श्री. मोरारजी देसाई यांनी अमेरिकन अध्यक्षाना दिलेले असले तरी त्यांचे समाधान झालेले दिसले नाही. श्री. कार्टर, त्यांचे सेक्रेटरी ऑफ स्टेट श्री. सायरस व्हन्स् यांच्याजवळ 'अणुइंधनाच्या प्रश्नाबाबत श्री. मोरारजी देसाई थोडे निग्रही आहेत!' असे म्हणाल्याचे वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहे. हे खरे असेल तर याबद्दल श्री. मोरारजी देसाई यांचे जरूर अभिनंदन केले पाहिजे. मला वाटते, श्री. मोरारजी देसाई यांनी यापुढच्या काळात या प्रश्नाबाबत अमेरिकन अध्यक्षाशी सतत संपर्क राखून अमेरिकन काँग्रेसच्या आगामी कायद्यात या प्रश्नावर विकसनशील देशांना काही प्रमाणात सूट मिळेल, असा बदल करण्याची खटपट करावी. भारत आणि अमेरिका यांच्यामधल्या या वादात स्वाभिमान विकला जाऊ नये हे तर खरेच; परंतु श्री. कार्टर यांचे मनात भारताविषयी सहानुभूती आहे, विकसनशील देश म्हणून भारत करीत असलेल्या प्रगतीबद्दल आदर आहे व प्रचंड लोकसंख्येचा हा देश लोकशाही व मानवीमूल्य यांना प्राणापलीकडे जपतो, यावर त्यांची श्रद्धा आहे,असे अमेरिकन अध्यक्षांच्या दिल्लीतील मुक्कामातल्या एकूण बोलण्याचालण्यावरूनं वाटते. हा लाभ भारताच्या दृष्टीने फार मोठा आहे.

त्याशिवाय इतर अनेक क्षेत्रात भारत–अमेरिका सहकार्य नव्याने उदयास येईल आणि वाढीस लागेल, हा या सदिच्छा भेटीचा सर्वांत मोठा फायदा आहे. अमेरिकेच्या उपग्रहांनी नैसर्गिक साधनसंपत्ती व हवामान यांच्याविषयी जी महत्त्वाची माहिती जमा केली आहे, ती भारताला उपलब्ध करून देण्याची तयारी अमेरिकन अध्यक्षांनी दर्शविली आहे. सूर्यशक्तीची निर्मिती व उपयोग याचे तंत्रविज्ञान, कृषि-संशोधन कार्यक्रम, अन्न-धान्यनिर्मितीचा वेगवान कार्यक्रम यामध्ये अमेरिकेने सर्वतोपरी सहकार्य करण्याचे मान्य केले आहे. याबाबत एवढेच सुचवावेसे वाटते की, कोणत्याही क्षेत्रांत परदेशांचे सहकार्य घेताना पूर्णपणे त्यांच्यावर आपण अवलंबून आहोत असे घडता उपयोगी नाही. आपले तंत्र-विज्ञान, आपल्या शास्त्रज्ञाची बौद्धिक शक्ती व संशोधन आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कमी पडते, असे मानण्याचे कारण नाही. □


विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

परराष्ट्रीय घडामोडी

# 'आग्नेय' आशिया (?)

चंद्रशेखर पुरंदरे

आग्नेय आशिया हा खऱ्या अर्थाने 'आग्नेय' (अग्निवत् जळणारा) आशिया झालेला आहे. व्हिएतनाम, कंबोडिया, इंडोनेशिया, थायलंड या सर्व देशांत अलीकडेच परत हिंसाचाराची लाट आलेली आहे.

**व्हिएतनाम–कंबोडिया युद्ध :** व्हिएतनाम आणि कंबोडिया या दोन देशांतील गेल्या काही महिन्यातील तप्त व तंग वातावरण लक्षात घेता युद्धाला तोंड फुटणार, हे दिसतच होते. फक्त पुढाकार कोणी घ्यायचा एवढाच प्रश्न होता. तोही प्रश्न दोघानी साधारण एकाच वेळी प्रचंड प्रमाणावर सैन्याच्या हालचाली करून सोडविला. 'पॅरट्स् बीक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात युद्धाला तोंड लागल्याचे नॉम पेन्ह रेडिओवरून सांगण्यात आले.

ते नीन या होची मिन् सिटीपासूनच्या सुमारे पन्नास मैलावरच्या प्रदेशात कंबोडियाने हल्ला केला. हा हल्ला अपेक्षितच होता. त्याला उत्तर म्हणून व्हिएटनामने स्वेरिएंग या कंबोडियाच्या हद्दीतील प्रदेशात हल्ला केला. होची मिन् सिटी म्हणजेच पूर्वीची दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगाव होय. राजधानीपासून इतक्या जवळ हे युद्ध चालू असल्याने अर्थातच कडेकोट बंदोबस्ताने आणखी काही कालपर्यंत युद्ध चालू ठेवण्याची तयारी दोन्ही बाजूंनी केलेली दिसते. व्हिएतनामने आपल्या सैन्याची नववी डिविजन तेथे उभी केली आहे. याच डिविजनने १९७५ साली सायगाव बळकावले होते. १३० मि. मि. च्या रशियन बनावटीच्या त्वरित हालचाल करणाऱ्या बंदुका, T62 टॅंक्स आणि डझनभर अमेरिकन बनावटीचे स्काय रेडर्स या नवव्या डिविजनच्या दिमतीला आहेत. कंबोडियातर्फे त्यांच्या संपूर्ण सैन्याच्या एकचतुर्थांश म्हणजे सुमारे ८०,००० सैनिक युद्धात गुंतलेले आहेत. किरकोळ चकमकी गेल्या महिनाभर चालूच होत्या; पण आता त्यांनी गंभीर रूप धारण केले आहे. सुमारे २,००० व्हिएटनामी आतापर्यंत ठार मारल्याचा दावा कंबोडियाने केला आहे आणि थायलंडतर्फे बँकॉकमधून करण्यात आलेल्या २०,००० तुकड्या युद्धात गुतल्या आहेत. या अतिरंजित वृत्ताकडे जरी दुर्लक्ष केले तरी युद्धाचा रंग गंभीर दिसतो. दोन्ही देशांची आर्थिक परिस्थिती हलाखीचीच आहे. कंबोडियामध्ये तर दहशतीचे वातावरण कायम अस्तित्वात आहे. अर्थात् परवापरवापर्यन्त असा समज जगभरही होता; पण नुकत्याच आलेल्या एका वार्तेनुसार दहशतीचे प्रमाण फारसे नसावे. थायलंडमधील स्वीडनचा राजदूत ख्रिस्तोफर ज्यां ओबेर्ग याने दिलेले हे वार्तापत्र होय. या राजदूताने कंबोडियामध्ये साधा प्रवासी म्हणून एका टूरिस्ट कंपनीतर्फे ख्रिसमसनिमित्त दोन दिवस प्रवास केला. कंबोडियामध्ये शिरकाव करून पश्चिमेकडे वार्ता प्रसृत करणारा हा गेल्या दोन वर्षांतील पहिलाच वजनदार माणूस असल्याने साहजिकच त्याच्या माहितीला महत्त्व प्राप्त झाले.

त्याने सांगितल्याप्रमाणे कंबोडियामध्ये सध्या पैसा अस्तित्वात नाही. म्हणजे कोणताही माणूस काहीही विकू शकत नाही अगर विकत घेऊ शकत नाही. जीवनावश्यक वस्तूंच्या गरजा भागविण्याचे काम सरकारचे आहे आणि प्रचंड मेहनत एवढीच एक गोष्ट सरकार लोकांकडून अपेक्षिते, त्यामुळे संपूर्ण जनता उत्पादनाच्या कार्यात सरकारने आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पार पाडण्यात मग्न आहे. त्यांच्यात भीतीचे वातावरण नाही तर कर्तव्याच्या जाणिवेतून हे काम होत आहे.

स्वीडिश सरकारला मात्र हा आपल्या राजदूताचा आगाऊ उद्योग फारसा आवडलेला नाही. या ओबेर्गने टेलिव्हिजनवरच्या मुलाखतीत वरील गोष्टी सांगितल्यानंतर स्वीडिश परराष्ट्र मंत्रालयाने या साऱ्या मताशी स्वीडिश सरकारचा काहीही संबंध नसल्याचे सांगून, ती राजदूताची खाजगी जबाबदारी होती असे कानांवर हात ठेवले आहेत.

**थायलंड :** कंबोडियाच्या उपरिनिर्दिष्ट आलबेल परिस्थितीवर विश्वास ठेवायलाही हरकत नव्हती; पण थायलंडमध्ये जी आसपासच्या देशातून म्हणजे लाओस, व्हिएतनाम आणि कंबोडियामधून निर्वासितांचा अखंड ओघ चालू आहे त्याचे (किमान कंबोडियन्सचे तरी) स्पष्टीकरण देता येत नाही. ख्मेर राजवटीत परत जायचे म्हणजे सरळ सरळ मृत्यूलाच निमंत्रण द्यायचे, अशी निर्वासितांची खात्री आहे.

हा निर्वासितांचा प्रश्न थायलंडच्याही जिवावर बेतला आहे. त्यामुळे नव्यानेच कायदे करून त्यावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नात सरकार आहे. विएतनाम आणि लाओस यांच्यातून येणाऱ्या निर्वासितांच्या नुसत्या संख्येवर जरी नजर टाकली, तरी काय प्रमाणात थायलडच्या अर्थव्यवस्थेवर ताण पडत असेल, हे लक्षात येईल. एकट्या लाओसमधूनच एक लाख लोक पुनर्वसन न झालेल्या अवस्थेत थायलडमध्ये हजर आहेत. याखेरीज निरनिराळ्या कॅंप्समध्ये सामावून घेण्यात आलेले ७५,००० निराळेच. शिवाय यांच्यापैकी कोणालाच परत जाण्याची इच्छा नाही. इंडोचायनामध्ये कम्युनिस्ट राजवट स्थिर होऊ पहात असल्याने या परत पाठविण्यात आलेल्या निर्वासितांना 'शिक्षण' देण्यात येते. हे 'शिक्षण' म्हणजे रशियातील सैबेरियात करण्यात येणाऱ्या ब्रेन वॉशिंगचीच छोटी आवृत्ती असते. त्यामुळे हे शिक्षण घेण्यास परतण्याची लाओशियन निर्वासिताची तयारी नाही. व्हिएतनामची तर गोष्ट आणखीनच निराळी आहे. तिथल्या सरकारलाही हे निर्वासित परत नकोत आणि निर्वासितांनाही देश परत नको पण थायलंडलाही उपरे नको असल्याने त्याने नुकतांच एक कायदा पास केला.

या कायद्यान्वये थायलंडमध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक निर्वासिताला चौकशीला तोंड द्यावे लागेल. जर त्याने ती चौकशी नाकारली तर त्याला जिथून तो आला तेथे परत पाठविण्यात येईल. आतापर्यंत या कायद्याची अंमलबजावणी तितक्या कडकपणे झालेली नाही; पण नवीन येणाऱ्यांच्या संख्येत घट झाली आहे.

यूनोने यासाठी निर्वासितांना अपील करण्याची परवानगी तरी राखून ठेवण्याची विनती केली आहे. तेवढे आश्वासन युनोला मिळाले आहे. तसेच ऑस्ट्रेलियाशी थायलंडचे असलेले संबंध लक्षात घेता, ऑस्ट्रेलियाने याबाबतीत केलेली मध्यस्थीही यशस्वी होण्याची काही काळपर्यंत तरी शक्यता आहे.

पण जगभरच्या मानवी हक्कांचे रक्षण करण्याची जबाबदारी आपलीच आहे, अशा वृत्तीने वागणाऱ्या पाश्चिमात्यांना मात्र थायलंडने निर्वासितांचा प्रश्न आम्ही सोडवितो त्या पद्धतीने तुम्हाला मंजूर नसेल तर त्यांना तुम्हीच पोसा, असे सांगून सध्या तरी गप्प केले आहे.

आग्नेय आशियातील इंडोनेशियातील सुहार्तोंच्या राजवटीतील राजकीय गुन्हेगारांची कहाणी पुढच्या लेखात पाहू. □

ही कथा घडली तो काळ जुना आहे – १९०५ च्या आसपासचा. पण एका गुप्तहेराला काय दिव्यातून जावं लागतं, याची ही एक झलक...

# रेडविटझ प्लॉट

मूळ लेखक :
डकवर्थ ड्रयू

अनुवाद :
रवींद्र देशपांडे

स्वादिष्ट भोजनावर ताव मारून मी मजेत रशियातल्या 'बाबादव्ली' या उच्च प्रतीच्या सिगरेटचे झुरके मारत होतो. क्युबात हॉटेलची ख्याती जगभर होती. मॉस्कोमधलं एर्मिटेन आणि पिटस्बर्गमधलं क्युबात हीच रेस्टॉरटस् जगविख्यात होती. चालू घडामोडीविषयीच्या बातम्या अगदी रस घेऊन ऐकत असल्याचं ढोंग करत होतो; पण गजबजलेल्या ह्या हॉटेलातील एका दुकलीवर माझं लक्ष खिळून होतं. माझ्याच मागून ही दुक्कल आत आली होती आणि माझ्याजवळच टेबल त्यांनी मिळवलं होतं. त्याचा जेवणाचा मस्त बेत चालला होता, अगदी सावकाशपणे. पोरगी तरुण होती, सुदर होती. तिचे डोळे नाचरे होते. भुवया तर कोरीव होत्या. अंगात संध्याकाळचा गाउन होता. तिच्यासमवेत आलेला वयस्कर, दाढीवाला माणूस अगदी बेरकी वाटत होता. त्याच्यापुढे ती पोरगी अगदी मस्तच वाटत होती. तिच्या गळ्यात सोन्याचा कंठा होता आणि तिचे काळेभोर केस, रेखीव अवयव आणि बोलके व नाचणारे डोळे यांत तो कठा अगदी उठून दिसत होता. त्यांचं बोलण कान देऊन मी ऐकण्याचा प्रयत्न करीत होतो, पण जमत नव्हतं. पाऊण तास मी त्याना न्याहाळत होतो. अधूनमधून त्या मुलीचे डोळे माझ्यावरुन फिरत होते. मी पुरता मोहित झालो होतो. एवढ्यात रस्त्यावरून एक वृत्तपत्र विक्रेता आत आला आणि एक-एक टेबल घेत तो माझ्या टेबलाजवळ आला.

'हे तुमच्यासाठी,' तो रशियन भाषेत घाईघाईने म्हणाला, 'पाच कोपेक द्या आणि कुणाचही लक्ष वेधू नका. कोन्या समासात बघा!' असं हलकेच म्हणून त्याने गठ्ठ्यातला एक अक ठेवला. मी चटकन् पाच कोपेकचं नाणं त्याच्याकडे फेकल आणि वर्तमानपत्रावर नजर टाकली. पेन्सिलने फ्रेंच भाषेत लिहिलेल्या पुसट ओळी पाहिल्या. त्याचा आशय 'निकोलस लेविटस्की आणि पाउलिन ओझरॉफ, जे तुमच्या विरुद्ध बाजूला बसलेत त्यांच्यापासून सावध राहा. गुप्तहेरखात्याचे हस्तक आहेत.'

मी पुरता हबकून गेलो. कुणी कळवलं असावं, ह्याचा विचार करीत होतो.

पधराच दिवसांपूर्वी नॉर्ड एक्सप्रेसने मी लंडनहून निघालो आणि पीटस्बर्गमधली एक नाजुक कामगिरी मी शिरावर घेतली. पीटस्बर्गमधलं गुप्तहेर खातं जोरात होतं. पीटस्बर्ग मध्ये मी पूर्वी आलेलो असल्याने माझी माहिती त्यांच्या रेकॉर्डवर असणं शक्य होत. रशियात गुप्तहेर म्हणून जाणं म्हणजे मरेतोपर्यंत तुरुंगवासाची सजा घेण्याच आमंत्रण. फ्रान्स आणि जर्मनीचे अनेक गुप्तहेर ह्यावद्दल किंमत भोगत होते.

जेव्हा रशियन पोलीस असा एखादा हेर बघतात, तेव्हा ते काम अगदी चुटकीसारखं करतात. त्याला अटक करतात आणि कोर्टमार्शल करून त्याला लाब तुरुंगात पाठवून देतात. अशा वेळी परकीय सरकार काहीसुद्धा करू शकत नाही. माझ हे स्थान असं असल्यामुळे मला मिळालेली सूचना भयंकर होती. तरीही मला खात्री होती की, मी ओळखला गेलो नसेन आणि माझा ब्रिटिश गुप्तहेर खात्याशी असलेला सबध त्याना कळला नसेल. ब्रिटिश राजदूतावासाला ही कल्पना नव्हती. मी आलो होतो फ्रेंच पासपोर्टवर, अॅडॉल्फ सोरेल या नावाने आणि एका दारू उत्पादन करणाऱ्या कंपनीचा विक्रेता म्हणून. हेच काम अगदी चोखपणे चालवत होतो.

जर्मनी आणि रशिया यांच्यामध्ये करार होत असल्याच्या बातमीने डाउनिंग स्ट्रीटवर भयानक गंभीर वातावरण होतं. सर मिचेल फील्ड या राजदूतानं यातलं तथ्य शोधण्यात असमर्थ असल्याचं सांगितलं. त्यातील सत्य पारखण्यासाठी माझी पाठवणी केली गेली.

इतर मुत्सद्द्यांप्रमाणे मलाही माहीत होतं की, इंग्लंडमधला रशियन राजदूत हा इंग्लंड–रशिया करार व्हावा म्हणून प्रयत्नशील होता आणि त्यामुळे युरोपात शांतता नांदेल ह्याची खात्री लॉर्ड मॅक्लेस्फील्ड यांना होती; पण लोकमत बिथरेल म्हणून त्यानी ही गोष्ट लांबणीवर टाकली. नेमकी हीच संधी जर्मनीने उचलली आणि इग्लंडविरुद्ध एक फळी उभारण्याचा चंग बाधला. यासंबंधातली तपशीलवार सत्य हकिगत मिळवणं, हे माझं काम होतं.

मी चटकन् त्या पोलीस गुप्तचराकडे पाहिलं आणि तोंडासमोर पेपर धरून त्या भाऊगर्दीतून काढता पाय घेतला आणि नेवास्कीच्या कोपऱ्यावर आलो. रात्र प्रकाशमान होती, पण धुकट होती आणि रस्ते बर्फाच्या थरानी आच्छादले होते. बर्फ पडण्याच्या लयबद्ध संगीताने माझे कान वेढले होते. मिळालेल्या आश्चर्यकारक बातमीने मी जरी गडबडून गेलो तरी पण त्या बातमीने बराच सावध झालो होतो.

एका दारूच्या दुकानाचा प्रतिनिधी म्हणून चादीकाम करणाऱ्या एका मजुराच्या घरात मुक्काम ठोकला होता. अॅलेक्झाडर ब्रिजच्या पलीकडे त्याचं घर होतं. इग्लंडमध्ये आश्रय घेतलेल्या एका रशियन निर्वासिताकडून मी त्याच्यासाठी ओळखपत्र घेतलं होतं.

मी आजुबाजूला पाहिलं. तो माणूस अगर त्याची छबकडी माझ्या मागावर नव्हती. कुणीच माझ्या मागावर नव्हतं. यामुळे मला जरा हुरूप आला.

माझा जर सशय आला असता तर माझा मालक ब्रास्की त्यातून सुटला नसता आणि त्याच्याचबरोबर असणारे डझनभर निहिलि-

स्टस् की पोलिस त्यांच्या सतत शोधात असायचे. या कंपनीत रहाणं खरं म्हणजे योग्य नव्हतं; पण गरजेपायीच असं करणं भाग होतं.

रशियन परराष्ट्रमंत्री काउंट येरमोलोफ आणि जर्मन राजदूत प्रिन्स डि रेडविटझ् यांच्या गुप्त खलबतांना उधाण आलं होतं. दूतावासात तर कमालीच्या औत्सुक्याचं वातावरण होतं. बर्लिन आणि पिटस्बर्ग या दरम्यान दूतांची रोज ये-जा चालली होती. माझ्या चौकश्या अगदी जपून चालवल्या होत्या आणि त्यासुद्धा विक्रेत्याच्या मिषाने. माझ्याबरोबर रशियात प्रचलित नसणाऱ्या दारूच्या बाटल्या सँपल म्हणून आणल्या होत्या. त्या स्वस्त व तितक्याच टाकाऊ होत्या, पण व्यापाऱ्यांना त्या कंपनीच्या असल्याचं मी सांगत असे.

चॅन्सेलरीतल्या दोन कारकुनांशी माझी चांगली ओळख झाली. त्यातूनच मला सुगावा लागला की, परराष्ट्र खात्यातील एक जण ह्यात बराच आस्थापूर्वक भाग घेत आहे. खरं तर यापैकी कुणालाही माझ्या व्यवसायाची माहिती नव्हती.

माझ्या मागावर कुणी नाही, ह्याची खात्री पटताच मी चटकन् एक बग्गी केली व श्लिडरला गाठायच ठरविलं. दहा मिनिटांतच मी त्याच्या घरी गेलो आणि त्याच्या स्टोवसमोर बसून आरामात सिगारेट फुंकीत गप्पा मारीत होतो. चॅन्सेलरीत तो वरच्या हुद्द्यावर होता; पण पठ्ठा असा हुशार की, राजकारणावर तो कधीच बोलत नसे. आज मात्र व्होडका घेतल्यावर तो रंगात आला होता. त्याचाच फायदा उठविण्यासाठी पॅरिस डिबटस्मधला एक लेख मी पुढे टाकला. तो लेख अर्थातच जर्मन-रूसो फळीबाबत होता.

'खरं आहे. युरोपमधला रशिया ह्याच राज्यकर्ता होणार आहे इंग्लंडच्या साहसवृत्तीविरुद्ध आम्ही उभे आहोत आणि त्यासाठीच जर्मनीशी हातमिळवणी आहे. चीनमध्ये जे क्षेत्र ते व्यापतात त्याची आम्हाला फिकीर नाही आणि दक्षिण आशिया...'

'हिंदुस्थान म्हणायचं आहे?'

'बरोबर. त्याचा शेवट काही फार दूर नाही. काउंट येरमोलोफ आणि रेडविटझ् यांच्यात सारं ठरलं आहे. जर्मन सरकारची मान्यता मिळाली की झालं.'

'यामुळे रशियाचा काय फायदा?' मी विचारलं, 'मला तुमचं राजकारण कळत नाही.'

'फायदा?' तो किंचाळला, 'तहाच्या कलमान्वये आम्हाला इंग्लंड, फ्रान्स याच्यावर बोट ठेवता येईल. तुम्हाला कल्पनाच येणार नाही की याला पुढे कोणतं वळण लागेल. फ्रेंचाच परराष्ट्र धोरण लवचिकच.'

'आणि हे केव्हा ठरणार?'

'कालच एक दूत तहाचा मसुदा घेऊन गेलाय. पुढल्या बुधवारी तो परत येईल. येरमोलोफ फारच उतावीळ झालाय आणि त्याला वाटतं, इंग्रज ह्यात काही तरी विघ्न आणतील!' तो हसला.

'बुधवारी रात्री ना? मला वाटतं, त्याच दिवशी प्रिन्स विल्हेम याना झारस्कोये सेलो येथे खाना देण्यात येणार आहे' त्याने मान हलविली. इतकंच नव्हे तर ह्या खान्याला येणाऱ्या आमंत्रितांची नावे पण सांगितली.

संध्याकाळी आम्ही एक सिनेमा ठोकला. रात्री परतताना माझ्या मनात हाच विचार चालला होता. एवढ्यात माझ्या ध्यानात आलं की, कुणी तरी माझ्यावर पाळत ठेवून आहे. पळण्याचा प्रयत्न करणं म्हणजे संशय आणखी वाढवण्यासारखं होईल, म्हणून मी तो टाळला. तसं काही न दाखवता मी तसाच पुढे गेलो. नेवा पार केलं. नेवावरून काही लोक टॉर्चलाइट्स् टाकीत होते आणि त्यातल्या काहींचा रोख, मी ज्या घरात उतरलो होतो त्यावर होता.

दुसऱ्या दिवशी मी चौकश्या सुरूच ठेवल्या; पण त्यातून मार्ग निघेना. वेळ थोडा होता. जर्मन दूत बर्लिनमध्ये ठाण देऊन होता. मसुदा नक्कीच तयार झाला असावा. काउंट येरमोलोफबद्दल मी बरीच माहिती जमा केली मी घरी आलो तव्हा ब्रास्कीची बायको एका मुलीबरोबर गप्पा मारीत होती आणि ती मुलगी दुसरी तिसरी कुणी नसून रेस्टॉरन्टमध्ये दिसलेली ती पोलिस-हेर होती. ब्रास्कीने तिची ओळख करून दिली; पण दुसऱ्या नावाने. मी फ्रेंचमध्ये संभाषण सुरू केलं. 'क्युबातमध्ये आपण जेवण घेत होता ना काल?'

'हो. माझ्याबरोबर माझे काका होते. तुमच्याजवळ होतो.'

ब्रास्कीचे आणि तिचे घरोब्याचे संबंध पाहून माझ्या मनातला समज थोडासा मावळला आणि आम्ही मनमुराद गप्पा मारल्या. चहा आणि सिगारेटस्. तास कसे गेले हे कळलंच नाही. ती मैत्रीला अगदी योग्य वाटली. अगदी आनंदात आणि मजेत होती.

ब्रास्की जेव्हा तिला पोचवून आला त्या वेळी मी त्याला बाजूला नेऊन मनातली शंका बोलून दाखवली, तेव्हा तर तो खळखळून हसला आणि त्याने बायकोलाही ते सांगितलं. 'मी तिला बारा वर्षं ओळखतोय. तिची काही भीति बाळगू नकोस!' तो म्हणाला. तरी पण मला मिळालेली सूचना प्रामाणिक असावी, असं मला वाटल. ब्रास्कीने माझ्याविषयी तिला काही सांगितलं नसेल ना, अशी पुसट शंकाही आली.

दोन दिवसांत मला आढळलं की, माझ्या हालचालीवर पाळत आहे. मंगळवार सकाळ उजाडली. गुरुवारी, मसुदा येणार आणि कुठलीच योजना माझ्यापाशी नव्हती. गुरुवारी जर काही जमलं नाही तर आत्ताची ही सुसंधी परत मिळणार नव्हती. परत इंग्लंडच्या ताकदीवर परिणाम होणार होता. मी किती धोकादायक खेळ खेळतोय, याची कल्पना फक्त लॉर्ड मॅक्लेस्फील्ड याना होती. ते मात्र उत्सुक होते.

मी स्टेशनवर गेलो. विरबॅलेन एक्सप्रेस येताना पाहिली. स्लीपिंग कारमधून जर्मन राजदूत उतरला. त्याच्याकडे फक्त छोटी बॅग होती. तो घाईघाईने उतरला व एक बग्गी करून सरळ जर्मन राजदूतावासात गेला. तासाभराने तो परत बाहेर पडला व परराष्ट्र कचेरीत जाण्याऐवजी मधेच कुठल्याशा एका प्रासादात गेला. कुणीच पाळतीवर नसल्याने मी एका बाईपाशी चौकशी केली तेव्हा समजलं की, काउंटेस पॉलिश्चिन तिथे राहते. माझ्या लगेच लक्षात आलं की, काउंट येरमोलोफ तिच्याशी विवाह करणार आहे. राजदूताने परराष्ट्र कचेरी बंद असणार, म्हणून इथेच त्याची भेट घेण्याचं ठरविलं असेल. हा मसुदा इथेच दिला गेला असेल. अर्ध्या तासानंतर प्रिन्स परत दूतावासात गेला. दहाच मिनिटांनंतर काउंट येरमोलोफ बाहेर आला. स्वत:शीच काही तरी बडबडत होता. मी ते शब्द ऐकण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ. एक बग्गी आली

आणि तो निघून गेला. तो तहाचा मसुदा घेऊन गेला की इथेच ठेवला, हे कळायला मार्ग नव्हता. माझी संधी हुकली होती. माझ्या कामात मी अपयशी ठरलो होतो. त्या भव्य प्रासादाकडे दृष्टी टाकून मी परतलो. माझ्यावर आता तरी कुणाची पाळत नव्हती. काउंटेसच्या घरापाशी ताटकळून मी दमलो होतो व भुकेने हैराण झालो होतो. मी परत ब्रास्कीकडे गेलो. त्याला विश्वासात घेतलं. प्रथम त्याला धक्का बसला, मी अशा मिशनवर आलो म्हणून. मी जेव्हा पॉलिझिनच्या उल्लेख केला तेव्हा तर तो भलताच खवळला. 'त्या बाईचं तळपट होवो !' तो पुढे म्हणाला. 'पण का ?' या प्रश्नावर मात्र तो गप्प बसला. नंतर मात्र त्याने मला विश्वासात घेतलं. निहिलिस्टस् लोकांची मीटिंग इथे भरणार आहे, तळघरात. तिथे जण आले आहेत आणि इतर चौघांची वाट पाहात आहेत. मीटिंगला पंधरा मिनिटं बाकी असतानाच ती छबकडी व्हेरा आत आली आणि तिच्या आताच्या येण्याने ती हेरच असावी, हा माझा संशय दुणावला; परंतु तिला बघून आनंद झाल्याचं मी दर्शवलं. सभाषण झाल्यावर मी माझ्या वाढदिवसानिमित्त ड्रिंक्स ऑफर करणार आहे, असं सांगितलं आणि आम्ही सर्वांनी दारू घेतली; पण व्हेराने दारू घेताच तिच्या हातातून ग्लास पडला व ती खुर्चीतच गुंगीत पडली. ब्रास्की कुटुंब काळजीत पडलं. मग मी त्यांना सांगितलं की, ती हेर असल्याने गुंगीचं औषध दिलंय म्हणजे ही नावं फुटणार नाहीत. त्या दोघाना ते पटलं नाही; पण त्यांनी तिला उचलून कोचावर झोपवली.

रशियन स्वातंत्र्यवादी खाली तळघरात जमल्याने दार लावून ब्रास्कीची बायको पहारा करीत राहिली व आम्ही तळघरात गेलो ब्रास्कीनी त्याना माझी ओळख करून दिली व इंग्लंडमध्ये सोबोलेफला कशी मदत केली, हे सांगितले. मी त्यांना पराभूत कहाणी निवेदन केली. ही देशभक्त माणस या तहाच्या विरुद्ध होती. इंग्लंडने रशियन निर्वासिताना आश्रय दिल्याने त्यांना इंग्लंडविषयी आदर होता. काउंटेस पॉलिझिनबद्दल त्यांच्या मनात राग होता. तिने त्याची माणसं तुरुंगात पाठविली होती. मला मदत कराल, तर तुम्ही त्याचा बदला घेऊ शकाल. मग मी त्यांना माझा विचार सांगितला. सुरुवातीला ते जरा कचरले; पण अखेरीला तयार झाले आणि तेही ब्रास्कीमुळे.

माझे कपडे परिधान करून एकजण बाहेर पडला व तो विरुद्ध दिशेला गेला. जेव्हा सगळं शांत आहे असं वाटलं तेव्हा एक एक करून सर्वजण सटकले व ठरल्या ठिकाणी जमण्यासाठी निघाले. रात्री अकराला आम्ही एका अधाऱ्या जागी जमलो. मी सगळ्यांना सूचना दिल्या.

झीटपणे आम्ही सहा जण काउंटेसच्या बगल्यावर गेलो. दाराची बेल वाजविली. दार उघडल्यावर आम्ही आत घुसलो आणि दार बंद करून कुलूप लावून किल्ली माझ्या खिशात ठेवली. नोकराला जरा दमात विचारलं, 'काउटेस आहेत का ? त्यांना साग मला भेटायचंय !' आमच्या पेहरावावरून त्याचा चेहरा उतरला. सजविलेल्या हॉलमधून तो चालला आणि त्याच्या पाठोपाठ आम्ही. एका सुसज्ज खोलीत जिथे एक देखणी बाई होती, त्या खोलीत आलो. ती एकदम उठली.

'तुम्ही काउंटेस मारीया पॉलिझिन ?' मी फ्रेंचमध्ये विचारले.

'आम्ही पोलीस–अधिकारी. झारनी आम्हाला झडतीचा हुकूम दिला आहे.' मी माझा पासपोर्ट नुसताच खिशातून काढण्याचे नाटक केले.

'पण हा माझा अपमान आहे,' ती चिडून म्हणाली. 'मी तुम्हाला झडती घेऊ देणार नाही. मीच पोलीस खात्यात आहे. यात काही तरी गंभीर चूक होत आहे.'

'चूक नाही. बाई, तुम्ही मारीया फिओएरोवा, काउंट पॉल पॉलिझिनच्या सौभाग्यवती आणि आता विधवा. आमची झडती होईपर्यंत तुम्ही नजरकैदेत आहात.' हे मात्र मी अधिकारवाणीने म्हटले, 'आणि इव्हॅनोविच, तू थांब बाईबरोबर.'

'हे मात्र भयंकर आहे. काउंट येरमोलोफ काही तासांपूर्वी इथे होते. मी त्यांना कळवीन. ते तुम्हाला शिक्षा करतील. ते झारना सांगतील.'

'झारसाहेबांच्या आज्ञेवरूनच हे चाललय. बाईंच्या ताब्यात महत्त्वाची कागदपत्रं आहेत. ती कुठं आहेत ? त्याच्या किल्ल्या द्या.'

तिने रागाने किल्ल्या फेकल्या. कुलपं उघडून सर्व ड्रॉवर्स पाहिले. सर्व पत्रं ताब्यात घेतली. दुसऱ्या खोलीतली कपाटं बघितली. शेवटी नोकराला शयनगृहात नेण्यास सांगितलं. हॉलमध्ये एकजण थांबवला व दुसरा मागल्या दारावर. शयनगृहात हिरे होते. ब्रास्कीनी तिथली कागदपत्रं पाहिली. त्यात क्रांतिकारकांची एक नाव-पत्त्यानिशी यादी होती. त्यानी ती लगेच खिशात टाकली. तिथलं दुसरं ड्रॉवर उघडलं. त्यात जर्मन ईगल सील असलेला तहाचा मसुदा होता. काऊंट येरमोलोफने तो स्वत.जवळ न बाळगता ज्युवेल सेफ बॉक्समध्ये ठेवला होता. आता काम झालं होतं. ब्रास्कीचं पण. आम्ही ती कागदपत्रं सिल करायचं नाटक केलं. बाईंना तसदी झाल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून घड्याळात बघत आम्ही काढता पाय घेतला. मी तडक स्टेशन गाठलं.

१२–३० ची व्हिएन्ना एक्सप्रेस पकडून ऑस्ट्रियन सरहद्दीच्या अलीकडच्या स्टेशनावर उतरलो. कस्टम–नाका चुकवून मी ऑस्ट्रियन सरहद्द एका शेतकऱ्याच्या मदतीने ओलांडली. तीन दिवसांनंतर इंग्लंड गाठलं.

रूसो–जर्मन तहाचा मसुदा मी लॉर्ड मॅक्लेस्फील्डच्या हातात ठेवला.

कॅंबरवेलच्या त्या निर्वासिताकडून समजलं की, ती छबकडी व्हेरा पोलिसहेर निघाली. मला जी सूचना दिली होती ती शिल्डर या मित्राने, की जो तिच्याकडून फसवला गेला होता. ब्रास्कीला जी यादी मिळाली त्यामुळे जे बंडखोर आहेत पण संशयित नाहीत, त्यांचा उपयोग होण्यासारखा होता.

पिटसबर्गच्या आमच्या वकिलातीकडून या प्रकाराने केवढी धमाल उडाली, त्याची माहिती मिळाली. बर्लिनमध्ये असच वातावरण होतं. त्यामुळेच रूसो–जर्मन ॲग्रिमेंट होऊ शकलं नाही. नजीकच्या काळात इंग्लंड-रूसो करार होण्याची दाट शक्यता पसरलीय.

## पुस्तके

# प्रस्थान

### अपेक्षा वाढविणारा संग्रह

दत्ता पवारांच्या त्यां कवितासंग्रहाला वा. रा. कांताची सुरेख प्रस्तावना लाभली आहे. स्वत:ची निश्चित दिशा ठरवून साहित्यक्षेत्रात नव्या जाणिवाचे प्रस्थान ठेवणाऱ्या अलीकडच्या कवींपैकी एकाचा हा संग्रह आहे. तेव्हा तो प्रतिमांची भाषा बोलणारा आहे, हे वेगळं सांगायला नको; पण हेही खरे की, कवितेची दुर्बोधता अट्टाहासाने वाढवणारा, चमत्कारिक भासणारा प्रतिमांचा गोधळ ह्यात नाही आणि म्हणूनच कृत्रिमतेला दूर ठेवण्यात पवारांची कविता यशस्वी झाली आहे.

ह्या कवितेचा अनुभव म्हणजे नवयुगाशी संबद्ध असणाऱ्या माणसाचा बौद्धिक, मानसिक, सांस्कृतिक, व्यावहारिक अशा साऱ्या ताण-तणावांनी भरलेला अनुभव आहे. अस्तित्वालाच जेव्हा अनुत्तरित प्रश्न पडतात अन जगण्याचा पायाच दुभगू लागतो तेव्हा भोगावी लागणारी मनाची अस्वस्थ उलघाल सशब्द करणारी ही कविता–

कणाकणात विस्तारतो अथांग
 नव अश्वत्थ
माझ्याच धमन्यांतून वाहतो
 जीवनरस प्रमत्त
याच अश्वत्थावर बसलेली
 ही वटवाघुळे
अजून बसली आहेत खात
 आपल्या विष्ठेची फळे '

असे चित्र जेव्हा डोळ्यांपुढे उभे करते, किंवा–

'मग बोटभर चिंधीतील
 व्रत-वैकल्यांची मिरास घरगळते
श्रद्धेच्या बुरशीवरून !'

असा बुरसटलेल्या मूल्यभावनांचाच निषेध करते तेव्हा तिच्या प्रत्ययकारितेची ताकद लक्षात येते.

'इथल्या उंदरांनी कुरतडलेल्या जगात
माणूस नावाचा प्राणी हरवला आहे '

ही विदारक वस्तुस्थिती अनुभवणारा कवी

'मी शरमून होतो बेशरम हिजड्यांना
अग, कसे सांगू तुला
जग अशाचेच असते म्हणून '

असे आपल्या संवेदनांना समजावत असला तरी, उद्या त्याच संवेदना बाजारबुणग्यांना विकल्या जाणार आहेत, हे आणखी भयकर सत्य त्याला अस्वस्थ करते. 'भविष्याच्या वाटेवरही संदर्भ शोधीत दुभंगणारे मन' मग प्रत्येक अनुभवालाच झालेला युगाच्या फोलपणाचा स्पर्श आणि त्याने साऱ्या भोगण्यालाच आणलेली अवकळा व्यक्त करते.

'मी मरणाचा क्रूस माझ्या पाठीवर घेतला आहे,' असे हा कवी जेव्हा सांगत असतो तेव्हा त्यापाठीमागे भरलेला दिसतो जगण्यातला एक तीव्र कडूपणा, आयुष्याला क्षुद्र करणाऱ्या सर्व दडपणाची नि स्वत:च्या विकाराची एक भेदक जाणीव. हीच जाणीव जेव्हा तिला गवसलेली वास्तवाची रूपे माडते तेव्हा त्याचे संदर्भ 'आता या देशात,' 'रक्तातील कमळ', 'मरणगुहा' किंवा 'इदम्' सारख्या कवितांमधून व्यक्त होतात.

उत्तरे सापडण्यापूर्वीच जेव्हा रात्र उलटत असते, आत्म्याची पिसे जेव्हा झडून जात असतात, पूर्वपरंपरेनुसार जेव्हा उपकारांचे ढोल बडवण्यासाठी कातडी सोलावी लागते अन् जेव्हा जरी-तरीच्या खेळातला आसूड आपल्याच पाठीवर ओढावा लागतो, तेव्हा भयाण अर्थहीनतेची एक सर्वंकष जाणीव मन व्यापून टाकते. आपल्याच भावनांशी भयंकर खेळ खेळणारे आपलेच वास्तव असते, हे सत्य 'हुंदक्यात आयुष्य दाटलं आहे निरवानिरवीच्या क्षणाला' अशी तीव्र वेदना वदवते. ही वेदना जशी मूल्याच्या विनाशाची आहे, दुभगल्याच्या जाणिवेची आहे, प्रतारणाची नि पराभव पचवल्यानंतरही मिळालेल्या विफल आयुष्याची आहे, तशीच ती स्वप्नभंगाचीही आहे. प्रेमजीवनाविषयीचे काही हळवे, सुंदर, तर काही दुखरे सूर ह्या संग्रहात फार सुरेख उमटले आहेत. महानोरांच्या धाटणीची आठवण देणाऱ्या 'झिंग', 'अभ्राची दिठी', 'मन' ह्या कविता फार बोलक्या आहेत. 'एक बागुलबुवा', 'कविता', 'सकाळताना' ह्याही अशाच वेगळेपण राखून असणाऱ्या कविता ! 'तुझे उसवलेले आकाश', 'प्रश्नांकित अंधार', 'निंबोणीच्या झाडावर' ह्या कवितामधला आर्त सूर जसा लक्षात राहण्याजोगा तशाच

'शिप शिप झाले मोती शहारताना
सूर्यबिंब आहे ओठी सकाळताना '

अशा काही ओळीही लक्षात राहण्याजोग्या ! 'पावसाची फांदी' किंवा 'मन'मधला आटोपशीर अनुभव किंवा 'फ्लेश'सारख्या कवितांमधला अधिकाधिक फोकसमधे येत जाणारा विलक्षण अनुभव ह्या कवीकडून रसिकाला अधिक अपेक्षा ठेवायला लावील हे मात्र नक्की !

—अरुणा ढेरे

प्रस्थान ( काव्यसंग्रह )
लेखक : दत्ता पवार
साहित्य संवाद प्रकाशन, मुबई
पृष्ठे : ५६ मूल्य : ५ रु.

### साभार पोच

१. आधुनिक मानवाची कहाणी (पोवाडा)
 ले. शाहीर साबळे
 अभिनव प्रकाशन, मुबई
 पृष्ठे ६१, मूल्य ३ रु.
२. माझा रोजचा व्यायाम कोणता ?
 ले. श्री. व. ग. देवकुळे
 मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुबई
 पृष्ठे १४६, मूल्य ८ रु.
३. आरोग्यासाठी योगासने
 ले. श्री. ब. ल. वैद्य
 मॅजेस्टिक प्रकाशन, मुबई
 पृष्ठे ११९, मूल्य ८·५० रु.
४. सोविएत शेती व शेतकरी
 ले. श्री. गो. द. साने
 अभिनव प्रकाशन, मुबई
 पृष्ठे १४९, मूल्य १० रु.
५. 'पुण्याई' (पुण्याचे सांस्कृतिक दर्शन)
 अखिल भारतीय बावन्नावे मराठी साहित्य-संमेलन—स्मरणिका, पुणे नगर वाचन मंदिर प्रकाशन
 पृष्ठे १९०, मूल्य ५ रु.

# आमचे ग्रंथालय

## The Psychic Power Of Pyramids.

( New discoveries by the authors of the 'Secret Power of Pyramids'.)
Bill Schul and Ed. Pettit.
Corronet Books,
Pages 224, 95 Pence.

---

ता. २१-११-१९७६ च्या 'माणूस' च्या अंकात डॉ. देवदत्त दाभोळकरांनी पिरॅमिडस्‌विषयी एक लेख लिहिला होता. तो लेख वाचून माझी पिरॅमिडस्‌विषयीची कुतूहलता फारच वाढली व मी त्या विषयावरची दोन-चार पुस्तके वाचून टाकली. या पुस्तकाच्या लेखकद्वयाने याआधीही पिरॅमिडस्‌वर एक पुस्तक लिहिले आहे, ते सुद्धा वाचनीय आहे.

आता 'माणूस' मधील 'आमचे ग्रंथालय' या सदराच्या वाचकाला घर बांधायचे झाले तर पिरॅमिडस्‌च्या आकाराचे बाधून त्याच्या ⅓ उंचीवर बेडरूम किंवा 'स्टडी' बांधावी. पिरॅमिडस्‌च्या आकाराच्या बांधकामाच्या ⅓ उंचावर म्हणे मायक्रोवेव्हज् निर्माण होतात. जे जे या मायक्रोवेव्हज्‌च्या आसमंतात असते ते दीर्घकाळ टिकते, असे म्हणतात. तुमचा मेंदू (म्हणजे अर्थात् तुम्ही !) तिकडे असला तर त्या मेंदूत अल्फा लहरी निर्माण होतील व शारीरिक आणि मानसिक, दोन्ही प्रकारे तुम्हाला पुष्कळच बरे वाटेल. तुमचे घर असे पिरॅमिड्-टाइप बांधले तर ⅓ उंचीवर, बेडरूम बांधावी की 'स्टडी' बांधावी, हे तुम्हीच ठरवा. अर्थात् बेडरूम बांधली तर तुमचे love-life (का सेक्स लाइफ ?) एकदम सुधारेल. 'स्टडी' बांधली तर नवीन आयडियाज् तुमच्या डोक्यात येतील व तुम्ही एकदम सक्सेसफुल व्हाल. आपण तर ठरवून टाकले आहे की, ⅓ उंचीवर 'स्टडी' व बेडरूम दोन्ही बांधावयाची. प्रयोग करायला काय हरकत आहे ? भिती थोडचा निमुळत्या असतील एवढेच ना ? तो त्रास विशेष नाही; पण फायदा झाला तर...

कुणा तरी एका बॉव्हिस नावाच्या गृहस्थाला पिरॅमिडस्‌च्या (म्हणजे खऱ्या) ⅓ उंचीवर एक मेलेली माजर आढळली होती. पुष्कळ दिवस गेले तरी त्या मांजरीच्या शवामधून दुर्गंधी येत नव्हती. यामुळे बॉव्हिसला आश्चर्य वाटले व त्याने हे पिरॅमिडस्‌मधील मायक्रोवेव्हज्‌चे रहस्य शोधून काढले, असे बॉव्हिस म्हणतो. ही मेलेली मांजर त्या पिरॅमिडमध्ये dehydate झाली. (शरीरातील सर्व पाणी निघून जाणे. कॉलरामध्ये वगैरे होते तसे.) पिरॅमिडस्‌च्या तेवढ्या उंचीवर केळी वगैरे ठेवली तर ती दीर्घकाळ टिकतातच, पण चवीलासुद्धा ही असली फळे छान लागतात. पुठ्ठयाचे लाकडाचे सुद्धा पिरॅमिडस् करता येतात. आताच मला के. एम्. बेहरे, भिगारवाला यांच्या शो रूममध्ये फ्रीजच्या ऐवजी पिरॅमिडस् विक्रीला ठेवलेले दिसतात ! किंवा पिरॅमिडटाइप रेफ्रिजरेटर्स बनवून त्याला 'फ्रिजेमिडस्' नाव ठेवले तर अल्विन किंवा कॅल्वीनेटर कपनीची पर्वणी ठरेल.

मॉडेल कॉलनीतून जाताना अय्यंगारची पिरॅमिडस्‌सारखी बाधलेली 'योग इन्स्टिटयूट' दिसली की, तिथल्या लोकाना मायक्रोवेव्हज्‌मुळेच बरे वाटत असावे, असे वाटते. अय्यगार आणखीन एक टप्पा पुढे गेले आहेत, असा संशय मनात येतो. कारण त्याची इमारत फक्त ५०% पिरॅमिडस्‌सारखी आहे. (अर्ध्या पिरॅमिडमध्ये सुपर मायक्रोवेव्हज् येतात काय ?) म्हणजे पिरॅमिडच्या वरच्या टोकापासून खालपर्यंत जर दोन तुकडे केले तर त्यातला एकच तुकडा म्हणजे ही इन्स्टिटयूट. आता अजाणताच अय्यंगाराचा गौप्यस्फोट केला असेल, तर मी दिलगीर आहे.

या पुस्तकात लेखकांनी स्कीनरचा उल्लेख केला आहे. या.बी. एफ्. स्कीनरचे म्हणणे आहे की, केव्हा ना केव्हा आपणाला माणसाचे वर्तन नियंत्रणाखाली आणायला हवे. यासाठी behavioural Psychology चा फार उपयोग होतो. या शास्त्रामधे एक ठराविक गोष्ट वारंवार करून माणसाचे वर्तन बदलता येते, असा स्कीनरचा दावा आहे. सायकॉट्रॉपिक औषधामुळेसुद्धा वर्तन बदलता येते; पण या क्षेत्रात अजून पुष्कळ प्रगती करावयाची आहे स्कीनर म्हणतात की, विसावे शतक इतके गुतागुतीचे व घाईगर्दीचे आहे की, अलीकडे माणूस फारच विचित्र वागायला लागला आहे. शल आणि पॅटिट म्हणतात की T. M. ( Transcendental Meditation) मुळे सुद्धा वागणूक बदलता येते. पण हेच T. M. जर पिरॅमिडमधे केले तर ? मग त्याला T. M. fortified असे नाव द्यायला हरकत नाही, असे मला वाटते. म्हणजे एका औषधाचा गुण वाढावा, यासाठी अलीकडे औषधकंपन्या दुसरे औषध टाकतात की नाही ? तसेच त्याला synergistic action of T. M. and pyramids असे सुद्धा म्हणता येईल ! हेच लेखक पुढे असे म्हणतात की, असे झाले तर जगात स्कीनर वगैरे लोकांची गरजही भासणार नाही.

हे पाश्चात्य लेखक अति फॅडिस्ट झाले आहेत. एखाद्या विषयावर पुस्तक लिहिले की, त्यासाठी ते मरून पडतील. लायनस पॉलिंगचे बघा, व्हिटॅमिन सी म्हणजेच सर्व रोगावर रामबाण औषध, असे तो म्हणतो. तसेच या लेखकाचे बघा. सर्व समस्यावर एकच उपाय– पिरॅमिडस् ! कुठे स्कीनरने केलेला मेथॉडिकल रिसर्च आणि कुठे यांचे हे पुस्तक ! अर्थात पिरॅमिडस्‌मुळे फायदा होऊच शकत नाही, असे मी म्हणणार नाही; पण स्कीनरसारख्या अनुभवी व जिनियस माणसाचा पाणउतारा करण्याची येथे काहीच जरुरी नव्हती. स्कीनरचे Beyond Freedom and Dignity हे मानसशास्त्रावरील एक साक्षेपी पुस्तक आहे.

रात्री आपण झोपण्यापूर्वी आपल्या खाटेवर पाच-दहा मिनिटे पडलेले असतो. आपल्याला जेव्हा झोपेची गुंगी यायला सुरवात होते, त्या वेळी धड आपण झोपीही गेलेलो नसतो व धड जागेही नसतो. या अवस्थेला Twilight Zone असे म्हणतात. ही अवस्था म्हणजे प्रगट व अप्रगट मन यांच्यामधले दालन आहे. याच अवस्थेमध्ये कित्येक लोकांना 'क्रिएटिव्ह' विचार सुचतात, तर कित्येकांना त्यांच्या समस्येचा तोडगा सापडतो. कधी कधी आपण काही समस्यांमुळे चिंतेत असतो व त्याचाच विचार करत आपण झोपी जातो आणि सकाळी उठल्यावर आपल्याला तोडगा सापडतो, असे लक्षात

येते. याला 'To sleep on the problem' असे म्हणतात. पिरॅमिडस्मध्ये झोपल्यावर हा 'ट्वायलाईट् झोन' वाढतो, असा या लेखकांचा दावा आहे.

आइनस्टाइनला काही. गुरुत्वाकर्षणाचे नियम शोधायला फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत. त्याला एकदमच हे ज्ञान प्राप्त झाले. याला Serendipity म्हणतात. अर्थात आइनस्टाइन 'जिनिअस' होता म्हणून हे झाले; परंतु हे असले serendipity चे किस्से ट्वायलाइट झोनमध्ये फार होतात.

या लेखकांनी फ्रेड्रिक कॅक्युलचे आणखी एक उदाहरण दिले आहे. 'स्वप्ने ही फार उपयुक्त असतात,' असे तो नेहमी म्हणत असे. कारण त्याला एकदा एक स्वप्न पडले होते. त्यात एक साप स्वत:चीच शेवटी चावत होता. यावरून त्याला असे सुचले की, ऑर्गेनिक कंपाउंडस् हे गोलाकार चेन्समध्ये उद्भवतात. नाइलस भोर वगैरे शास्त्रज्ञाचे सुद्धा असेच किस्से, 'ट्वायलाइट् झोन' या प्रकरणात दिले आहेत.

हे serendipity चे प्रकार पिरॅमिडस्मध्ये भरपूर वाढतील, असे लेखकांना वाटते. अर्थात त्यासाठी इजिप्तमध्ये जायची जरूर नाही. तुम्ही पुठ्ठयाचे, प्लॅस्टिकचे, काँक्रिटचे पिरॅमिडस् बांधून serdentipity साध्य करू शकाल, हे मी आधी सांगितलेच आहे.

काही लोकांनी पिरॅमिडस्मध्ये झोपून कसे वाटते याचे वर्णन केले आहे.

१. आपण जणू ८००० फूट उंच पर्वतावर झोपलो आहोत, असा भास निर्माण होतो.

२. आपली स्वप्ने रंगीत दिसतात व ही स्वप्ने आपल्याला सहज आठवतात. (ब्लॅक–व्हाइट ड्रीम्सना आता टाटा!)

३. सकाळी उठल्यानंतर आपल्या शरीरात कंप (vibrations) जाणवतात व आपल्याला फारच 'ग्रेट' वाटते.

(४) आपल्यातले तणाव झोपेत नाहीसे होतात.

इजिप्तमधील पिरॅमिडस हे इ. स. पूर्व २९०० मध्ये बांधले गेले होते. प्रत्येक राजाने आपल्या देहासाठी एक पिरॅमिड बांधले- गीझे येथील चीऑटस किंवा ग्रेड पिरॅमिड हे सर्वात अजस्र आहेत. ते जगातले एक आश्चर्यच आहे. ते तेरा एकर जागेमध्ये बांधले गेले होते. ते ४८२ फूट उंच आहे. अमेरिकेतील माया संस्कृतीत सुद्धा काही पिरॅमिडस् बांधले होते.

आता पिरॅमिडस्च्या आकारामुळे होणाऱ्या फायद्यात सत्य असेल, तर आपल्याला जिकडे तिकडे या टाइपची घरे दिसू लागतील. जगाचे सर्व जटिल प्रश्न सुटतील व पृथ्वीवर पुन्हा एकदा रामराज्य प्रस्थापिले जाईल.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी

---


**– Some New otitles Received –**

1. M. C. C. The Autobiography Of A Cricketer – (Cricket) Colin Cowdrey Rs. 17·00
2. The Psychic Power Of Pyramids – Bill Schul & Ed Pettit Rs. 19·00
3. The Green Hills of Earth – (Science fiction) Robert Heinlein Rs. 9·60
4, The Making of A Surgeon – (Medical Book) (Best–seller) – William A. Nolen Rs. 18·90
5. The fast Men – (Cricket) David Frith Rs. 12·45

**मराठी**

१. डाळिंबाचे दाणे – कादंबरी– उद्धव ज. शेळके रु. ३०/–
२. किक – (कथासंग्रह)– वामन पात्रीकर रु. १२/–
३. सनी डेज – (एक आत्मचरित्र)– सुनील गावसकर – अनुवाद: श्री. बाळ ज. पंडित रु. २५/–

* नॉन–मेंबर्सना डेली–बेसिसवर पुस्तके वाचावयास मिळतात.

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## □ 'घरोघर कॉंग्रेस'

'फुटणार, फुटणार' म्हणता म्हणता शेवटी एकदाची कॉंग्रेस पुन्हा एकदा फुटली. कॉंग्रेस फुटणार, असा कुबट वास मला तसा सहा-एक महिन्यांपूर्वीच लागला होता आणि एखाद्या तत्त्वचिंतकासारखा हा माझा अंदाज मी वेळी-अवेळी माझ्या मित्रांसमोर भकूही लागलो होतो. माझ्या राजकीय प्रतिभेला तेव्हा माझे किती तरी मित्र हसले होते. त्यांचा अंदाजही तसा योग्यच होता. कॉंग्रेसमधली मंडळी एरवी कितीही बुद्दू असली तरी त्यांना त्यांचा स्वार्थ चांगला कळतो, असा आजवरचा अनुभव आहे. आता पुन्हा एकदा पक्ष फुटण्याने कॉंग्रेस पक्ष नामशेषच होण्याची शक्यता आहे, हे समजण्याइतपत अक्कल तरी त्यांना आहे, असा माझ्या मित्राचा होरा होता. तेव्हा कॉंग्रेस काही अशी सहजासहजी आणि उघडउघड फुटणार नाही, असा त्यांचा दावा; पण तसं काही झालं नाही. कॉंग्रेस फुटायची ती फुटलीच; पण ती फुटायला इतका वेळ लागला की, शेवटी ती कधी फुटते याची उत्कंठाच अनावर होऊन राहिली. शेवटी परवाच ती ऐतिहासिक घटना घडली आणि सगळ्यांचा जीव भांड्यात पडला.

कॉंग्रेस फुटली म्हणजे नक्की काय झालं? या प्रश्नाचं उत्तर एकदम सोपं आहे. 'कॉंग्रेस फुटली,' म्हणजे एका कॉंग्रेसच्या दोन कॉंग्रेस झाल्या. एक रेड्डींची कॉंग्रेस तर दुसरी इंदिरा कॉंग्रेस; पण हे उत्तर असं, वाटतं तितकं सोपं नाही. कारण त्यातून भलताच प्रश्न उपस्थित होतो की, मग यातली मूळची आणि खरी कॉंग्रेस कुठली? कारण रेड्डी म्हणतात, माझीच कॉंग्रेस खरी, तर इंदिराजींची खात्री आहे की, त्यांचीच कॉंग्रेस खरी! मग यातल खरं कोण? कारण दोघंही मुत्सद्दी आहेत, राजकारणात अगदी मुरलेले आहेत आणि शिवाय कॉंग्रेसचे नेतेही आहेत. तेव्हा कोण केव्हा खर बोलेल, याचा नेम नाही. मग सध्याच्या परिस्थितीत खरी कॉंग्रेस कशी ओळखावी?

या प्रश्नाचं उत्तर शोधण्याआधी एक गोष्ट पूर्णपणे स्पष्ट होणं आवश्यक आहे. ती गोष्ट अशी की, खरी किंवा मूळ कॉंग्रेस म्हणजे तरी नक्की काय? खऱ्या कॉंग्रेसची प्रधान लक्षणे कुठली?

काहींच्या मते, खरी कॉंग्रेस म्हणजे चांगली कॉंग्रेस. अशी कॉंग्रेस की जिच्या नावाची आठवण येताच हृदय भरून येतं, डोळे पाणावतात आणि डोक्यात भारताच्या स्वातंत्र्य-लढ्याच्या आठवणी थैमान घालू लागतात... आणि अशी कॉंग्रेस की जिच्याकडे पाहून बापूजींची आठवण येते. त्यांची तत्त्वे आठवतात, अशी कॉंग्रेस! ही खरी कॉंग्रेस बापूजींनी घालून दिलेल्या तत्त्वांप्रमाणे चालते, वागते. लोकशाही, मानवता अशासारख्या मूल्यांवर तिचा विश्वास असतो. तिला सत्य आवडते. ते ऐकण्याचे धैर्य तिच्यात असते. इतकेच काय, भारत राष्ट्राचे खरोखरच कल्याण व्हावे, अशी या कॉंग्रेसची खरीखुरी इच्छा असते. वगैरे वगैरे. तात्पर्य असं की, खरी कॉंग्रेस म्हणजे गोड कॉंग्रेस. छान छान कॉंग्रेस.

खऱ्या कॉंग्रेसची ही व्याख्या छान आहे; पण मोठी कठीण आहे. कारण गंमत अशी की, इतके कठीण निकष लावू लागलो तर कुठलीच कॉंग्रेस खरी वाटत नाही. कारण आज-काल, तुमची-आमची मनंच अशी बथ्थड होऊन बसली आहेत की, रेड्डी काय किंवा इंदिरा काय, कुठल्याच नावाच्या आठवणीनं डोळ्यात पाणी वगैरे उभं राहात नाही. अगदी कॉंग्रेस असं नाव घेतलं तरी, काही म्हणता काही वाटत नाही. खऱ्या कॉंग्रेसकडे बघून बापूजींची आठवण येते म्हणावं, तर आम्हाला कुठंही पाहून बापूजींची आठवण येते. अगदी जनता पक्षाकडे पाहिलं तरी आमचं मन बापूजींच्या आठवणीनं व्याकुळून जातं. बरं, खऱ्या कॉंग्रेसला सत्य आवडतं म्हणावं, तर सत्य म्हणजे काय, ते कशाला लागतं, याचीच आमची आठवण बुजून गेलेली आणि खरी कॉंग्रेस भारताचं कल्याण करते असं म्हणावं, तर भारताचं कल्याण म्हणजे काय, ते कसं करायचं, याचंही ज्ञान आम्हाला नाही. शिवाय जो बघावं तो, आजकाल भारताचं कल्याण करण्यातच दंग दिसतो. तेव्हा या कल्याणकारी गर्दीतून खरी कॉंग्रेस कशी शोधावी?

तेव्हा खऱ्या कॉंग्रेसची ही असली शास्त्रशुद्ध व्याख्या काही आपल्याला मानवायची नाही आणि इतकी शुद्ध कॉंग्रेस शोधून करायचं तरी काय? अशी शुद्ध कॉंग्रेस अगदी सापडलीच तरी ठेवायची कुठे? लोकांना तिची भीति नाही का वाटणार? तेव्हा आपण कॉंग्रेसची— खऱ्या कॉंग्रेसची— एक अगदी सुटसुटीत आणि व्यवहार्य व्याख्या बनवू या. ही व्याख्या अगदी सोपी आहे.

खरी कॉंग्रेस तीच की जिच्यात सगळ्यात जास्त कॉंग्रेस कार्यकर्ते आहेत. आता कॉंग्रेस कार्यकर्ता कसा ओळखणार? हे अगदी सोपं आहे. सच्चा कॉंग्रेस कार्यकर्ता खादीचे स्वच्छ तलम कपडे घालतो. डोक्यावर गांधी टोपी घालतो. संपूर्ण राष्ट्राची चिंता त्याच्या चेहऱ्यावर चितारलेली दिसते. बोलताना तो 'समाजवाद, देशाचे कल्याण, कॉंग्रेस, अल्पसंख्य, दलित, अन्याय' यांसारखे शब्द वेळोवेळी वापरतो. त्याची थोडी-फार बागायती शेती असते. तो कुठल्याशा सहकारी बँकेचा अध्यक्ष असतो किंवा कुठल्याशा साखर कारखान्याचा कुणी तरी असतो किंवा तो स्वत: नसेल, तर त्याचा कुणी तरी नातलग, कुठे तरी, कुणी तरी असतोच असतो.

तेव्हा खरी कॉंग्रेस शोधण्याची ही 'प्रोसेस' आता अगदी सोपी झाली. वर निर्देशित केलेल्या गुणांनी युक्त असे कार्यकर्ते एकत्र करावेत. प्रत्येक कॉंग्रेसमध्ये आढळणाऱ्या

अशा कार्यकर्त्यांची संख्या मोजावी आणि ज्या कॉंग्रेसचा आकडा मोठा लागेल अशी कॉंग्रेस खरी मानावी. अशा कॉंग्रेसचे कौतुक करावे आणि तिच्याकडे पाहून महात्माजींची तत्त्वे आठवावीत. गदगदून यावे. बस हीच खरी कॉंग्रेस. यातच आपले कल्याण आहे.

कार्यकर्त्यांची अशी संख्या मोजण्यात कदाचित आपला वेळ जास्त जाईल; यालाही एक शॉर्ट कट आहे. आणि सध्या तोच अंमलात आणला जात आहे हा शॉर्ट कट असा- दोन्ही कॉंग्रेसचे कार्यकर्ते प्रांताप्रांतात, जिल्हाजिल्ह्यात, राज्याराज्यात आणि राष्ट्रीय पातळीवर गटवार उभे करावेत आणि त्यांच्यात मारामारी लावून द्यावी. जो गट जिंकेल ती खरी कॉंग्रेस, हा मार्ग सोयीचा आहेच, शिवाय मनोरंजकही आहे.

तेव्हा समजा, अशा रितीने आपण खरी कॉंग्रेस शोधून काढली, असे गृहीत धरू. आता या कॉंग्रेसचे भवितव्य काय, असा प्रश्न कुणी विचारण्याची शक्यता आहे. हा प्रश्न विचारताना विचारणाऱ्याचा चेहरा अगदी गंभीर आणि उदात्त दिसण्याची शक्यता असली तरी प्रश्न अगदीच फालतू, गैरलागू आणि विनोदी आहे. एकदा खरी कॉंग्रेस सिद्ध झाल्यावर तिला भवितव्याची जरुरीच काय? एखादी कॉंग्रेस खरी कॉंग्रेस असणे एवढीच गोष्ट पुरेशी नाही का? म्हणजे कॉंग्रेस खरीही असावी आणि तिला भवितव्यही असावे, अशी दुहेरी अपेक्षा करणेच हास्यास्पद आहे. किंबहुना, मेलो तरी बेहत्तर पण खरी कॉंग्रेस म्हणूनच मरू, हा बाणेदारपणाच आज महत्त्वाचा आहे. कॉंग्रेस कार्यकर्त्याला शोभणारा आहे.

आणि शेवटी भवितव्य म्हणजे तरी काय? एखाद्या वस्तूचे चित्रविचित्र तुकडे करीत बसणे आणि असे करून लोकांना हसविणे, हे देखील एक प्रामाणिक आणि उपयुक्त भवितव्य असू शकते. तेव्हा भवितव्याचे फालतू थोतांड उभे करून खऱ्या कॉंग्रेसच्या नवनिर्माणात खीळ घालणे म्हणजे काही पुरुषार्थ नव्हे. तो मोदूपणा आहे.

तर ही कॉंग्रेस–तुमची–आमची कॉंग्रेस. खरी कॉंग्रेस. तिच्या नवनिर्माणाचा हा मार्ग अटळ आहे.. खऱ्या कॉंग्रेसच्या शोधात एका कॉंग्रेसच्या दोन, दोनाच्या चार होतील; पण खऱ्याचा शोध हा असा अटळ राहील. तेव्हा लोकहो, अशी आहे ही कॉंग्रेसची कहाणी. खऱ्या कॉंग्रेसची कहाणी.. अशा खऱ्या कॉंग्रेसचा शोध, जी कुणाला कधीच सापडली नाही. या शोधाचे आपण साक्षीदार होऊ या. कारण यापेक्षा वेगळे आपण काहीच करू शकत नाही.

कॉंग्रेसच्या या कहाणीचे तात्पर्य काय? त्याच्या शोधासाठी कॉंग्रेसचे विघटन ही एक काळाची अपरिहार्य गरज आहे. जोपर्यंत सत्य सापडत नाही तोपर्यंत कॉंग्रेसचे हे विघटन असेच चालू राहणार. यातून एक वेळ अशी येईल की, घरोघर अखिल भारतीय कॉंग्रेसची स्थापना होईल आणि त्या कॉंग्रेसचे अध्यक्ष तुम्ही स्वत: असाल ... हा दिवसही काही फारसा दूर नाही आणि त्यातून आज ज्या तत्परतेने कॉंग्रेस कार्यकर्ते कामाला लागले आहेत, त्या तत्परतेने तर काहीही होणे शक्य आहे, 'घरोघर कॉंग्रेस' हा आजच्या कॉंग्रेसचा मंत्र आहे.

कॉंग्रेस कार्यकर्त्यांना नववर्षानिमित्त आमच्या शुभेच्छा.

□


प्रकाशनाच्या वाटेवर

# पश्चिमेचे पुत्र


ऑस्कर वाइल्ड
अर्नेस्ट हेमिंग्वे
विन्स्टन चर्चिल
एडगर वॉलेस
......

पश्चिमेच्या या प्रतिभावंतांची
सुंदर व्यक्तिचित्रे

रवींद्र पिंगे

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.
बहा रुपये

मुक्काम वरोरा



# पालखीतून मिरवला बालतरू....

तारा पंडित

आनंदवनाचा परिसर... दोन दिवस आणि दोन हजार माणसं... सर्वांचे लक्ष केंद्रित करून घेणारे पालखीत बसलेले इवलेसे गुलाबाचे रोपटे... सर्वसामान्य गुलाबापेक्षा फार निराळे. काटे नसलेल्या गुलाबाचे ते रोपटे होते, दुर्मिळ असे. बाबा म्हणाले, आता माझ्या अंध मुलांना गुलाबाचं फूल हातात घेऊन हुंगता येईल. केवढा आनंद! अंध मुलांचा आणि तो आनंद बघणाऱ्या डोळस बाबांचाही! किती तरी दिवसांपासून बाबा शोधत होते, तो बिन-काट्याचा गुलाब आता गवसला होता. तो इवलासा बालतरु आनंद-वनात पाहुणा आला होता आणि पालखीतून मिरवीत स्वतःच्या गौरवाचे गीत ऐकून सुखावीत, त्याच्यासाठी खास सुशोभित केलेल्या भूमीच्या अंकावर विराजमान होणार होता. ह्यासाठीच भरला होता मित्रमेळावा. हा सोहळा ज्या चार हजार डोळ्यांनी पाहिला ते डोळे धन्य झाले!

ह्या बालतरूच्या स्वागतासाठी वसंत बापट आणि ग. दि. मा. यांनी गीते लिहून दिली. महाराष्ट्राचा वाल्मिकी म्हणून गौरविल्या गेलेल्या माडगूळकरांसारख्या कविश्रेष्ठाने एका कोवळ्या रोपट्याच्या स्वागतप्रीत्यर्थ कोवळ्या अंध बालकांना म्हणण्यासाठी सरळ सोप्या आणि आशयपूर्ण शब्दात गीत लिहून द्यावे, हे त्या बालतरूचे आणि बालकांचेही केवढे भाग्य! ते गीत प्रत्यक्ष ऐकण्यासाठी ग. दि. मा. यांनी स्वतः यायचे कबूल केले होते; पण... त्यांनी दिलेले वचन तसेच अपुरे राहिले!

ग. दि. मां. नी गीत रचावे, पु. ल. देशपांडे यांनी सूर द्यावा आणि अंध बालकांच्या तोंडून ते उमटावे— 'कोवळ्या रोपट्या आज तू पाहुणा...' अजूनही ते शब्द कानात घुमतात, तो सूर मनात उमटतो आणि ती अंध बालके डोळ्यांसमोर तरळून जातात! ह्या अपूर्व त्रयीचा योग त्या इवल्या रोपट्याच्या भाग्यात होता तर!

बापट आणि माडगूळकर ह्या दोन्ही कवींनी केलेल्या बालतरू-बद्दलच्या विचारात किती साम्य होते बघा. बापट लिहितात— 'आज ये अंगणा पाहुणा गोजिरा' तर ग. दि. मा. म्हणतात— 'कोवळ्या रोपट्या आज तू पाहुणा भूषवी अंगणा येऊनिया' बापटांच्या गीता-तील 'दोस्तहो, मस्तकी नाचता पालखी' हे शब्द मित्रमेळाव्यातील मंडळींनी साथ करून दाखविले. ती पालखी अक्षरशः डोक्यावर नाचवीत नेली. पालखीसमोर नाचणाऱ्या मंडळीत बाबा आमटे, पु. ल. देशपांडे, वसंतराव देशपांडे आदि समाविष्ट होते हे विशेष. वसंत बापटांनी लिहिलेले आणखीही एक गीत मोठे मजेदार वाटेल. त्यांची शब्दरचनाच मोठी सुंदर आहे. ते लिहितात— 'धन्य धूलिकण पुण्य करी हे कोमल करुणावंता, नभात हिरवी विजयपताका लहरू दे बलवंता.' आदल्या दिवशी अंधमुलांची गाण्याची तालीम चालू असताना पु. ल. देशपांडे त्यांच्यात जाऊन बसले आणि गीताचे शब्द कसे उच्चारावे, ह्याचे त्यांना दिग्दर्शन करू लागले. धन्य, पुण्य, ह्या शब्दांवर जोर देऊन 'कोमल' हा शब्द किती कोमलपणे उच्चारा-यचा ते साभिनय समजावून सांगितले. प्रत्यक्ष गाण्यापेक्षाही गाण्याची तालीम अधिक रंगली होती.

अरविंद गजेंद्रगडकर यांच्या बासरीच्या नादात भूमीने हा बालतरु अलगद कुशीत घेतला. आता तर ती त्याच्या कौतुकातच दंग असेल! त्याला खाऊ-पिऊ घालील, मोठा करील, त्याला फुले येतील नि त्याचे स्वागत करणाऱ्या अंध मुलांना तो भरभरून सुगंधाची लयलूट करून देईल. त्यांच्या सुखाने तोही सुखावेल. त्याच्या भोवती चार बाजूंनी चार अशोकवृक्ष तरारून उठतील नि ह्या बालतरुचे सदैव रक्षण करतील.

ग. दि. मा. यांना बाबा आमटे शब्दसृष्टीचे ईश्वर म्हणून संबो-धीत असत. एकदा बाबा त्यांना म्हणाले होते— तुम्ही माझ्या आंधळ्या मुलांना इंद्रधनुष्याचे रंग दाखवाल? तेव्हा ते म्हणाले— 'बाबा, मी लाचारीचे वस्त्र अंगावर घातले आहे हो. मी इतर सारे रंग दाखवू शकतो. प्रेमाचा, रागाचा, द्वेषाचा. राजकारणाचाही रंग

दाखवू शकेन; पण इंद्रधनुष्याचे रंग दाखविण्यास मी असमर्थ आहे. मला खरेच आज कळते आहे की, बाबा, तुम्ही एवढे अस्वस्थ का आहात ते!' अन् ग. दि. मा. त्या क्षणी अक्षरशः धाय मोकलून रडले होते!

'आनंदवनातील मित्रमेळाव्याच्या कार्यक्रमाची सुरुवातही दर वेळी ग. दि. मांच्याच गीताने होत असते. अंधबालकेच तेही गीत म्हणत असतात. 'आनंदसाधकांनो मुक्तांगणात या रे, मुक्तांगणात या रे...' या वेळीही प्रथम तेच गीत गायले गेले आणि मग पु. ल. देशपांडे उभे राहिले. त्यानी ग. दि. मा. ना दिलेली श्रद्धाजली आणि त्याबरोबर सांगितलेल्या अनेक आठवणी... सारे कसे अंतःकरणाला भिडणारे होते. कवि-शीघ्रकवि म्हणून, उत्तम अभिनेता म्हणून, एक रसिक माणूस म्हणून ग. दि. मां. बद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. गजानन हे नाव कसं सार्थ होतं— व्यासांनी सांगावं, गजाननानं लिहावं अशी विलक्षण प्रतिभा त्यांचे घरात वावरत होती, एवढंच नव्हे, रचनेची प्रतिज्ञा मागल्या जन्मातच झाली असावी असं वाटतं— असे उद्गार पु. लं. नी काढले. श्रीधरकवि ज्या गंगेच्या तीरावर पोसले गेले त्याच गंगेच्या तीरावर माडगूळकर नावाचा कवि जन्माला आला होता, असं सांगून श्रद्धांजली वाहण्याची मार्मिक पद्धत त्यांनी कथन केली. ते म्हणाले, प्रतिभावंताला श्रद्धांजली वाहणं म्हणजे त्याचंच त्याला अर्पण करणं होय. जसे भक्तगणांनी तुकारामाचे अभग त्याना गोळा करून दिले ते गंगेतून आणले नसून लोकगंगेतून आणून दिले होते. माडगूळकरांनाही श्रद्धांजली वाहताना त्यांच्याच शब्दात म्हणावेसे वाटते की—

का असा गेलास तू न बोलता न सांगता
दोन दिसाच्या संगतीची हीच का रे सांगता?

हे सारं बोलताना भाईंचं मन भूतकाळामध्ये माडगूळकरांच्या सान्निध्यातील क्षण अनुभवण्यात गुतलं होतं.

एकूण, 'कोवळ्या रोपट्या...' ह्या माडगूळकरांच्या गीताच्या अनुषंगाने एवढा विस्तार झाला खरा; पण त्या इवल्या रोपट्याचा स्वागतसमारभ एवढाच मित्रमेळाव्याचा उद्देश नव्हता. इतरही महत्त्वपूर्ण कार्यक्रम होते. त्यांपैकी एक म्हणजे लग्नसमारंभ—एकच नव्हे, चांगली तेरा लग्ने लागली. मोठा मजेदार प्रसंग. भामरागडला आदिवासीमध्ये काम करणाऱ्या मुकुंदाने पळवून आणलेल्या मुलीबरोबर लग्न आणि आनदवासीयांची बारा लग्ने रोगमुक्त झालेल्या स्त्री-पुरुषानी आनंदवनातील बागा फुलवता फुलवता प्रेमाच्या बागा कशा, केव्हा फुलवल्या कोण जाणे! एकूण काय तर हे सारेच प्रेमविवाह होते, ह्या विवाहाचे पौरोहित्य मामा क्षीरसागरांकडे तर मंगलाष्टके म्हणायला पु. ल. नि बसंतराव असे दोन देशपांडे व डॉ. रूपा कुलकर्णी आणि भारती आमटे अशा दोन मुली होत्या. आदल्या दिवशी सायंकाळी बाबा पु. ल. ना म्हणाले—उद्या मंगलाष्टकं म्हणायची आहेत, आठवून ठेवा. यावर भाई म्हणतात—त्यात काय मोठंसं? नाही आठवली मंगलाष्टकं तर मी 'म्हातारी उडता...' म्हणून टाकीन. अर्थात वेळेवर 'म्हातारी उडता...' म्हणायचा प्रसग आला नाही ही गोष्ट वेगळी. लग्नसमारंभाला वऱ्हाडी तरी कुठून कुठून आलेले—दिल्ली, कलकत्ता, मुबई, पुणे नि महाराष्ट्रातील अन्यान्य ठिकाणांहून आलेली मंडळी, स्टेजवर मुंडावळ्या बांधून शेजारी शेजारी बसलेल्या तेरा जोडप्यांना कौतुकाने न्याहाळीत होती अन् मग माईकसमोर उभं राहून आपल्या प्रिय व्यक्तीचं उखाण्यात नाव घेताना नवविवाहितांचं लाजणं—उखाणेदेखील एकापेक्षा एक होते. कोणी तरी म्हटल—' मटणात मटण कोबडीच मटण, आन् XXX झाली माझ्या शर्टाचं बटण.' यावर श्रोत्यांचं टाळ्या वाजवून हसणं...नवरा-नवरीचं कौतुकच त्यातून ओसंडत होतं. असा हा अपूर्व समारंभ!

कार्यक्रमाचा आणखी एक अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे उत्तरायणाची मुहूर्तमेढ. उत्तरायण हे नाव वृद्धाश्रमाचे; पण वृद्धाश्रम हा शब्द फार खटकतो म्हणून बाबांनी इग्रजी शब्दात Wisdom Bank हा प्रतिशब्द वापरला आहे. पुलंनाही वृद्ध आणि आश्रम हे दोन्ही शब्द खटकले. ते म्हणाले, मनाने जिवत असतो तो कधीच वृद्ध होत नसतो आणि आ करण्याचे श्रम जिथे करतात तो आश्रम असे मला वाटते. ह्या वाक्याला श्रोत्यांनी दिलखुलास हसून दाद दिली. बाबा म्हणतात—उत्तरायणात दाखल होणारा वृद्ध म्हणजे एक ज्ञानसंपन्न पेढी असेल. तिथून तरुणांनी वाटेल तेवढी ज्ञानाची रक्कम काढावी. ह्या उत्तरायणात ज्ञानाने, अनुभवाने संपन्न, शरीराने थकलेली, पण मनाने उत्साही अशी माणसे राहतील. ते आपल्या ज्ञानाचा लाभ इतरांना स्वखुषीने करून देतील. बाबा म्हणतात, जगातले सर्व वृद्धाश्रम हे अगदी एकटे, एका बाजूला आहेत. म्हणून मला ती वृद्धाश्रमाची कल्पनाच असह्य होते. उत्तरायणात एक सलग आश्रम असणार नाही. वेगवेगळी झोपडीवजा छोटी छोटी घरकुले असतील. तेथे राहणाऱ्या वृद्धांना एकटेपणा जाणवणार नाही. कारण आपल्या घरकुलाबाहेर येताच त्यांना बाग-बगीचातून हिंडता येईल. कुणी झाडाच्या पाटावर बसतील व अवतीभोवती खेळणारी, किलबिलाट करणारी अंध, पंगू मुले बघून त्यांना सतोष वाटेल. आपले जीवन भकास, एकाकी आहे असे त्यांना मुळीच वाटणार नाही. मुला-फुलांमध्ये त्यांचे मन रमेल व आपले ज्ञान इतरांना देताना त्यांना आनदही होईल. अशी ही उत्तरायणाची कल्पना आहे.

वास्तविक वृद्धासाठी काही सोय करावी, ही कल्पनाच बाबांना पटत नव्हती; पण त्यांना वृद्ध माणसांचा विचार करायला लावण्यात यश मिळवले ते एका कमलाकर कुलकर्णी नावाच्या सद्गृहस्थाने. यांचीही कथा विलक्षण आहे. घर सोडून निघून गेलेला हा तरुण अवघे ३० रु. महिना पगारावर नोकरीत होता; पण त्याची भाग्यरेखा एक दिवस स्पष्ट झाली आणि जगलातून गळून पडलेली सांबराची शिंगे परदेशी रवाना करण्याची विचित्र कल्पना डोक्यात घर करून बसली. आपले स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी अपार कष्ट सोसले आणि त्याचे चीज म्हणूनच की काय, कमलावराने अनंत हस्तांनी ह्या कमलाकराच्या दोन हातात भरघोस दान टाकले; पण केवळ अमाप पैसा मिळाला म्हणजेच माणूस सुखी होतो, हे ह्या कमलाकराला पटले नाही. गृहस्थ मनातून बेचैन झाला आणि त्या बेचैनीतच पु. लं. चा आनंदवनातील लेख दृष्टीस पडला. कमलाकर कुलकर्णी याना मार्ग सापडल्याचा आनंद झाला. ते आनंदवनात गेले. बाबाचे कार्य पाहून त्यांची बाबांवर श्रद्धा बसली आणि त्यांनी मनातली व्यथा बाबांनी बोलून दाखविली. वडिलांची स्मृती म्हणून दोन लाख रुपये बाबांसमोर ठेवले. म्हणाले—'Nobody has put

ceiling on lust, म्हणून ही रक्कम मला आजच देऊन टाकू देत.' त्यातून मग उत्तरायणाची कल्पना निघाली. योजना आकार घेऊ लागली. ह्याच सुमारास बिनकाटयाच्या गुलाब-रोपट्याचेही आगमन. झाले. त्या बालतरूच्या पालखीची मिरवणूक मुक्तांगणापासून उत्तरायणापर्यंत–वैयक्तिक निवृत्तीपासून सामुदायिक प्रवृत्तीकडे–अशी काढण्यात आली आणि उत्तरायणाच्याच परिसरात रोपटे लावण्याचा शुभारंभ पार पडला. त्या प्रसंगी बाबांनी केलेलं भाषण मोठं मार्मिक होतं. ते म्हणाले–

'उत्तरायण is my last harvest, आज ही पालखी मी खांद्यावर घेतली, ह्याला काही तरी अर्थ आहे. इथे जे तरुण-तरुणी जमले आहेत, त्यांच्या खांद्यावर–ह्या आधुनिक काळाच्या खांद्यावर–हा देश मी सुंदर करणार, सुंदर होणार ह्या भावनेने ही पालखी, हा लास्ट हार्वेस्ट देण्याचा माझा इरादा आहे. इथे जमलेल्या तरुण-तरुणींना अशी विनंती आहे की, वारकऱ्यासारखे विवेकानंद स्मारकापासून हिमालयातील अमरनाथपर्यंत एकाच्या खांद्यावरून दुसऱ्याच्या खांद्यावर ही पालखी न्यावी. तरुणाईच्या खांद्यावरून जात जात ही उत्तरायणाची पालखी ह्या देशात एकात्मता निर्माण केल्याखेरीज राहणार नाही. आज साने गुरुजी असते तर ! आजचा हा सोहळा पाहून स्वर्गातही त्यांना खचित वाटत असेल की, मी झोपेच्या गोळ्या खाण्याची घाई का बरं केली? म्हणूनच ह्या देशाची तरुणाई दगा देणार नाही, असा ह्या प्रसंगी तुमच्या प्रामाणिकपणाचा निर्वाळा मला हवा आहे.'

तो निर्वाळा दिल्याचे प्रतीक म्हणूनच की काय, सर्व लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

मित्रमेळाव्यात आलेल्या पाहुण्यांची राजेशाही व्यवस्था होती. प्रत्येक खोलीत सतरंज्या-गाद्या पसरलेल्या; प्रत्येक खोलीच्या दारावर तेथे राहणाऱ्या पाहुण्यांच्या नावांची यादी चिकटविलेली, ठिकठिकाणी मांडव आणि प्रशस्त ओटे, मांडवात लांबच लांब पंक्ती, स्वयंपाकाला पाच-सहा आचारी आणि थंडीचे दिवस म्हणून सर्वांना मुबलक गरम पाणी. एका प्रशस्त कढईसारख्या भांड्यात सतत गरम पाणी तयार असे; पण पाहुणे इतके जास्त आणि कार्यक्रमाची इतकी रेलचेल की, सोय असूनही सर्वांना आंघोळी उरकणे मुष्कील झाले. इकडे पहिली पंगत उठत नाही तोच कविसंमेलन सुरू. बाकीच्यांना जेवायला बसावे की कविसंमेलनात सामील व्हावे असा संभ्रम पडला.

ह्या एवढ्या प्रचंड गर्दीत बाबांची मुले–विकास–प्रकाश मात्र पुढेपुढे मिरवताना कुठेच दिसली नाहीत. शेवटी लोकांच्या मागणीखातर पु. लं. नी त्या दोघांना सहकुटुंब आग्रह करून व्यासपीठावर बोलावून घेतलं व त्यांचा प्रत्येकाचा परिचय करून दिला. कारण तेथे जमलेल्या कित्येकांना बाबांची मुले कोणती, हे माहीतच नव्हते. ह्याच परिचयाच्या संधीचा फायदा घेऊन बाबाही उभे राहिले. म्हणाले–भाईंनी फक्त माझ्या दोनच मुलांचा परिचय करून दिला. माझी आणखीही मुलं आहेत त्यांचा परिचय मी करून देतो आणि भामरागडच्या जंगलात राहून प्रकाशच्या प्रकल्पात काम करणाऱ्या तरुणांना व्यासपीठावर बोलावून 'ही माझी मुले' म्हणून त्यांचा बाबांनी मोठा गौरवपूर्ण उल्लेख केला.

मित्रमेळाव्याचे ठरलेले कार्यक्रम तर पार पडलेच; पण खरा मित्रमेळावा आदल्या दिवशीच सुरू झाला. दुसऱ्या दिवशी येणाऱ्या पाहुण्यांना ह्या आस्वादाला मुकावे लागले, असे म्हणावेसे वाटते. पु. ल. व वसंतराव ही जोडी रंगात आली होती. दोघांनी मिळून जुन्या नाटकातील (त्यांच्याच) गाणी म्हणून दाखविली. 'ए, म्हण रे वसंता' असं भाईंनी म्हटलं की, ते चटकन म्हणून दाखवीत. मग काही वेळाने बाबा म्हणाले–भाई, आता तुम्हीही छळा. अन् लागलीच भाईंनी आवाज लावला. शाकुंतल नाटकातलं 'बाई हा मधुकर मज छळितो' हे गीत साभिनय म्हणून दाखविलं! श्रोते नुसते खूष खूष होऊन गेले! ह्याच बैठकीत कवि राम शेवाळकर आणि शाहीर शरद मुठेही हजेरी लावून गेले.

अशीच आणखीही एक अनौपचारिक बैठक दुसऱ्या दिवशी रात्री भरली होती. तिकडे स्टेजवर कला–पथकाचा कार्यक्रम सुरू होता, पण इकडे काव्यसंगीताची मैफल रंगत होती. तिकडच्या आवाजाचा व्यत्यय टाळण्यासाठी भाईंनी एकाला आदेश दिला की, 'स्पीकरचे तोंड जरा वणीच्या दिशेला वळवून ये रे!' आणि तो आज्ञाधारक मुलगा आपले काम चोख बजावून आला. बैठकीला रंग भरला. मोजकीच पण रसिक मंडळी आस्वाद घेत होती. आणि त्या बैठकीला जिंकून घेतले होते कु. माधुरी पुरंदरे हिच्या सुरेल कंठाने. 'आणखी म्हण' म्हणून तिला आग्रह होत होता आणि तीही सर्वांचे हट्ट पुरवीत होती. आरती प्रभु नि महानोरच्या कविता मंजुळ स्वरात गात होती. कान तृप्त होत होते. ह्या बैठकीतच त्या गीतांना चाल देणारे भास्कर चंदावरकर सौ. मीनासह हजर होते. त्यानाही माधुरीचा भारी अभिमान वाटला असावा. शशी मेहतांनी पण दोन गीते आळविली, तीही अगदी लक्षात राहतील अशी.

मित्रमेळाव्याची पार्श्वभूमी सांगताना पु. ल. देशपांडे आपल्या भाषणात म्हणाले–माणूस ज्या दिवशी आपल्या बोटाचा उपयोग करू लागला त्या दिवशीच संस्कृतीचा जन्म झाला. माणूस आणि इतर प्राण्यांत हाच फरक आहे. Man is a culture building animal असं बाबा म्हणतात. मला वाटते सुंदर हात पहायचे असतील, तर इथल्या ह्या लोकांचे हात पहा. जे हात सौंदर्य निर्माण करतात, ते हात सुंदर असतात. इथे कारल्यांना सुंदर फुलांची सोबत आहे. कोबीच्या शेजारी निशिगंध उभा आहे. आता हा निशिगंध कोबीशी काय बोलतो ते कळत नाही, हे आपलं दुर्दैव आहे. सौंदर्य आणि उपयुक्तता ह्यांची जेव्हा युती होते, तेव्हा आनंदाची निर्मिती होते. असा आनंद निर्माण करणाऱ्या लोकांशी आपल्याला नातं जोडायचं आहे, तेही आपलं स्वतःचं सामर्थ्य अजमावण्यासाठी! म्हणून मित्रमेळाव्याचं हे आमंत्रण केवळ बाबांचं नसून इथल्या ह्या लोकांचं आमंत्रण आहे. येथील यजमानाचा मान कसा राखावा हे कळलं नाही तर पाहुणे होण्यास आपण योग्य नाही, असे समजावे.

आनंदवनात आलेल्या प्रत्येक आनंदयात्रीला मित्रमेळाव्याचे दोन दिवस स्वप्नाप्रमाणे भासले असणार. तेथील मधुर स्मृतींची गाठोडी बांधून प्रत्येकजण पसार झाला असला, तरी तेथील मातीत उमटलेली स्मृतिचिन्हे कोरीव शिल्पासारखी अबाधितच राहिली असतील हे निश्चित!!

□

अवती–भवती : पृष्ठ ७ वरून

पक्षाला जावा तेवढा छेद गेलेला नाही. संसदीय काँग्रेस पक्षाच्या ताकदीवर नजर फिरविली तर याची प्रचीति येते. लोकसभेच्या १४६ पैकी १२० आणि राज्यसभेच्या १४८ पैकी ११५ खासदार संघटनेला धरून आहेत. ज्या राज्याच्या विधानसभा–निवडणुका येऊ घातलेल्या आहेत त्यांमध्ये सामूहिक नेतृत्वाचा गजर करीत, स्वतःचे सत्तास्थान सांभाळणाऱ्या साहेबांचा महाराष्ट्र आणि रेड्डीजीचा आंध्र याचाही समावेश आहे. पक्ष चैतन्यमय ठेवायचा असेल तर त्याला निवडणूक–यशाची संजीवनी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. आज दादा आणि वेंगल राव हे दोन्ही विद्यमान मुख्यमंत्री पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाचा पाठपुरावा करीत आहेत. कांग्रेस पक्षात झालेल्या फाटाफुटीचे काही फायदेही आहेत. आणीबाणीचा आणि आपला आता काही संबधच नाही, अशा थाटात या संघटनेला मिरविता येणार आहे सारा आणीबाणीवादी पक्ष बाहेर गेला आणि उरलेल्या काँग्रेसतर्फे आणीबाणीमधील अत्याचाराबाबतची जाहीर दिलगिरी, चव्हाणांसकट सगळे नेते मोकळेपणाने व्यक्त करीत आहेत. खेरीज 'आणीबाणीचा कोळसा पुरेसा घासून झाला. आता पुढे काय करणार ते बोला!' असा सवालही चव्हाणांनी जनता पक्षाला विचारला आहे. राष्ट्रीय पातळीवर संघटनेची मोठी शक्ती आपल्यामागे आहे आणि महाराष्ट्र पातळीवर विचार करायचा झाल्यास जवळ जवळ चिरेबन्द पक्ष आपल्या पाठी आहे, राज्यात आपलेच सरकार सत्तेवर आहे, या साऱ्या गोष्टीमुळे चव्हाण समाधानी आहेत. त्यांची सध्याची भाषणे आक्रमक आहेत. त्यांच्या शब्दाला आत्मविश्वासाचे एक नवे तेज प्राप्त झाले आहे आणि ते जिद्दीने निवडणुकांची खेळी खेळणार, ही दिसती गोष्ट आहे. गेल्या शनिवारी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची जी बैठक टिळक–भवनामध्ये झाली, त्याला प्रचंड गर्दी झाली होती. यशवंतरावजी आक्रमक बोलले आणि इंदिराजीवर कडवट टीकाही केली. बाईंचा पाठपुरावा करायचा म्हणजे आणखी काय करायचे, असा सवालही त्यानी एका सभेत केला. बाईंच्या आग्रहाखातर वेळोवेळी अध्यक्ष बदलले तरी आपले यांचे टुमणे चालूच. वसतरावांचे भाषण निवडणुकांचे भोवतीच केंद्रित झाले होते. त्यानी दोनशे जागा जिंकण्याची घोषणा करून, एकशे साठ जागा जिंकू, असे म्हणणाऱ्या दादांबरोबर आपले मतभेद जाहीर केले आहेत. बदललेल्या परिस्थितीमध्ये काही नवीन दोस्त मिळतात काय, हे पहाण्यासाठी चाचपणी दादांनी सुरू केली असून शे. का. प. लाही खुणावले आहे.

इकडे जनतेच्या बाजूनेही मोर्चेबंदी चालू आहे. शे. का. प. बरोबरील समझोता आणि त्यांच्यासाठी ऐंशी जागा सोडण्याचा निर्णय अनेकांना मान्य नसून, आता पक्षाच्या केंद्रीय श्रेष्ठींचा हस्तक्षेप अपेक्षित आहे. महाराष्ट्रामधील निवडणुका ग्रामीण भागातही बरोबरीने झुजवायच्या असतील तर, जनता आणि शेकाप यांची युति होणे अपरिहार्य आहे, हे दोन्ही बाजूच्या लक्षात आणून देण्याची अवघड कामगिरी महाराष्ट्र समाजवादी काँग्रेसच्या शंकरराव चव्हाणांनी केली आहे. महाराष्ट्रामधील निवडणुकापुरता विचार केला तर इंदिरा काँग्रेसला विदर्भाखेरीज कुठे पाय ठेवायला जागा मिळेलसे दिसत नाही. विदर्भातही आपली ताकद सांगताना नाशिकराव तिरपुडे, जाबुवंतराव धोटे याचे नाव घेतात, यातच सगळे आले. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा मागे टाकून काँग्रेसचा आणि त्यातही वसंतदादाचा आणि यशवतरावांचा पराभव करण्याच्या ईर्षेने शंकररावांची महाराष्ट्र समाजवादी काँग्रेस काम करीत आहे दलिताच्या नेतृत्वानेच आपल्या अजाण समाजाची जेवढी फसवणूक केली तेवढी त्याच्या शत्रूनीही केली नसेल! त्यांचे नेते आयत्या वेळी काय भूमिका घेतील आणि कोणाच्या पाठी जाऊन उभे राहतील, हे काहीही सांगता येणार नाही. खोब्रागडे गटाची समजूत काढण्याचे काम जनता पक्षातर्फे एका बाजूने चालू आहे, तर काँग्रेस गवई आणि कंपनीला घट्ट धरून आहे. दलित पँथरने आणि शिवसेनेने आपला वेगळा नारा लावला असला तरी पाच-पंचवीस जागांच्या निकालावर परिणाम करण्याएवढेच सामर्थ्य आज तरी त्यांच्यामध्ये आहे. जनता पक्ष आणि त्याची मित्रमंडळी आणि काँग्रेस आणि त्याची मित्रमडळी, यांच्यामधील या राजकीय टकरीला असाधारण महत्त्व आहे.

कर्नाटकमधील अनागोंदी कारभारानंतर आलेल्या राष्ट्रपतीच्या राजवटीचा लाभ जनता पक्षाला मिळेल. काय वाट्टेल ते करून अरस जर सत्तेवर राहू शकले असते तर सर्व विधिनिषेध गुडाळून ठेवलेल्या या महाशयांनी निवडणुका जिंकण्यासाठी काय थैर केले असते, याची कल्पनाच करवत नाही. जनतेमधील सहानुभूतीचा फायदा जनता पक्षाला उठवता आला पाहिजे. आंध्रमध्ये गळती–मंत्रिमंडळाचा कारभार चालू आहे. या ना त्या कारणाने रोज दोन-चार मंत्री बाहेर पडत आहेत. शेवटी वेंगल राव-रेड्डी याच्यामागे किती सामर्थ्य राहील, हे आज सांगता येणार नाही. रेड्डीना काँग्रेस अध्यक्षपद दिल्यावर राजीनामा द्यायला निघालेले वेंगलराव आज रेड्डीचा पाठपुरावा करीत आहेत. सत्तेवर टिकून राहण्यात त्यांनी यश मिळविले तर त्यांचा काँग्रेसला थोडा-फार लाभ मिळाल्याखेरीज रहाणार नाही. तात्पर्य, आगामी विधानसभा–निवडणुका ही राजकीय कुरघोडीची रणभूमी ठरणार आहे. *

## ☐ भारताचे मुख्य न्यायाधीश ....

भारताचे विद्यमान मुख्य न्यायाधीश श्री. एम्. एच्. बेग हे बावीस फेब्रुवारी रोजी निवृत्त होत आहेत. ज्येष्ठताक्रमानुसार न्यायमूर्ती वाय्. व्ही. चंद्रचूड यांचा या जागेवर हक्क असून त्यांची भारताचे मुख्य न्यायाधीश म्हणून नेमणूक होण्याची शक्यता निर्माण झाल्याने वातावरण एकदम तापले आहे. त्याचे प्रमुख कारण असे की, आणीबाणीच्या काळात आणीबाणीचा पाठपुरावा करणारा जो एक निर्णय सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने दिला होता त्या निर्णयाच्या वेळी न्यायमूर्ती चंद्रचूड बहुमताच्या बाजूने होते. राष्ट्रपतीनी

२१ वे कलम रद्दबातल ठरविल्यानंतर व्यक्तीला स्वतःच्या अटकेविरुद्ध, ती अटक कितीही अन्यायकारक असली तरी, दाद मागता येणार नाही, असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. नऊ उच्च न्यायालये आणि एक ज्येष्ठ न्यायमूर्ती श्री. खन्ना यांच्या याबाबतच्या मतांची कदर न करता सर्वोच्च न्यायालयाने बहुमताने दिलेल्या या निर्णयामुळे असंख्य राजबद्यांना तुरुंगामध्ये खितपत पडावे लागले. या निर्णयाबाबत जयप्रकाश नारायण यांनी त्या वेळी अशी प्रतिक्रिया नोंदविली होती की, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने व्यक्तिस्वातंत्र्याची धुगधुगती ज्वालाही विझविली गेली. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाबाबत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती आणि इंदिराजींनी न्यायालय गुंडाळण्यातही यश मिळविले, अशी प्रतिक्रिया नोंदविली होती. असा निर्णय देणारे न्यायमूर्ती चंद्रचूड सर्वोच्च न्यायालयामध्ये मुख्य न्यायमूर्ती म्हणून स्थानापन्न होण्याची शक्यता निर्माण झाल्याने त्याविरुद्ध वावटळ उठणे स्वाभाविक होते. पहिला आवाज माजी न्यायमूर्ती आणि भारताचे माजी परराष्ट्रमंत्री श्री. एम् सी. छगला यांनी उठविला ! त्यांना याबाबत आलेला एक कडवट अनुभव देण्यासारखा आहे. तसेच तो विचारस्वातंत्र्याची आणि लोकशाहीची पूर्ण स्थापना केल्याची शेखी मिरविणाऱ्या जनता सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रकाश टाकणारा आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड यांच्या संभाव्य नेमणुकीबाबतची घोषणा होताच या नेमणुकीला विरोध करणारे एक पत्रक श्री. छगला यांनी काढले आणि वितरणासाठी ते 'समाचार'कडे सुपूर्त केले. वास्तविक हे महत्त्वाचे पत्रक लगोलग वितरित होणे अत्यंत आवश्यक होते; परंतु समाचारकडून ते वितरित झालेच नाही. दुसऱ्या दिवशी श्री. छगला यांनी फोन करून समाचारकडे याबाबत खुलासा विचारला, त्या वेळी आपले पत्रक वितरणमंजुरीसाठी दिल्लीला पाठविण्यात आल्याचे त्यांना सांगण्यात आले. छगलाजींनी आपल्या पत्रकाची एक प्रत लगोलग 'टाइम्स ऑफ इंडिया'कडे पाठवून दिली आणि त्यासोबत समाचारच्या वर्तनाचा निषेध करणारे एक पत्रकही पाठवून दिले. टाइम्सने या दोन्ही गोष्टींना भरपूर प्रसिद्धी देऊन जनता पक्षाच्या आणि सरकारच्या नावाने बोटे मोडण्याची संधी गमावली नाही.

या नेमणुकीला विरोध करणाऱ्या बेचाळीस विचारवंतांनी एक पत्रक काढले असून न्यायमूर्ती चंद्रचूड किंवा न्यायमूर्ती भगवती यांची मुख्य न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करण्यास विरोध दर्शविला आहे. इतकेच नव्हे तर सर्वोच्च न्यायालयामधील न्यायमूर्ती आणि मुख्य न्यायाधीश यांच्या नेमणूका सरकारने करण्याऐवजी या नेमणुका करण्यासाठी एक स्वतंत्र मंडळ नेमावे, असेही सुचविले आहे. या पत्रकावर 'महाराष्ट्र जनतापक्षाध्यक्ष एस्. एम्. जोशी, 'ओपिनियन'चे संपादक गोरवाला, श्रीमती दुर्गा भागवत, खासदार राम जेठमलानी आदि मंडळींच्या सह्या आहेत. श्री. छगला यांनी तर या नेमणुकीबाबत जेपींनी हस्तक्षेप करावा, असे सुचविले आहे.

सर्वोच्च न्यायालयामधील वकिलांची संख्या अलीकडेच केलेल्या नवीन कायद्याप्रमाणे चवदा वरून अठरा करण्यात आली आहे. या न्यायालयामधील विद्यमान न्यायमूर्तींमध्ये श्री. चंद्रचूड ज्येष्ठ असून त्याखालोखाल श्री. पी. एन्. भगवती यांचा क्रम आहे. मुख्य न्यायमूर्तींची निवृत्तिमर्यादा लक्षात घेतली असता या दोघांपैकी कोणाचीही नेमणूक झाल्यास आजवर कुठल्याही न्यायमूर्तींच्या वाट्याला आला नाही एवढा दीर्घ कालावधी, या न्यायमूर्तींच्या वाट्याला येणार आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड यांची निवृत्ती १२ जुलै १९८५ रोजी होणार आहे, तर न्या. भगवती यांची निवृत्तीची तारीख २१ डिसेंबर १९८६ ही आहे. देशाच्या मुख्य न्यायमूर्तींचे स्थान असाधारण महत्त्वाचे असल्याने या पदावर येणाऱ्या व्यक्तीचे राजकीय विचार, त्यांनी दिलेल्या निर्णयाचे संदर्भ यासारख्या गोष्टींचा विचार होणे अपरिहार्य आहे. खेरीज ज्येष्ठताक्रम डावलण्याची परंपरा इंदिराजींच्या अमदानीतच सुरू झाली आहे. न्यायमूर्ती ए. एन्. रे यांची मुख्य न्यायमूर्ती म्हणून नेमणूक करताना तीन न्यायमूर्तींची सेवाज्येष्ठता नाकारली गेली आणि त्या वेळच्या शासनातर्फे कायदामंत्री श्री. हरिभाऊ गोखले आणि कै. एम्. कुमारमंगलम् यांनी या गोष्टीचे समर्थनही केले होते. सर्वोच्च न्यायालयामधील मुख्य न्यायमूर्तींचे पद असाधारण महत्त्वाचे असते. कायद्यांचा आणि प्रसंगी घटनेच्या वादग्रस्त कलमांचा अर्थ लावण्याची जबाबदारी तर त्यांच्यावर असतेच; पण त्याखेरीज न्यायालयांमधील अनेक महत्त्वपूर्ण नेमणुकांबाबत त्यांचा सल्ला महत्त्वपूर्ण मानला जातो. त्यामुळेच अशी महत्त्वपूर्ण नेमणूक करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी, हा विचार स्वीकारार्ह वाटतो.

*

## □ प्रिन्स आगाखान...
## इस्माइली समाजाचे दैवत

वीस दशलक्ष इस्माइली समाजाचे ४९ वे इमाम प्रिन्स आगाखान अलीकडेच भारत-दौऱ्यावर येऊन गेले. असाधारण सामर्थ्य असलेल्या धर्म-प्रमुखांमध्ये त्यांचा समावेश होतो. आपले आजोबा सर सुलतान महंमद शहा तिसरे आगाखान यांच्याकडून त्यांनी धर्म-प्रमुखपदाची सूत्रे घेतली. इस्माइली विचाराप्रमाणे इमाम म्हणजे जिवंत, दैवी मार्गदर्शक. शाश्वत सत्याचा पुरस्कार करणे, आपल्या धर्मबांधवांना मार्गदर्शन करणे हे त्यांचे काम. जगभर विखुरलेला इस्माइली समाज एका धार्मिक भावनेमध्ये गुफला असून, त्यांचे धर्मप्रमुख आगाखान हे त्या समाजाचे प्रेरणास्थान आहेत. इस्माइली समाज जेथे राहतो अशा अनेक देशांमध्ये महत्त्वपूर्ण राजकीय स्थित्यंतरे झाली. अनेक देशांना स्वातंत्र्य मिळाले. टांझानिया, युगांडा, बांगला देश यासारखे देश स्वतंत्र झाले. आगाखान आपल्या जमातीची काळजी कशी घेतात, याचे एक उदाहरण म्हणून युगांडामधील इस्माइली समाजाचे त्यांनी भारत, पाकिस्तान, ब्रिटन, अमेरिका यांसारख्या देशात पुनर्वसन केले, त्या गोष्टीचा उल्लेख करता येईल. आगाखान यांचा अत्यंत श्रीमंत व्यक्तींमध्ये समावेश होतो. वास्तविक ते धर्मप्रमुख; परंतु तरीही त्यांच्या नावामागे राजबिरुदावल्या लावल्या जातात. आईकडून त्यांचे इंग्लंडच्या राजघराण्याशी नाते आहे. आपल्या समाजाचे धर्म-प्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर इंग्लंडच्या राणीकडून त्यांना 'हिज् हायनेस' हा किताब देण्यात आला. आगाखान यांचा जन्म १९३६ साली झाला. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण

नैरोबी येथे झाले. त्यानंतर काही काळ ते स्वित्झर्लंडमध्ये होते. मुस्लिम इतिहासाचा त्याचा दांडगा व्यासंग असून याच विषयावर त्यांनी पदवी संपादन केली आहे. १९५७ साली त्यांनी धर्म-प्रमुख-पदाची सूत्रे स्वीकारली. १९६९ साली पॅरिस येथे त्यांचा विवाह झाला. त्यांचे कायम वास्तव्य पॅरिस येथेच असते. आगाखान यांना त्यांचा समाज केवळ धर्म-प्रमुख म्हणूनच मानतो असे नाही, तर अन्य बाबतीतही त्यांचे मार्गदर्शन आपल्याला लाभावे, अशी समाजाची इच्छा असते. धर्मपीठामार्फत अनेक हुशार इस्माइली विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यात येतात. आगाखान फौंडेशनमार्फत अनेक धार्मिक, सामाजिक स्वरूपाच्या कामांसाठी सढळ हाताने मदत दिली जाते. कित्येक वेळा कामाचा विचार न करता उदात्त भावनेने आणि आदर्श मानवतावादी दृष्टिकोनातूनही सहाय्य दिले जाते. आगाखान यांनी आंध्रमधील वादळ-ग्रस्तांसाठी दहा लक्ष रुपयांची देणगी दिली आहे, ही गोष्ट पुरेशी बोलकी आहे. भारताबद्दल त्यांना विशेष आस्था असून आजवर त्यांनी भारताला सहा वेळा भेट दिली आहे. सर्व-साधारणपणे इस्माइली समाज संपन्न आहे. भारताची एकंदर परि-स्थिती लक्षात घेतली तर येथील इस्माइली समाजाची स्थिती चांगलीच आहे, असे मानावे लागेल. 'द ऑर्डर ऑफ द नाइट ऑफ द ग्रँड क्रॉस' हा सर्वोच्च बहुमान बहाल करून इटालियन सरकारने त्यांचा गौरव केला आहे. रूढार्थाने आगाखान हे इराणचे नागरिक. त्यांचे अनेक पूर्वज त्या देशात होते. इराणमध्ये आगाखान यांना नेहमीच विशेष सन्मानाची वागणूक दिली जाते. १९६० साली त्यांनी इराणला भेट दिली त्या वेळी इराणच्या बादशहांनी 'हिज रॉयल हायनेस' हा किताब त्यांना बहाल केला.

धर्म-प्रमुखाच्या वाट्याला त्यांच्या अनुयायांच्या निष्ठा मिळतातच. तथापि इस्माइली समाजातर्फे आगाखान यांना जे स्थान दिले जाते आणि त्यांच्या निर्णयाची जी कदर केली जाते, तसे स्थान आणि तसे सन्मान थोड्याच धर्म-प्रमुखाच्या वाट्याला येतात. प्रिन्स आगाखान याची पत्नी बेगम सलमा पूर्वी मॉडेल म्हणून काम करीत होती. १९६८ साली तिची आणि आगाखान यांची भेट झाली आणि वर्षभरातच ते विवाहबद्ध झाले. आगाखान दांपत्याला तीन मुले आहेत. राजपुत्र रहीम सहा वर्षांचा तर त्याहून धाकटा राजपुत्र हुसेन तीन वर्षांचा आहे. या दोघांची बहीण राजकन्या जहिरा सर्वांत मोठी असून तिचे वय सात वर्षांचे आहे. आगाखान याचे कायम वास्तव्य पॅरिस येथे असले तरी त्यांचे लक्ष जगभर पसरलेल्या आपल्या समाजाकडे असते आणि गरजेप्रमाणे आपल्या समाजाला मार्गदर्शन करण्यासाठी ते जगाच्या निरनिराळ्या भागात दौरे काढतात. राज्य नसूनही राजसन्मान घेणारे आगाखान धर्म-बंधनाचे पावित्र्य मानणाऱ्या एका कडव्या समाजाचे प्रेरणास्थान आहेत. वीस दशलक्ष इस्माइली समाज त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांच्या विचारांना विशेष महत्त्व दिले जाते. ते एका पंथाचे प्रमुख असले तरी त्यांच्या विशाल दृष्टिकोनामुळे, त्यांना स्वतंत्र मान्यता असल्याने भारतातही त्यांचे मोठे स्वागत झाले. □


चवदार तळे सत्याग्रह, मनुस्मृतिदहन या घटनांची सविस्तर माहिती

## महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक

प्रा. रा. म. बिवलकर । प्रा. झुंबरलाल कांबळे

किंमत वीस रुपये

प्रस्तावना : प्रा. नरहर कुरुंदकर

पुरस्कार : श्री. भय्यासाहेब आंबेडकर

राजहंस प्रकाशन । १०२५ सदाशिव पेठ । नागनाथ पाराजवळ । पुणे ३०

## काही प्रतिक्रिया : पृष्ठ ६ वरून

सुट्टी मिळणार नाही. आमची तयारी आहे; पण आता या प्रकरणाचा निकाल लागल्याशिवाय आम्ही थांबणार नाही. आणि त्याच्याही पुढे जाऊन मला असं म्हणायचंय की, आता आम्हाला 'विद्यार्थ्यांचं कसं होणार,' म्हणून विचारलं जात, नैतिक जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली जाते; पण जेव्हा शासनाने अभ्यासक्रम बदलला तेव्हा मुलांचं काय कमी नुकसान झालं? का सर्व नीती, बंधनं फक्त आमच्यापुरतीच?

आमच्या विद्यार्थिनींशीसुद्धा ज्या वेळी या विषयावर बोलणं होतं तेव्हा हेच लक्षात येतं की, आपल्या शिक्षकांवर काही-तरी अन्याय होतोय् हे त्याना समजलेले आहे आणि हे होऊ नये एवढं त्यांना नक्कीच वाटतं.'

'चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांबाबतीत, वेतन एवढाच त्यांच्या इंटरेस्टचा भाग आहे, पण त्याचबरोबर त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाचीही त्याना जाणीव होतेय्. आम्ही दोन्हीही वर्ग परस्परावलंबी असल्याने आमच्यात एकजूटही चांगली आहे. चतुर्थ श्रेणीचे असूनही या लोकानी अजूनही जो संयम दाखविला आहे, तो निश्चितच महत्त्वाचा आहे. त्यांच्या आर्थिक गरजा भागवण्याचेही प्रयत्न चालू आहेत. त्यासाठी संघटनेच्या निधीतून मदत दिली जातेय्. शाळे–शाळेतून पैसे गोळा केले जातायत. शिक्षक पतपेढीमधूनही मदत केली जात्येय्. जनता सहकारी बँकेसारख्या बँकांनी कर्जही देऊ केलेले आहे.

'वृत्तपत्रामध्ये या संपाविषयी ज्या बातम्या येतायत् त्या एकांगी आहेत. ते देत असलेली हजेरीची आकडेवारीही चुकीची आणि दिशाभूल करणारी आहे. जे नुकतेच कामावर लागले आहेत त्यांना आम्हीच कामावर जा, असं सांगितलं. दडपणामुळेही काही जण कामावर गेले, पण ते परत बाहेर पडले आहेत. अजून आमचं धैर्य चांगलं टिकून आहे.

'सबंध भारतीय पातळीवरचेही संप जिथे चिरडले जातात तिथे हा संप कितपत तग धरू शकेल, असं तुम्ही म्हणता, पण म्हणून विरोधसुद्धा दर्शवू नये, असं नाही. अर्थात ह्यातूनही काही निष्पन्न झालं नाही तर पुढे काय करायचं, याचे समितीला अधिकार आहेत. मुख्यत्वे, अहिंसक मार्गांनी अडवणूक हे आमचं उद्दिष्ट आहे. शिवाय आत्ता जर आम्ही माघार घेतली तर मात्र आमचा कुणीच वाली राहणार नाही. 'मुकी, विचारी कुणी हाका' अशी आमची अवस्था होईल. आणि आत्ता या लढ्यामध्ये आम्ही अशा टप्प्यावर येऊन पोचलो आहोत की, आता माघार घेणंही योग्य होणार नाही. मला स्वतःला मात्र अशी खात्री आहे की, या संपाचा निर्णय आमच्याच बाजूने लागेल.'

*

## आम्ही काम करतोय्–पण मनाला टोचणी आहे.

'मी सरकारी खात्यात तृतीय श्रेणीचा कर्मचारी आहे. पहिले दहा–बारा दिवस मीही संपावर गेलो होतो. पण एक दिवस मला निरोप आला की, आपल्या ऑफिसमधलीच काही वरिष्ठ मंडळी 'वैद्यकीय रजा' घेऊन संपावर गेलेली आहेत. म्हणजे उद्या जर संप चिरडला गेलाच आणि सरकारने काही कारवाई केली तर त्यांना काहीच त्रास होणार नाही. कारण ती वैद्यकीय रजा घेऊन संपावर गेलेली आहेत. यातून त्यांनी आमचा विश्वासघात केला, असं आम्हाला वाटलं. म्हणजे उद्या कारवाई झाली, तर आम्हीच तेवढे यात अडकू आणि इतरजण निसटून जातील असं वाटलं. त्यामुळे आम्ही पुन्हा कामावर हजर झालो. अर्थात याबद्दल आम्हाला टोचणी लागूनच राहिलेली आहे. पण आमचाही इलाज नव्हता. आम्ही फार तर संघटनेशी प्रतारणा केली असेल, पण या लोकांनी शासन आणि संघटना, दोघांनाही फसविलं आहे.

'अर्थात अशा तऱ्हेने कामावर हजर झालेल्यांची संख्या फारच तुरळक आहे. आमच्याच खात्यात जवळजवळ शंभर माणसं आहेत; पण त्यापैकी जेमतेम पंचवीस-तीस माणसंच कामावर हजर झाली आहेत. पण तरीही संघटनेने आमच्यावर कोणतंच दडपण आणलेलं नाही. वर्तमानपत्रातून येणाऱ्या बातम्या धूळफेक करणाऱ्या आहेत. आमच्या मागण्या न्याय्य आहेत. संप व्हायलाच हवा होता. ऑफिसमध्ये इतर जे काही कर्मचारी हजर झाले, ते आर्थिक कोंडी झाल्यामुळेच हजर झाले. त्यांचाही संपाला पाठिंबाच आहे. पण शेवटी पोटाकरिता काही तडजोडी कराव्याच लागतात.' □

'मी चतुर्थ श्रेणीचा कार्मचारी आहे. आम्ही बारा–तेरा दिवस संपावर होतो. सगळे जण बाहेर पडले म्हणून मीही बाहेर पडलो. आता आमच्या युनिटमधले पाच–सहा जण कामावर हजर झाले आहेत, म्हणून मीही हजर झालो. यामध्ये आमच्यावर शासनाकडून कोणताही दबाव आणला गेला नाही किंवा संघटनेनेही आमच्यावर दडपण आणलेले नाही. संप करण्याबाबत संघटनेकडून एक सार्वजनिक पत्रक आलं होतं म्हणतात; पण मी काही ते वाचलं नाही. मी आपलं वर्तमानपत्रात वाचूनच बाहेर पडलो.' □

संपावर गेलेल्या सामान्य कर्मचाऱ्यांच्या या प्रतिक्रिया आहेत; पण फार महत्त्वाच्या आहेत. आता तुकडा पाडल्याशिवाय थांबायचं नाही, हा कर्मचाऱ्यांचा निर्धार आणि खंबीरपणा यातून व्यक्त होतोच, शिवाय त्यांच्याशी प्रत्यक्ष बोलतानाही हाच अनुभव येत होता. विशेषतः १९७४ साली फसलेल्या रेल्वेच्या संपावरून या मंडळींनी चांगलाच धडा घेतल्याचं जाणवत होतं. कारण त्यांच्या बोलण्यातही ते येत होतं आणि एकजुटीने लढल्याशिवाय तरणोपाय नाही हेही त्यांनी ओळखलं असावं. संप सुरू होऊन तीन आठवडे उलटून गेले असूनही त्यांचं धैर्य अजूनही चांगलच टिकून आहे. कँपमधल्या तीन-चार सरकारी ऑफिसेसना भेटी दिल्यावर जे दृश्य दिसलं ते संपाच्या दृष्टीने उत्साहवर्धकच आहे. राजपत्रित अधिकारी ऑफिसमध्ये बसलेले असतात; पण हाताखालचा नोकरवर्ग संपावर असल्यामुळे ते काहीच काम करू शकत नाहीत. सर्वत्र रिकाम्या खुर्च्या-टेबलं आणि फायलींचे ढीग पडलेले दिसतात. चार-सहा बायका साड्यांच्या किंवा सासुबाईंच्या कहाण्या एकमेकींना सांगत असतात; पण त्यापलीकडे काहीच जिवंतपणा वाटत नाही. एका

ऑफिसमध्ये गेलो तेव्हा तिथल्या दयाळू राजपत्रित अधिकाऱ्यांनी चहा घेण्याचा आग्रह केला आणि बेल दाबली. तेव्हा मी विचारलं, 'आता बेल दाबून कोण येणार? तेव्हा ते म्हणाले, 'काय, आपलं नशीब असलं तर येतं कुणी तरी!'

### शासनच जबाबदार

आणखीही एक मुद्दा माझ्या लक्षात आला तो म्हणजे वर्तमानपत्रातल्या किंवा आकाशवाणीवरील बातम्या खरोखरच चुकीच्या आहेत. विशेषतः ज्या प्रमाणात हजेरीची आकडेवारी दिली जात्येय ती तर संतापजनक आहे आणि एकोणीस महिन्यात वरिष्ठ पातळीवर जो दडपशाहीचा प्रयत्न झाला त्याचाच कित्ता इथे गिरवला जात नाही ना, अशी भीतीही मनाला चाटून जाते. कंपातल्या तीन-चार ऑफिसेसमध्ये चक्कर मारली तरी सपाच्या एकजुटीचं आणि निर्धाराचं पुरेसं दर्शन घडतं.

सरकारने जी आर्थिक असमर्थता दाखवली आहे त्यावरही संपनेत्यांकडे पर्याय आहे. आपल्या २५ डिसेंबरच्या पत्रासोबत त्यांनी सरकारला आर्थिकदृष्ट्याही मागण्या मान्य करणं कसं शक्य आहे, हे आकडेवारीसह दाखवून दिलेलं आहे. म्हणूनच पत्रकाच्या शेवटी हे संपनेते म्हणतात,

'वाढता पेचप्रसंग लक्षात घेऊन, सोबत जोडलेल्या वित्तीय निवेदनाच्या आधारे आपण अर्थपूर्ण चर्चा सुरू करावी अशी समन्वय-समितीची आपणास पुन्हा नम्र विनंती आहे.'

तेव्हा आता या संपाला कोणतं वळण द्यायचं, हे सर्वस्वी शासनाच्या हातात आहे. संप करणाऱ्यांनी आपली बाजू स्वच्छपणे मांडली आहे सरकारच आर्थिक असमर्थतेचं कारणही फोल असल्याचं त्यांनी आकडेवारीसह सिद्ध केलेलं आहे. त्याबाबतीत आणखीही चर्चा करून प्रश्न सोडवण्याची तयारी दाखवली आहे. अशा वेळी शासनाने जर हात पुढे केला नाही तर त्यातून दोनच निष्कर्ष निघू शकतात. एक शासन देत असलेले आर्थिक असमर्थतेच कारण खोटं असलं पाहिजे, नाही तर बोलणी करायला त्यानी पुढे का येऊ नये? त्यानीही आपली बाजू स्पष्ट करायला हवी आणि हे जर केलं नाही तर संपाला आता जे वळण लागेल आणि जी परिस्थिती निर्माण होईल, त्याला या शासनाचं आडमुठं धोरणच अधिक कारणीभूत असेल.

—सतीश कामत

---

## काँग्रेस

पृष्ठ ८ वरून

नऊ–साडेनऊ महिन्यांचा काळ अंतर्गत संघर्ष-लढण्यातच गेला हे खरे; पण या काळात एक पराभूत, मरगळलेला, फुटीने ग्रासलेला, पराभवाचे धडे शिकण्यास तयार नसलेला पक्ष अशीच काँग्रेस पक्षाची प्रतिमा राहिली. रेड्डी–चव्हाणाचे नेतृत्व त्यात नवा प्राण भरू शकले नाही. इंदिरा गांधीबाबत प्रथमपासूनच त्यांची भूमिका कचखाऊपणाची होती. अगदी अटळ झाल्यावरच ठाम भूमिका त्यांनी घेतली. वास्तविक रेड्डी–चव्हाण नेतृत्वाने इंदिरा गांधींपासून व त्यांच्या धोरणापासून फारकत, लोकसभा निवडणुकीतील पराभवापासूनच घ्यावयास हवी होती. काँग्रेसच्या एकाही ठरावात इंदिरा गांधीचा नामनिर्देशपूर्वक स्पष्टपणे केलेला नाही. निवडणुकीतील पराभवाचे, आणीबाणीच्या कालखंडाचे प्रामाणिक आत्मपरीक्षण झालेच नाही. इंदिरा गांधीना व त्यांच्या गटाला प्रथमपासून काँग्रेसमधल्या सर्व अधिकारपदावरून दूर करायला हवे होते; पण अशी कारवाई करण्याचे धाडस रेड्डी–चव्हाणांना झाले नाही. जनता सरकारच्या धोरणावर नकारात्मक टीका करण्यापलीकडे दुसरा कार्यक्रम त्यांनी पक्षापुढे ठेवला नाही. इंदिराग्रहणातून आता पक्षाची मुक्तता झाली आहे. 'कॅन्सर गेला' असाही शब्दप्रयोग एका नेत्याने वापरला. रेड्डी–चव्हाणाचे नेतृत्व आता तरी काँग्रेसची काही नव्या पायावर उभारणी करते काय हे आता पहावयाचे; पण त्यांचे आतापर्यंतचे धोरण व कार्यपद्धती पाहता काँग्रेसला ते प्रभावी, कणखर पण त्याचबरोबर विधायक नेतृत्व कितपत देऊ शकतील याची शंका वाटते. इंदिरेचा अडथळा दूर झाल्याने आता आपल्या मताप्रमाणे काँग्रेस घडविण्याची संधी त्यांना मिळाली आहे. येत्या काही महिन्यातचं त्यांच्या नेतृत्वाची कसोटी लागणार आहे. ☐

इंग्रजी चित्रपट

# Man Of La Mancha

## एका झपाटलेल्याची कहाणी

सदानंद बोरसे

Dream the impossible dream.
Bear the unbearable sorrow.
Fight the unbeatable foe.
Try with your weary hands.
Reach the unreachable star.

ही आगळी आकांक्षा एक वेडा आणि फक्त वेडाच करू शकतो.

Man Of La Mancha ही अशाच एका वेड्याची कहाणी.

काळ सुमारे पाच-सहाशे वर्षांपूर्वीचा. स्पेनमधील एक गाव. त्या गावातील चौकात, अगदी चर्चच्या समोरच एक नाटक सुरू आहे.

'एका म्हाताऱ्या माणसाला Holy Office ने जिवंत जाळण्याची शिक्षा फर्मावली आहे. का? त्याने Holy Bible बद्दल अविश्वास दाखविला.' या साऱ्याच घटनेचे विडंबन त्या नाटकात चालू आहे. 'कठपुतळी बाहुलीप्रमाणे चालत चर्चचे शिपाई येतात आणि गवताच्या पेंढीगत दाढी लावलेल्या म्हाताऱ्याला पकडून खांबाला बांधतात. स्टेजखालून भाता सुरू होताच त्या म्हाताऱ्याभोवती लाल कापडी चिंध्यांची आग पेट घेऊ लागते.'

स्टेजवर नाटक रंगात आलें असतानाच खरेखुरे चर्चचे शिपाई येतात आणि त्या नाटककाराला व त्याच्या साहाय्यकाला पकडून नेतात. त्या दोघांना शिक्षा ठोठावण्यापूर्वी गावाबाहेरील एका तुरुंगात बंद करण्यात येते. तुरुंगाची परिस्थिती कशी? If you need anything, shout-shout, if you can.

त्यांना तुरुंगात सोडून शिपाई निघून जाताच तुरुंगातील आतापर्यंत गप्प असलेले कैदी पुढे सरकू लागतात—आशाळभूत नजरेने आणि अचानक दोघावर झेप घेतात. जुने कैदी नव्या कैद्यांना लुटत असतात—नाणी, मुखवटे, नाटकातील पोषाख, हत्यारे. नाटककाराला त्याची फारशी खंत वाटत नाही; पण त्या कैद्यांचा (कैद्यांमधीलच) गव्हर्नर त्याच्या हातातील चोपडे हिसकावून घेतो आणि ते आगीत टाकायला निघतो तेव्हा मात्र नाटककार जिवाच्या आकांताने तडफडतो, विरोध करतो आणि मग तुरुंगातील खटल्याला सुरुवात होते.

कैदी विरुद्ध नाटककार!

नाटककार आपल्या बचावासाठी ते चोपडे, त्यातील ते नाटक सादर करण्याची परवानगी मागतो, त्या कैद्यांनाच त्यातील पात्रे बनवितो आणि तुरुंगातील त्या जिवंत, उत्स्फूर्त नाटकाची सुरुवात होते, Man of La Mancha नावाच्या एका झपाटलेल्याची कहाणी सुरू होते—

आटपाट नगरातून Don Vertesco नावाचा एक म्हातारा शेतकरी शिलेदार बनण्यासाठी निघाला. तो शूर होता, घरंदाज होता, खानदानी होता, उमदा होता; पण शिलेदार नव्हता म्हणूनच त्याला शिलेदारी हवी होती बरोबर काय तर एक तट्टू, मोडके शिरस्त्राण, तुटका भाला, जुनाट चिलखत अन् गंजलेली टोकाचा 'ळ' झालेली तलवार. सोबतीला त्याचा इमानी नोकर Sancha. का हे Sancha लाही माहीत नव्हते; पण त्याचे आपल्या या म्हाताऱ्या मालकावर अतोनात प्रेम होते.

त्याच्या मोहिमेची सुरुवात झाली एका पवनचक्कीबरोबरच्या लढाईने. Vertescoच्या मते तो राक्षस होता. अखेर त्याच्याकडून पराभूत होऊन दोघेही समोरच्या किल्ल्याकडे निघाले.

तो किल्ला म्हणजे खरी तर एक जुनाट खानावळ होती. जेवणाची वेळ. सगळीच गिऱ्हाइके जेवणापेक्षा जेवण वाढणाऱ्या Aldanzo कडेच आधाशी नजरेने पाहात होती, तिच्याशी लगट करीत होती; पण Aldanzo मात्र एकेकाला फटकारत होती,

'हा:!
तू काय वा तुझा भाऊ काय
पुरुष तेवढे सगळे सारखेच
माझ्या शरीरावरून फिरणारी
नजर सारखीच आधाशी
माझे कपडे उतरविणारा
हात सारखाच वखवखलेला.
म्हणूनच म्हणते—
प्रेम—बीम सगळं झूट
प्रत्येकाला हवी फक्त मादी
कारण .
तू काय वा तुझा भाऊ काय
पुरुष तेवढे सगळे सारखेच..

त्याच वेळी बिगुलाचा एक बेसूर आवाज निनादला आणि त्या जुनाट खानावळीचा तितकाच जुनापुराणा मालक पुढे धावला.

Vertesco व Sancha आत आले.

आणि एकच धमाल उडाली.

Vertesco ने Aldqnzo ला आपली प्रेयसी Dolsymea बनवून टाकले. तिच्या रक्षणासाठी इतर गिऱ्हाईकांशी युद्ध करून विजय मिळविला आणि किल्लेदाराकडून म्हणजे खानावळवाल्याकडून शिलेदारी मिळविली.

त्यानंतर खानावळीतील सर्व लोकानी Aldanzo ला पळवून नेले आणि नतर सर्वस्व लुटलेल्या अवस्थेत. रस्त्याच्या कडेला बसलेली Aldanzo Vertesco ला दिसली. त्याच वेळी त्याच्या पुतणीच्या नियोजित पतीने त्याच्या डोक्यातील शिलेदारीचे खूळ काढून टाकले. एका Enchanter चे सोंग घेऊन त्याने Vertesco ला आरसा दाखविला आणि त्या आरशातील आपले रूप पाहून भग्न, विदीर्ण मनाने Vertesco कोसळला.

येथे नाटक संपते. तोच एकजण नाटककाराला विचारतो, 'तू हे नाटक असे

का संपवलेस ?'

'मी आयुष्यात सैनिकापासून गुलामापर्यंत सगळी कामं केली आणि अनुभवातून शिकलो– जीवन म्हणजे दु:ख, दुर्बलता आणि क्रौर्य. ते तुमच्या साऱ्या स्वप्नांचे तुकडे करतं.'

'पण तू तर प्रतिभावंत आहेस, आशावादी आहेस, तरी तुला जीवनात फक्त भग्नताच दिसते.'

–आणि नाटक पुन्हा सुरू झाले, पुढचे नाटक.

तो शिलेदार एका खोलीत अखेरच्या घटका मोजत होता, Sancha जवळच टिपे गाळत उभा होता तोच ती आली– एखाद्या तुफानासारखी, विजेसारखी–

'धनीऽ'

'माफ कर बाई, पण मी तुला ओळखलं नाही.' अनोळखी नजरेतून उमटलेले अस्पष्ट शब्द

'मी तुमची Dolsymea !

आठवतंय ? तुम्ही म्हणाला होतात–

शिलेदारानं काय करायला हवं ?'

वेडा हो, अशक्यप्राय स्वप्नासाठी

असह्य दुःखही सहन कर !

आठवतंय ?'

शिलेदार ताडकन् उठला आणि ओरडला,

'म्हणजे ते स्वप्न नव्हतं तर ?

वेडा हो अशक्यप्राय स्वप्नासाठी

असह्य दु:खही सहन कर

अजिक्य शत्रूबरोबर दोन हात कर

विदीर्ण हातानीही झुंज दे

अप्राप्य ताऱ्यापर्यंत पोहोचायचंय तुला

वेडा हो अशक्यप्राय स्वप्नासाठी.

आठवलं, तू माझी Dolsymea आणि हा Sancha. अरे, बघता काय ? मोहिमेची तयारी करा. Knight of La Mancha मोहिमेवर निघालाय.'

–आणि तो शूर शिलेदार कोसळला, त्याची अखेरची मोहीम सुरू झाली होती. एकांडी मोहीम.

Sancha पाणावलेल्या डोळ्यांनी दूर जाणाऱ्या Dolsymea कडे पाहत असतानाच–

तुरुंगाचा जिन्यासारखा दरवाजा करकरतो, नाटककार आणि त्याचा साहाय्यक जाऊ लागतात, शिक्षा त्याना माहीतच असते– फाशी किंवा जिवंत जाळणे किंवा–

*आणि इतर कैदी गाऊ लागतात,*

'Dream the inpossible dream...'

असा हा काहीसा झपाटणारा, काहीसा अस्वस्थ करणारा चित्रपट. ही कथा आहे Dale Wasserman ची. चित्रपटाचा दिग्दर्शक Arther Hiller. या माणसाने एकूण चित्रपटच वास्तव व नाटक अशा गुंफण पद्धतीने हाताळला आहे. ती पद्धत आणि दोन्हीतून एकमेकात शिरण्यासाठी निवडलेले प्रसंग फारच सुरेख होते; त्यामुळे हे तुरुंगातील नाटक चालू आहे, याचे भान राहूनही प्रेक्षक Don Vertesco च्या गोष्टीबरोबर वाहत जातो आणि असा त्या गोष्टीत वाहात असतानाही सतत त्याला नाटककाराच्या होऊ घातलेल्या शोकातिकेचीही आठवण राहते.

चित्रपटात नाटककार आणि Don Vertesco चे काम केले आहे पीटर ओटूलने. अतिशय स्वप्नाळू व बोलक्या निळ्या डोळ्यांचा हा अभिनेता अक्षरशः या भूमिका जगला आहे हीच गोष्ट Aldanzo झालेल्या सोफिया लॉरेनची आणि Sancha झालेल्या जेम्स कोकोची. बाकी लोकांना फारसे काम नाही आणि जे आहे ते त्यांनी ठाकठीक केले आहे

थोडेसे लिहावेसे वाटते, ते यातील गाण्यांबद्दल. आवाजांचा वापर करून गाण्यामध्ये किती वेगवेगळे भाव दाखविता येतात, ते या गाण्यामधून प्रकर्षाने जाणवते. पीटर ओटूलसाठी 'Dream the impossible dream' मध्ये वापरलेला जाड भरदार आवाज, 'Dolsymea' मधील मोरपिसासारखा मुलायम, कापरा आवाज, सोफिया लॉरेन्ससाठी 'Dream the...' मध्ये घेतलेला नाजुक, विवश आवाज, 'You or your brother' मधील सुरीसारखा धारदार आणि काहीसा कर्कश आवाज आणि 'I very much want him' या एकाच गाण्यात वापरलेले तीन आवाज– हे सगळे आवाजच त्या त्या गाण्यातील भावना व्यक्त करण्यास समर्थ होते. *Mitch Leigh ने दिलेले संगीत या सुरेख* चित्रपटाची सुंदर साथ करीत होते.

*

---

# जपानी चित्रमहोत्सव

---

Indo–Japanese Association तर्फे दि. १ ते ७ जानेवारी रोजी जपानी चित्रमहोत्सव आयोजित केला होता. १९७१ साली स्थापन झालेल्या या संस्थेतर्फे, जपानी भाषेचे वर्ग, जपानबद्दल विविध माहिती देणारी तज्ज्ञांची व्याख्याने, जपानी भाषेतून वक्तृत्वस्पर्धा असे अनेक उपक्रम आयोजित केले जातात. आता भरविलेला चित्रमहोत्सव अशाच उपक्रमापैकी एक.

या महोत्सवातील काही चित्रपट मी पाहिले, त्याचा हा धावता आढावा.–

Konnichiwa Akachan ( *A Little* Match Maker )– दिग्दर्शक M. Matsubayashi.

या चित्रपटाचे फक्त synopsis माझ्या वाचण्यात आले आणि मी अक्षरशः सरकलो. तेच थोडक्यात देत आहे.

'मी आहे एक तान्हा मुलगा. माझं वय आठ महिने. माझे पपा विद्यापीठात शिकवितात. माझ्या मम्मीबद्दल मला काहीच माहिती नाही. पपाना सगळे विधुर म्हणतात. मी रडायला लागलो की, एक मायाळू, प्रौढ स्त्री माझी काळजी घेते. एकदा विद्यापीठातच काम करणाऱ्या Tachikawa बाईंनी त्यांचा मुलगा म्हणून मलाच नेलं. मी एका लहान मुलांच्या स्पर्धेत पोहोचलो आणि

चक्क पहिला आलो.

माझं आयुष्य तसं व्यवस्थित चाललंय; फक्त राहून राहून मला एकाच गोष्टीचं आश्चर्य वाटतंय, मम्मी कुठाय? माझी मम्मी कुठाय?'

Synopsis जरी असे असले तरी प्रत्यक्ष चित्रपटात मात्र त्या छोटया मुलामुळे निर्माण झालेल्या निरनिराळ्या व्यक्तींच्या attachments छोटया छोटया प्रसंगांमधून व काही वेळेस घोटाळयांमधूनसुद्धा दाखविल्या होत्या.

हा महोत्सवाच्या सर्व चित्रपटांमध्ये उत्कृष्ट चित्रपट होता.

Kokyo ( Home From The Sea )

कथा, दिग्दर्शन– Yoji Yamada.

अथांग समुद्रात तरंगणारे काही बेटांचे तुकडे. हिरवेपणाने झाकाळलेले. त्यांच्या पायथ्याशी पहुडलेली गावे. अशाच एका गावात Seichi राहात होता. बेटावरून बोटीने दगडांची वाहतूक करणे हा त्याचा धंदा; पण नंतर आलेल्या अडचणींमुळे त्याला एका कारखान्यात नोकरी पत्करावी लागली, बेट सोडावे लागले.

अशी ही अत्यंत सरधोपट कथा. मग उगाचंच तिला काळातील बदल, बेटावरील प्रेम ( म्हणजे 'बंध रेशमाचे' वगैरे ), काळ व माणूस यातील लढा असली ठिगळं जोडली आहेत. कथा, दिग्दर्शन, अभिनय सर्वच दृष्टींनी चित्रपट अत्यंत सामान्य होता. चित्रपटाचे संगीत तेवढे जपानी style मुळे वेगळे वाटले.

Aoi Sammyaku ( Beyond The Green Hills )

दिग्दर्शक– Katsumi Nishikawa.

टोकियोहून एका लहानशा गावी शाळेत आलेल्या shinko नावाच्या मुलीच्या मुलांबरोबरील मनमोकळया वागण्याने शाळेत वादळ उठते. मग पुराने उसूल विरुद्ध नवविचार अशी जंगी कुस्ती, थोडीशी डायलॉगबाजी असे करीत करीत किशोरावस्थेतील मुलांची मानसिक स्थिती येथपर्यंत येऊन चित्रपट थांबला. थांबला म्हणजे अक्षरशः अर्ध्यावर थांबविल्यासारखा वाटला. बराच वेळ प्रेक्षक पुढचा रीळ लागतो आहे, असे वाटल्याने बसून होते. काही हलक्याफुलक्या प्रसंगांनी आणि विद्यार्थी–विद्यार्थिनींचे काम केलेल्या अभिनेत्यांच्या मोकळया, प्रसन्न अभिनयाने व दर्शनाने थोडा–फार खुललेला हा चित्रपट उगाचच विचित्र जागी तोडला आहे. म्हणजे एक शिक्षक–पालक सभा होत असताना चित्रपट संपतो.

मला तर अजूनही रीळ न आल्याने 'The End' दाखविले असावे, असे वाटते.

एकूणच महोत्सवातील चित्रपटांची निवड अधिक काळजीपूर्वक व्हायला हवी होती. □




लेखक : पु. ल. इनामदार । राजहंस प्रकाशन, पुणे । मूल्य : वीस रुपये